सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १५० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पंतप्रधान मोदींनी देशात 'पॉलिटिक्स फॉर परफॉर्मन्स' रुजवले - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

### मोदींच्या २५ वर्षांच्या सार्वजनिक सेवेच्या निमित्ताने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान देशभर 'सेवा संकल्प अभियान'

**मुंबई :** भ्रष्टाचार, जातिवाद आणि घराणेशाहीच्या राजकारणातून देशाला बाहेर काढत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १२ वर्षांत 'पॉलिटिक्स ऑफ परफॉर्मन्स'ची नवी दिशा दिली आहे. राष्ट्रवाद आणि 'भारत प्रथम' ही धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे बनली असून, सरकारच्या कामगिरीचे मूल्यमापन आता परिणाम, उपलब्धी आणि जनतेपर्यंत पोहोचणाऱ्या योजनांच्या आधारे होऊ लागले आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी केले. नरेंद्र मोदी यांच्या मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून २५ वर्षांच्या सार्वजनिक सेवेच्या निमित्ताने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान देशभर राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियाना'ची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री आशिष शेलार यावेळी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा १७ सप्टेंबरला जन्मदिन असून, ७ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांच्या मुख्यमंत्री आणि पंतप्रधानपदाच्या सार्वजनिक कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. गुजरात राज्याचे मुख्यमंत्री आणि देशाचे पंतप्रधान म्हणून सलग २५ वर्षे जनसेवेचा विक्रम नोंदविणारे फार कमी नेते आहेत. वारंवार निवडणुकीच्या कसोटीवर उतरून जनतेचा विश्वास संपादन करणे आणि राज्य तसेच राष्ट्राच्या कल्याणाचे कार्य सातत्याने सुरू ठेवणे ही मोठी उपलब्धी असल्याचे शाह यांनी सांगितले. यापूर्वी गुजरातमध्ये आणि त्यानंतर देशभरात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान 'सेवा सप्ताह' आयोजित केला जात होता. मात्र, यंदा २५ वर्षांच्या सार्वजनिक सेवेच्या निमित्ताने हा उपक्रम महिनाभर चालविण्याचा निर्णय भाजप, मित्रपक्ष आणि विविध स्वयंसेवी संघटनांनी घेतला आहे.

हे अभियान सर्व राज्ये, केंद्रशासित प्रदेश, जिल्हे, लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांपासून बूथ स्तरापर्यंत राबविण्यात येणार आहे. 'जन सेवा ही प्रभु सेवा' हे या अभियानाचे सूत्र असून, जनभागीदारीच्या माध्यमातून २०४७ मध्ये विकसित भारताची निर्मिती करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. सेवा हा संस्कार बनविणे आणि संघटनेला जनभागीदारीच्या माध्यमातून जनकल्याणाचे साधन बनविणे, या दोन उद्देशांनी अभियानाची आखणी करण्यात



आली आहे. गुरु नानकदेव यांच्या सेवेच्या संदेशाचा आणि समर्थ रामदास स्वामींच्या 'उपभोगशून्य स्वामी' या विचाराचा संदर्भ देत मोदी यांनी सेवा आणि शासनाचा हा संस्कार जनतेसमोर मांडल्याचे शाह यांनी सांगितले.(Union Home Minister Amit Shah)

अभियानात देशभरात १२ प्रमुख कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. 'सेवा दिवस' या उपक्रमात रक्तदान, दीपप्रज्वलन आणि मोदी यांच्यावर २५ वर्षे विश्वास व्यक्त करणाऱ्या जनतेप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाणार आहे. 'मेरे सपनों का भारत' या उपक्रमात मुले, किशोर आणि युवकांसाठी चित्रकला व भाषण स्पर्धा होतील. 'नमो सेवा की अनकही कहानियां'च्या माध्यमातून स्थानिक भाषांमध्ये संगीतमय नाट्यप्रयोग गावागावांत नेले जातील. 'आंगन मिलन सेवा'मध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा सन्मान आणि मातृसंवाद होईल. गेल्या २५ वर्षांत सरकारी योजनांमुळे ज्यांच्या जीवनात बदल झाला, अशा लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांचे अनुभव 'सेवा की कहानी' या उपक्रमातून जनतेपर्यंत पोहोचवले जातील.

'सेवा ज्योति कलश यात्रा'च्या माध्यमातून विकसित भारताचा जनसंकल्प घेतला जाणार आहे. 'वडनगर से वाराणसी की सेवा यात्रा'मध्ये दोन्ही दिशांनी युवक मोटारसायकलवरून प्रवास करतील. सात राज्यांतून गावागावांत मुक्काम करीत वडनगरहून निघालेली टीम वाराणसीला आणि वाराणसीहून निघालेली टीम वडनगरला पोहोचेल. 'सेवा मेरा योगदान'अंतर्गत जनभागीदारीतून २५ सेवाभिमुख उपक्रम राबविले जातील. 'सेवा सेतु अभियान'च्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा लाभ तळागाळातील प्रत्येक पात्र व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आधार किंवा रेशनकार्ड नसलेल्या व्यक्तींपासून सरकारी योजनांपासून वंचित असलेल्या नागरिकांपर्यंत प्रशासनाच्या योजना पोहोचविण्याचे काम केले जाईल.

'सेवा के रंग राष्ट्र के संग' या उपक्रमात मोठ्या मानवी समूहाच्या माध्यमातून रंगोळी साकारण्याचा उपक्रम होईल. 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज'मध्ये पाच क्षेत्रीय नवोन्मेष स्पर्धा घेण्यात येतील. 'सुशासन सेवा संवाद'अंतर्गत पंचायत ते संसदपर्यंतच्या निवडून आलेल्या प्रतिनिधींचे देशाच्या चार भागांत महाकुंभ आयोजित केले जातील.

गेल्या २५ वर्षांत गुजरात आणि देशात पायाभूत सुविधा, गरिबी निर्मूलन यासह लोकशाही व्यवस्थेतही आमूलाग्र बदल झाल्याचा दावा शाह यांनी केला. २०१४ पूर्वीची भारतीय राजकारणाची दिशा भ्रष्टाचार, जातिवाद आणि परिवारवाद या तीन 'नासूरां'नी ग्रासलेली होती. २०१४ नंतरच्या काळात या तीन प्रवृत्ती मागे पडून देशाची राजकीय दिशा 'पॉलिटिक्स ऑफ परफॉर्मन्स'कडे वळली असल्याचे त्यांनी सांगितले. गेल्या १२ वर्षांत भारताने परराष्ट्र आणि संरक्षण धोरणात 'भारत प्रथम' या भूमिकेचा परिचय जगाला करून दिला. 'फ्रॅजाइल फाइव्ह'मध्ये गणल्या जाणाऱ्या अर्थव्यवस्थेने 'टॉप फाइव्ह'मध्ये स्थान मिळविले असून, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ७.८ टक्के जीडीपी वाढीसह मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारत सर्वाधिक वेगाने वाढत असल्याचे शाह यांनी नमूद केले.

## खुलताबाद तालुक्यातील १६ ग्रामपंचायतींच्या पदभारात बदल

### प्रशासकीय कामकाज करण्यासाठी पंचायत समितीचा आदेश; पुढील आदेशापर्यंत अधिकाऱ्यांकडे प्रशासक म्हणून पदभार

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी( सतोष करपे).खुलताबाद तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी पंचायत समिती प्रशासनाने १६ ग्रामपंचायतींच्या पदभारात बदल केला आहे. संबंधित ग्रामपंचायतींचा पदभार प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी अन्य ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडे पुढील आदेशापर्यंत प्रशासक म्हणून सोपविण्यात आला आहे.

या संदर्भात पंचायत समिती खुलताबादच्या गटविकास अधिकाऱ्यांनी ८ सप्टेंबर २०२६ रोजी एका पत्राद्वारे आदेश जारी केला आहे. या आदेशामागे महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने त्याच दिवशी जारी केलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमांतर्गत अधिसूचनेचा संदर्भ देण्यात आला आहे.

शासनाच्या अधिसूचनेनुसार, ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे आणि प्रशासकीय अडचणींमुळे त्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका झालेल्या नाहीत, अशा ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून नियुक्त करण्यासाठी शासनाला महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदींनुसार अधिकार देण्यात आले आहेत. संबंधित अधिसूचनेत अशा ग्रामपंचायतींवर विस्तार अधिकारी (कृषी), विस्तार अधिकारी (आरोग्य), विस्तार अधिकारी (शिक्षण), विस्तार अधिकारी (पंचायत) किंवा अन्य शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याची तरतूद करण्यात आली आहे. ही व्यवस्था महाराष्ट्र शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा ग्रामपंचायत निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लागू राहणार आहे. या शासन निर्णयाच्या पार्श्वभूमीवर खुलताबाद पंचायत समितीने तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय पदभाराबाबत स्वतंत्र आदेश काढला आहे. आदेशानुसार कागजीपुरा/मावसाळा ग्रामपंचायतीचा पदभार के. एस. गवारे, सराई/सोनखेडा एस. बी. साळुंके, पळसगावचा एन. एस. राजपूत, लोणीचा डी. एम. आदमवाड, वेरुळचा जी. जी. गायकवाड, कसाबखेडाचा पी. जी. घायगावरे, दरेगाव आर. आर. गात आणि खांडी पिंपळगाव एस. पी. लोनकर यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तसेच बोडखा ग्रामपंचायतीचा पदभार एस. डी. गवळी, पाडळीचा एम. एन. गायकवाड, निरगुडी/पिंपरीचा आर. आर. जाधव, देवळाणा/विरमगावचा जी. आर. आधाने, रसूलपुरा जे. यू. नागे, चिंचोलीचा आर. डी. जाधव, बाजारसावंगीचा बी. एम. पाटील आणि गल्हेबोरगावचा पी. बी. बनसोड यांच्याकडे देण्यात आला आहे. दरम्यान, वेरुळ ग्रामपंचायतीच्या अधिकाऱ्याकडे गदाना येथील अतिरिक्त पदभारही पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात आला आहे.

पदभार हस्तांतरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून त्याबाबतची यादी पंचायत समिती कार्यालयात सादर करण्याचे निर्देश गटविकास अधिकारी गिरीश सोनार यांनी संबंधितांना दिले आहेत. आदेशाची अंमलबजावणी संबंधित ग्रामपंचायत अधिकारी आणि सरपंचांनी करावी, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या ८ सप्टेंबर २०२६ रोजीच्या अधिसूचनेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या प्रशासकीय बदलामुळे संबंधित ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज सुरळीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## सौदी अरेबियावर हुतींचा मोठा ड्रोन हल्ला; लष्करी तळाला लक्ष्य केल्याचा दावा, दोन जण जखमी

**रियाद:** मध्य-पूर्वेतील परिस्थिती दिवसेंदिवस अधिक स्फोटक आणि गंभीर होत चालली आहे. इराण आणि अमेरिकेमधील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, आता येमेनमधील हुती (Houthi) बंडखोरांनी सौदी अरेबियावर प्रत्यक्ष हल्ले तीव्र केले आहेत. हुतींनी सौदी अरेबियातील शरूराह येथील एका लष्करी तळाला लक्ष्य करून मोठा ड्रोन हल्ला केल्याचा दावा केला आहे.

हुतींचे लष्करी प्रवक्ते याह्या सारी यांनी टेलिग्रामवर जारी केलेल्या निवेदनातून या हल्ल्याची माहिती दिली. त्यांच्या दाव्यानुसार, या हल्ल्यात मोठ्या प्रमाणावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा वापर करण्यात आला. हुतींनी सौदीच्या लष्करी तळावरील मुख्य शस्त्रसाठा केंद्र आणि कमांड-अँड-कंट्रोल रूमला लक्ष्य करत अचूक वेध घेतल्याचे यात म्हटले आहे. येमेनविरोधात सौदी अरेबियाकडून सुरू असलेल्या कारवाईला हे प्रत्युत्तर असल्याचे सांगत, सौदीने हल्ले न थांबवल्यास आगामी काळात देशाच्या अंतर्गत भागात आणखी घातक हल्ले करण्याचा इशारा बंडखोरांनी दिला आहे.

सौदीच्या नागरी संरक्षण विभागाने या हल्ल्यामुळे झालेल्या नुकसानीची पुष्टी केली आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, येमेनच्या दिशेने डागण्यात आलेले एक प्रक्षेपास्त्र जिझान येथे कोसळले, ज्यामध्ये दोन जण जखमी झाले आहेत. या हल्ल्यामुळे एका स्थानिक मशिदीसह अनेक निवासी इमारती आणि वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

भौगोलिक व सामरिक संघर्ष

यापूर्वी लाल समुद्राच्या प्रवेशद्वाराजवळील बाब-अल-मंदेब सामुद्रधुनीतील सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या मयून बेटावर हुतींनी ताबा मिळवला होता. मोखा बंदर शहरावरील ताबा मिळवण्याच्या प्रत्युत्तरात सौदी अरेबियाने मोखा विमानतळावर जोरदार हवाई हल्ले केले होते. लाल समुद्रातून होणारी तेल आणि गॅसची वाहतूक रोखून किंवा त्यावर ताबा मिळवून अमेरिका आणि जागतिक पातळीवर ऊर्जा किमती वाढवण्याचा हुती व इराणचा हेतू असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## पाण्याची जबाबदारी माझी, तुम्ही फक्त एकरी उसाचे उत्पादन वाढवा : राधाकृष्ण विखे पाटील

**शिर्डी, दि. १३ (प्रतिनिधी):** "कारखान्याच्या कार्यक्षेत्रात उसाचे क्षेत्र वाढले तरच सहकारी साखर कारखान्यांच्या अर्थकारणाला भक्कम पाठबळ मिळणार आहे. पाण्याची जबाबदारी माझी, तुम्ही फक्त एकरी उसाचे उत्पादन वाढवा," असे आवाहन करतानाच, जिल्ह्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी विविध सिंचन प्रकल्पांना महायुती सरकारने मोठा निधी मंजूर केला आहे. नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून गोदावरी खोऱ्यामध्ये पाणी वळविण्याच्या सर्वेक्षणाला मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या ७७ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा डॉ. धनंजयराव गाडगीळ सभागृहात कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी मंत्री विखे पाटील यांनी जिल्ह्यातील पाणी प्रश्नावर सविस्तर भाष्य केले. या सभेस माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, प्रवरा बँकेचे चेअरमन डॉ. भास्करराव खर्डे, ट्रक वाहतूक संस्थेचे चेअरमन नंदू राठी, व्हा. चेअरमन मच्छिंद्र थेटे, सोपानराव शिरसाठ, शांतीनाथ आहेर, अण्णासाहेब कडू, कारखान्याचे कार्यकारी संचालक महेश कोनापुरे यांच्यासह सर्व संचालक आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना ना. विखे पाटील म्हणाले की, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कारखान्याची गाळप क्षमता वाढविण्यात आली आहे. डॉ. सुजय विखे पाटील आणि त्यांच्या सर्व संचालक मंडळाने अतिशय कमी कालावधीत नव्या प्रकल्पाची उभारणी केल्यामुळे यंदा चांगल्या पद्धतीने गाळप करता आले. अशक्य ते शक्य करून दाखविण्याची ताकद ही प्रवरेत असल्यामुळेच आपल्या कारखान्याचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. कारखान्याच्या अर्थकारणाला पाठबळ मिळावे म्हणून केंद्र सरकारच्या मदतीने इथेनॉल आणि 'बायो-सीएनजी' प्रकल्प कार्यान्वित होणार असून, केंद्र सरकारच्या धोरणाप्रमाणे डॉ. विखे पाटील कारखानाही आता उपपदार्थांच्या निर्मितीला गती देईल. केंद्र सरकारने इथेनॉल संदर्भात घेतलेल्या सकारात्मक

## सिल्लोडमध्ये पैठणी उद्योग उभारण्यासाठी आमदार सत्तारांचा पुढाकार

### येवला येथील कापसे पैठणी फॅक्टरीला भेट; रोजगारनिर्मितीच्या संधींचा घेतला आढावा

**सिल्लोड (प्रतिनिधी) दि. १३ :** सिल्लोड-सोयगाव मतदारसंघातील बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सिल्लोड येथे पैठणी उद्योग सुरू करण्यासाठी आमदार अब्दुल सत्तार यांनी पुढाकार घेतला आहे. याच अनुषंगाने त्यांनी येवला, जि. नाशिक येथे कापसे फाउंडेशनच्या 'कापसे पैठणी' फॅक्टरीला भेट देऊन पैठणी उत्पादन प्रक्रिया, उद्योगाचे स्वरूप तसेच रोजगारनिर्मितीच्या संधींची माहिती जाणून घेतली. तसेच आमदार अब्दुल सत्तार यांनी फॅक्टरीतील विणकर कामगारांशी संवाद साधून त्यांच्या कामाची पद्धत, अडचणी तसेच रोजगाराच्या संधींबाबत माहिती जाणून घेतली.



यावेळी कापसे पैठणीचे संचालक बाळकृष्ण कापसे यांनी पैठणी उत्पादनाबाबत सविस्तर माहिती दिली. विशेष म्हणजे या फॅक्टरीमध्ये दिव्यांग, निराधार, मूकबधिर तसेच विधवा महिलांना रोजगार देऊन त्यांना स्वावलंबी करण्याचे काम केले जात असल्याचे आमदार सत्तार यांनी पाहिले. या उपक्रमाचे कौतुक करताना अशा माध्यमातून गरजू महिलांना रोजगाराचा आधार मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सिल्लोड येथील नॅशनल सहकारी सूतगिरणी येत्या काही दिवसांत सुरू होणार असून, त्यानंतर 'कापूस ते कापड' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने पैठणी उद्योग महत्त्वाचा ठरू शकतो. सिल्लोड-सोयगाव परिसरात मोठ्या प्रमाणात गुणवत्तापूर्ण कापसाचे उत्पादन होत असल्याने या उद्योगासाठी स्थानिक पातळीवर अनुकूल वातावरण असल्याची चर्चा यावेळी झाली. आमदार सत्तार यांनी नॅशनल सहकारी सूतगिरणीबाबतही बाळकृष्ण कापसे यांना माहिती दिली.

कापसे पैठणीच्या प्रकल्पाची पाहणी करून हा उपक्रम शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येणार असून, शासनाचे सहकार्य मिळाल्यास महिला, दिव्यांग, निराधार तसेच बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सिल्लोडमध्ये मोठा उपक्रम उभा राहू शकतो, असा विश्वास आमदार सत्तार यांनी व्यक्त केला. सिल्लोड येथे पैठणी उद्योग उभारण्यासाठी यापुढेही सातत्याने पाठपुरावा करण्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, आमदार सत्तार यांनी येवला येथील प्रसिद्ध पंडित पैठणी दुकानालाही सदिच्छा भेट देऊन पैठणी उद्योगातील बाजारपेठ, मागणी आणि ग्राहकांच्या पसंतीबाबत माहिती घेतली.

यावेळी माजी उद्योग संचालक डॉ. जे. के. जाधव, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मनोज राठोड, सिल्लोड शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पाटील तायडे, जिल्हा बँकेचे संचालक अर्जुन पाटील गाढे, माजी पंचायत समिती उपसभापती अजिज शेठ बागवान, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक सयाजीराव वाघ, भोकरदन चे माजी पंचायत समिती सदस्य सोमनाथ हराळ, शकील जहागिरदार, रिजवान शेख आदी उपस्थित होते.

## ऑनलाइन ॲपवरून मैत्री करून निर्जनस्थळी बोलावून लुटणारी टोळी जेरबंद

**अहिल्यानगर :** ऑनलाइन ॲपच्या माध्यमातून मैत्री करून भेटण्यासाठी निर्जनस्थळी बोलावून मारहाण करत लुटमार करणाऱ्या तिघांना कोतवाली पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी आरोपींकडून एक ॲक्सेस मोटारसायकल, दोन मोबाईल फोन आणि १२ हजार ५०० रुपये रोख असा एकूण १ लाख २ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.



याबाबत लोणी सय्यदमीर, ता. आष्टी, जि. बीड येथील एका व्यक्तीने ५ सप्टेंबर २०२६ रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. फिर्यादीनुसार, आरोपींनी मोबाईलमधील Grindr ऑनलाइन ॲपच्या माध्यमातून त्यांच्याशी मैत्री केली. त्यानंतर ४ सप्टेंबर रोजी लिंक रोड, केडगाव येथे भेटण्यासाठी त्यांना बोलावण्यात आले.

फिर्यादी तेथे भेटण्यासाठी गेले असता आरोपींनी संगनमत करून त्यांना लाकडी दांड्याने मारहाण केली. त्यानंतर त्यांच्या खिशातील ७ हजार ५०० रुपये रोख तसेच PhonePe ॲपच्या माध्यमातून ५ हजार रुपये, असे एकूण १२ हजार ५०० रुपये बळजबरीने काढून घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ८५२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे तपास करीत आहेत.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाला तपासाच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा शोध घेतला.

तपासादरम्यान यश मनोज भिंगारदिवे (वय २१, रा. संजयनगर, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर), सिद्धांत दत्तात्रय जगताप (वय २२) आणि सुमीत संजय गायकवाड (वय २२, दोघे रा. रेल्वे स्टेशन, इंगळे वस्ती, अहिल्यानगर) यांचा गुन्ह्यात सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख आणि पथकाने सापळा रचून तिन्ही आरोपींना शिताफीने अटक केली. आरोपींकडून एक ॲक्सेस मोटारसायकल, दोन मोबाईल फोन आणि १२ हजार ५०० रुपये रोख असा एकूण १ लाख २ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या गुन्ह्यात आणखी साथीदार आहेत का, याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे करीत आहेत.

## गांजा प्रकरणातील फरार आरोपी ओडिशातून अटक; कन्नड न्यायालयाकडून दोन दिवसांची पोलिस कोठडी

तभा वृत्तसेवा

**कन्नड :** दि.१३ सप्टेंबर - गांजा तस्करीप्रकरणी कन्नड शहर पोलिस ठाण्यात २०२५ मध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यात तब्बल वर्षभरापासून फरार असलेल्या आरोपीस पोलिसांनी ओडिशा राज्यातून अटक केली. अमनपाल सुशांतपाल (रा. मोहना, ओडिशा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

कन्नड शहर पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यातील कलम ८, २०, २५ आणि २९ अंतर्गत गांजाप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात अमनपाल सुशांतपाल हा आरोपी फरार होता. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू होते. अखेर पोलिस पथकाने तपासाच्या आधारे आरोपीचा ओडिशा राज्यातील मोहना येथे ठावठिकाणा शोधून काढत त्याला अटक केली.



ही कारवाई पोलिस अधिक्षक प्रकाश जाधव,सहाय्यक पोलिस अधिक्षक अपराजिता अग्निहोत्री, तसेच परिविक्षाधीन पोलिस उपअधीक्षक आरती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोलिस उपनिरीक्षक केसरसिंग जारवाल, सहायक पोलिस उपनिरीक्षक संतोष पाटील, पोलिस कॉन्स्टेबल विजय चौधरी, पोलिस कॉन्स्टेबल कृष्णा माळी यांच्या पथकाने ओडिशा राज्यात जाऊन ही कारवाई केली.

अटक करण्यात आलेल्या आरोपीस कन्नड येथील दिवाणी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. गांजा प्रकरणातील आरोपीची भूमिका, गुन्ह्यातील इतर सहभागी व्यक्ती तसेच अमली पदार्थांच्या व्यवहारासंदर्भातील अधिक माहिती तपासातून समोर येण्याची शक्यता आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास कन्नड शहर पोलिस करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## राष्ट्ररक्षा

ब्रिगेडियर हेमंत महाजन/९०९६७०१२५३

# यूएसएस अब्राहम लिंकन संकट



अमेरिकेचे विमानवाहू युद्धनौकादल हे जगातील सर्वांत शक्तिशाली लष्करी साधन मानले जाते. परंतु अलिकडील काळात यूएसएस अब्राहम लिंकन या विमानवाहू नौकेच्या विक्रमी नऊ महिन्यांच्या तैनातीमुळे अमेरिकन नौसैनिकांमध्ये निर्माण झालेला थकवा, मानसिक ताण आणि मनोबलातील घसरण यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न समोर आला आहे- अत्याधुनिक शस्त्रे, प्रचंड अर्थव्यवस्था आणि जागतिक सामर्थ्य असूनही दीर्घकालीन युद्ध किंवा सततची तैनाती एखाद्या महासत्तेलाही कमकुवत करू शकते का?

यूएसएस अब्राहम लिंकनवरील परिस्थिती केवळ एका जहाजाची समस्या नाही. ती आधुनिक युद्धातील मानवी घटक, लष्करी सहनशक्ती, लॉजिस्टिक्स, पुरवठा साखळी आणि सैनिकांच्या मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करते. याचे परिणाम केवळ मध्यपूर्वेतच नाहीत, तर संपूर्ण इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील सामरिक संतुलनावर दिसत आहेत.

**दीर्घ तैनातीमुळे निर्माण झालेला थकवा**

सामान्यतः अमेरिकन विमानवाहू नौकांची तैनाती सहा ते सात महिन्यांची असते. परंतु मध्यपूर्वेतील वाढत्या तणावामुळे यूएसएस अब्राहम लिंकन आणि तिच्या युद्धगटाला जवळपास नऊ महिने समुद्रात राहावे लागले. अनेक नौसैनिकांनी सलग २५० दिवसांपेक्षा अधिक काळ कोणत्याही महत्त्वाच्या बंदरभेटीशिवाय समुद्रात वेळ घालवला.

समुद्रातील जीवन हे अत्यंत कठीण असते. मर्यादित जागा, सततची ड्युटी, कुटुंबापासून दूर राहणे, युद्धसज्जतेचा ताण आणि बंदिस्त वातावरण यामुळे मानसिक तणाव वाढतो. त्यातच अन्नपुरवठा, स्वच्छ पाणी, निवासव्यवस्था आणि स्वच्छतागृहांशी संबंधित समस्या निर्माण झाल्यास परिस्थिती अधिकच गंभीर बनते.

दीर्घकाळ चालणाऱ्या अशा तैनातीमुळे सैनिकांमध्ये थकवा, चिडचिड, निर्णयक्षमता कमी होणे आणि कार्यक्षमतेत घट दिसून येते. आधुनिक युद्धात प्रगत तंत्रज्ञान महत्त्वाचे असले तरी त्याचे संचालन करणारा सैनिकच निर्णायक असतो. सैनिक मानसिकदृष्ट्या खचला तर अत्याधुनिक शस्त्रास्त्रेदेखील अपेक्षित परिणाम देऊ शकत नाहीत.

**मानसिक आरोग्य आणि मनोबलाचा प्रश्न**

अमेरिकन नौदलातील काही अहवालांमध्ये आत्महत्येचे विचार, नैराश्य आणि जहाजावरून उडी मारण्याचे प्रयत्न यासारख्या गंभीर घटनांचा उल्लेख आढळतो. जरी अमेरिकन नौदलाने अशा अहवालांचे महत्त्व कमी करून दाखवण्याचा प्रयत्न केला असला, तरी अमेरिकन संसदेतील काही सदस्यांनी या विषयावर चिंता व्क्त केली आहे.

युद्धशास्त्रातील एक मूलभूत तत्त्व सांगते की 'मनोबल हे युद्धातील अदृश्य शस्त्र आहे.' दुसऱ्या महायुद्धात ब्रिटनने जर्मनीविरुद्ध आणि व्हिएतनाम युद्धात उत्तर व्हिएतनामने अमेरिकेविरुद्ध टिकून राहण्यामागे केवळ लष्करी क्षमता नव्हे तर सैनिक आणि समाजाचे मनोबल हे महत्त्वाचे कारण होते.

यूएसएस अब्राहम लिंकनवरील परिस्थिती दर्शवते की, मानवी सहनशक्तीची मर्यादा ओलांडली गेल्यास युद्धक्षमता घटते. थकलेल्या सैनिकांकडून चुका होण्याची शक्यता वाढते. विमान उड्डाणे, क्षेपणास्त्र प्रणाली, रडार ऑपरेशन्स किंवा समुद्री नाकेबंदी यासारख्या जटिल मोहिमांमध्ये अशा चुका गंभीर परिणाम घडवू शकतात.

**अमेरिकेच्या लष्करी कार्यक्षमतेवर परिणाम**

मध्यपूर्वेत इराण आणि त्याच्या समर्थित गटांविरुद्ध अमेरिकेला सातत्याने समुद्री उपस्थिती राखावी लागत आहे. लाल समुद्रातील हूथी हल्ले, इस्त्रायल-इराण संघर्ष आणि आखाती प्रदेशातील अस्थिरता यामुळे अमेरिकन नौदलावर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे.

या परिस्थितीत युद्धसामग्रीचा वापर मोठ्या प्रमाणात झाला आहे. क्षेपणास्त्रे, दारुगोळा आणि इतर सामग्रीची पुनर्भरण प्रक्रिया अपेक्षेपेक्षा अधिक वेळखाऊ आणि खर्चिक ठरत आहे. पुरवठा साखळीवरील ताणामुळे नौदलाच्या दीर्घकालीन मोहिमांवर परिणाम होऊ शकतो.

सैनिकांचा थकवा आणि संसाधनांवरील ताण यामुळे अमेरिकेच्या जागतिक प्रतिसाद क्षमतेवर मर्यादा येतात. जगभरात एकाच वेळी अनेक संकटांना तोंड देण्याची क्षमता ही अमेरिकेच्या सामरिक शक्तीची ओळख राहिली आहे. परंतु जर एका प्रदेशातील संघर्षामुळे मोठ्या प्रमाणावर सैन्य आणि साधने गुंतून राहिली, तर इतर भागांतील उपस्थिती कमकुवत होण्याची शक्यता वाढते.

**इंडो-पॅसिफिकमध्ये सामरिक पोकळी**

अमेरिकेचे लक्ष मध्यपूर्वेकडे वळल्याने इंडो-पॅसिफिक प्रदेशातील उपस्थितीवर परिणाम होत असल्याची चिंता आहे. दक्षिण चीन समुद्र, तैवान सामुद्रधुनी आणि पश्चिम पॅसिफिक हे चीन-अमेरिका स्पर्धेचे केंद्रबिंदू आहेत. जर अमेरिकेचे विमानवाहू नौकादल मध्यपूर्वेत अडकून राहिले, तर चीनला या प्रदेशात तुलनेने अधिक स्वातंत्र्य मिळू शकते. चीनने गेल्या दशकात दक्षिण चीन समुद्रात कृत्रिम बेटे उभारून त्यांचे लष्करी तळांमध्ये रूपांतर केले आहे. धावपट्ट्या, क्षेपणास्त्रे प्रणाली, रडार नेटवर्क आणि नौदल सुविधा उभारून चीनने या भागात आपली उपस्थिती मोठ्या प्रमाणात वाढवली आहे.

अमेरिकन उपस्थिती कमी झाल्याचा फायदा घेत चीन आपल्या दाव्यांना अधिक आक्रमकपणे पुढे रेटू शकतो. व्हिएतनाम, फिलिपाईन्स आणि मलेशिया यासारख्या देशांवर दबाव वाढू शकतो. चीनची सागरी मिलिशिया आणि कोस्ट गार्ड जहाजे आधीच या भागात मोठ्या प्रमाणावर सक्रिय आहेत.

**दक्षिण चीन समुद्राचे वाढते महत्त्व**

दक्षिण चीन समुद्रातून दरवर्षी ट्रिलियन्स डॉलर्स किमतीचा जागतिक व्यापार होतो. भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी आणि पूर्व आशियाशी व्यापारासाठीही हा सागरी मार्ग महत्त्वाचा आहे.

जर चीनने या भागावर प्रभावी नियंत्रण प्रस्थापित केले, तर त्याचा परिणाम केवळ अमेरिकेवरच नव्हे तर भारत, जपान, दक्षिण कोरिया आणि आशियान देशांवरही होईल. मुक्त नौकानयनाचा सिद्धांत कमकुवत झाला तर जागतिक व्यापार साखळीवर परिणाम होऊ शकतो.

सध्या सुरू असलेल्या रशिया-युक्रेन युद्धात तणाव वाढत असताना, रशिया दर महिन्याला युक्रेनमध्ये सुमारे ६,००० अधिक सैनिक गमावत आहे, जेवढे ते भरती करू शकत नाहीत. मॉस्को दर महिन्याला सुमारे १,००० सैनिकांची भरती करीत आहे, परंतु हा वेग युद्धात ठार झालेल्या किंवा जखमी झालेल्यांची जागा भरण्यासाठी अपुरा आहे. रशियाला युद्धात होणाऱ्या हानी आणि ते भरती करू शकणाऱ्या संख्येमध्ये सध्या दर महिन्याला सुमारे ६,००० सैनिकांचा तफावत आहे.

**राजकीय आणि आर्थिक धोका**

सैनिकांची सक्तीची भरती रशियासाठी राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या मोठा धोका ठरू शकतो. अशा प्रकारची शेवटची भरती २०२२ च्या शरद ऋतूत झाली होती, ज्यामुळे सुमारे दशलक्ष रशियन नागरिक (बहुतेक उच्च कौशल्य असलेले) देश सोडून गेले होते, त्यापैकी निम्म्याहून कमी परतले.

**रशियन सैन्यासमोरील आव्हान**

रशियन सैन्याला शेकडो-हजारो नवीन भरती झालेल्या सैनिकांना सामावून घेता येईल का, हे अद्याप स्पष्ट नाही. कारण उपकरणे आणि अधिकाऱ्यांची कमतरता आहे. युक्रेनने वारंवार रशियन तेलाशी संबंधित लक्ष्यांवर हल्ले केले आहेत, ज्यामुळे इंधनाची टंचाई निर्माण झाली आहे.

**युद्धात सैनिकांची संख्या कमी होत आहे**

रशिया, अमेरिका आणि इस्त्रायल यासारख्या देशांनाही युद्धामुळे मोठ्या प्रमाणावर सैन्यकर्मी कमी भासत आहेत. त्यामुळे दीर्घकालीन युद्धासाठी प्रशिक्षित सैनिकांचा पुरवठा राखणे अत्यावश्यक आहे. भारतात रिटायर झालेले अग्निवीर सैनिक मोठ्या प्रमाणावर राखीव सैनिक म्हणून दीर्घकालिन युद्धासाठी सामील केले जाऊ शकतात.

**निष्कर्ष**

यूएसएस अब्राहम लिंकनवरील संकट हे आधुनिक युद्धातील एक महत्त्वाचे वास्तव उघड करते. मानवी सहनशक्ती, मनोबल आणि लॉजिस्टिक्स या घटकांकडे दुर्लक्ष केल्यास महासत्तादेखील अडचणीत येऊ शकते. अत्याधुनिक विमानवाहू नौका, क्षेपणास्त्रे आणि तंत्रज्ञान असूनही थकलेले सैनिक आणि तणावग्रस्त दल दीर्घकाळ प्रभावीपणे कार्य करू शकत नाहीत.

अमेरिकेच्या या अनुभवातून भारताने स्पष्ट धडा घ्यायला हवा. भविष्यातील संघर्ष दीर्घकालीन, बहुआयामी आणि संसाधन-केंद्रित असतील. त्यामुळे मजबूत लॉजिस्टिक्स, पुरेशा युद्धसाठ्यांची उपलब्धता, सैनिकांचे रोटेशन, मानसिक आरोग्य व्यवस्थापन आणि विश्वसनीय भागीदारी हे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेचे प्रमुख स्तंभ असतील.

युद्धातील विजय केवळ रणांगणावर नव्हे, तर सैनिकांच्या मनात, पुरवठा साखळीत आणि राष्ट्राच्या दीर्घकालीन सहनशक्तीत घडतो आणि हाच यूएसएस अब्राहम लिंकनच्या अनुभवातून भारताने शिकण्यासारखा सर्वांत मोठा धडा आहे.

## भारतासाठी महत्त्वाचे धडे

**दीर्घकालीन युद्धासाठी लॉजिस्टिक क्षमता :** रशिया-युक्रेन युद्ध, गाझा संघर्ष आणि यूएसएस अब्राहम लिंकनचा अनुभव एकच गोष्ट स्पष्ट करतात. युद्ध केवळ रणांगणावर जिंकले जात नाही; ते पुरवठा साखळी आणि लॉजिस्टिक्सवर जिंकले जाते.

भारताने दारुगोळा, क्षेपणास्त्रे, इंधन आणि सुटे भाग यांचा दीर्घकालीन साठा निर्माण करणे आवश्यक आहे. स्वदेशी संरक्षण उत्पादन वाढवून युद्धकाळातील बाह्य अवलंबित्व कमी करणे आवश्यक आहे.

**सैनिकांच्या रोटेशनची प्रभावी व्यवस्था :** लडाख, सियाचीन, जम्मू-काश्मीर आणि ईशान्य भारतातील तैनाती दीर्घकालीन स्वरूपाच्या असतात. त्यामुळे सैनिकांचे नियमित रोटेशन, विश्रांती आणि पुनर्वसन यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

मानवी संसाधन व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष केल्यास सैनिकांचा थकवा युद्धक्षमता कमी करू शकतो. आधुनिक युद्धात सैनिकाचे मानसिक आरोग्य हे शस्त्रास्त्रांइतकेच महत्त्वाचे बनले आहे.

**मानसिक आरोग्य आणि मनोबल :** भारतीय सशस्त्र दलांनी मानसिक आरोग्य कार्यक्रम, समुपदेशन, कुटुंबीयांशी संपर्क व्यवस्था आणि ताण व्यवस्थापन यावर अधिक भर देणे आवश्यक आहे.

भविष्यातील युद्धे अधिक प्रदीर्घ आणि बहुआयामी असण्याची शक्यता आहे. त्यामुळे सैनिकांचे मनोबल टिकवून ठेवणे ही राष्ट्रीय सुरक्षेची गरज आहे.

**इंडो-पॅसिफिक भागीदारी अधिक बळकट करणे :** भारताने जपान, ऑस्ट्रेलिया, व्हिएतनाम, फिलिपाईन्स आणि अमेरिकेसोबतचे संरक्षण सहकार्य अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. समुद्री सराव, माहितीची देवाणघेवाण आणि सागरी क्षेत्र जागरूकता यांचा विस्तार करणे गरजेचे आहे. विशेषतः व्हिएतनाम आणि फिलिपाईन्स यांच्यासोबत संरक्षण सहकार्य वाढवणे हे दक्षिण चीन समुद्रातील सामरिक संतुलनासाठी उपयुक्त ठरू शकते.

## मंथन

डॉ. विवेक राजे/९८८१२४२२२४

# आंदोलन संपले...पुढे काय?



जवळजवळ एक महिन्यांपेक्षा जास्त काळ चाललेले सीजेपीचे जंतरमंतरवरील आंदोलन २६ जुलैला मांनव संसाधन मंत्री असलेल्या धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेऊन संपले. त्यानिमित्ताने अनेक गोष्टी भारतीय आणि त्यातही हिंदू समाजाला स्पष्ट झाल्या. हे आंदोलन एनईईटी या राष्ट्रीय पातळीवर घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षेचे पेपर फुटल्याने विद्यार्थ्यांनी केले होते, असा दावा सीजेपीकडून केला गेला. पण हे नक्की विद्यार्थ्यांचे आंदोलन होते का, असा प्रश्न सामान्य माणसाला पडण्याजोगे वातावरण आणि घटना देशभरात घडताना दिसत आहेत. कारण ही परिक्षा भारतातील वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी घेतली जाणारी प्रवेश परीक्षा आहे. या परीक्षेला देशभरातून साधारणपणे २० ते २२ लाख विद्यार्थी दरवर्षी बसतात. यातील अर्धे विद्यार्थी जरी या परिक्षेद्वारे प्रवेश घेण्यासाठी पात्र ठरत असले, तरी एमबीबीएस या अभ्यासक्रमासाठी देशभरातील एकूण जागा फक्त १ लाख ३५ हजार आहेत. त्यामुळे येथे अतिशय तीव्र गळेकापू स्पर्धा दिसून येते. या असलेल्या स्पर्धेमुळे देशभरातून या परीक्षेची तयारी करून घेणाऱ्या कोचिंग क्लासेसचे एक जाळे तयार झाले आहे. या कोचिंग क्लासेसमध्येही आपसात प्रचंड स्पर्धा आहे. याला कारण या कोचिंग क्लासेसना प्रवेश घेताना यांच्या किती विद्यार्थ्यांना एमबीबीएस अभ्यासक्रमाला प्रवेश मिळाला, याचा आढावा पालक आणि विद्यार्थी घेतच असतात. प्रत्येक कोचिंग सेंटर प्रत्येक विद्यार्थ्यांकडून अडीच ते पाच लाख शुल्क घेतात. परिणामतः आज या खाजगी कोचिंग क्लासची वार्षिक उलाढाल साधारण २ लाख कोटींची आहे. त्यामुळे इथे सगळ्या अपप्रवृत्ती सुखनैव नांदत आहेत. यात या देशातील अनेक शिक्षण संस्थाचालक आणि कोचिंग क्लासेसच्या संचालकांची असलेली साठगाठ आहे. ती कोणतीही व्यवस्था उद्ध्वस्त करू शकण्याची ताकद ठेवते, हे इथे लक्षात घेतली पाहिजे.

या आंदोलनाच्या निमित्ताने आपल्या सगळ्यांपुढे उघडी पडली ती 'जेन झी'ची मूल्य व्यवस्था. या पिढीच्या एकूणच मूल्यव्यवस्थेचा विचार करण्याची आज गरज निर्माण झाली आहे. सुरुवात करायची तर कनिष्ठ महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेपासून विचार करायला हवा. मुळात सुस्थापित असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयानी एखाद्या कोचिंग क्लासबरोबर टाय अप करावे का? अशा शाळा महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना कोचिंग क्लासेसमध्ये हजर राहावे, इकडे फक्त प्रात्यक्षिकांसाठी यावे, अशी सवलत द्यावी का? त्याच महाविद्यालयांनी परीक्षेचे निकाल आल्याबरोबर याच क्लासेसला जाऊन परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवलेले विद्यार्थी आमचेच म्हणून सर्व प्रसिद्धी माध्यमातून मिरवावे का? जे श्रेय महाविद्यालयाचे नाही, ते श्रेय समाजात प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या संस्था आणि प्राचार्यांसह शिक्षकांनी घेणे कितपत योग्य आहे. शिक्षक परिणामकारकपणे अभ्यासक्रम शिकवू शकत असतील, तर ते आणि त्यांच्या संघटना यावर गप्प का आहेत? यातून आपण कोणती मूल्य व्यवस्था पुढील पिढीकडे हस्तांतरित करीत आहोत. मुलांचे पालक या सगळ्या प्रकाराकडे डोळेझाक का करीत असतात? आज कोणीही पालक या सगळ्या प्रकाराबद्दल आवाज उठवताना दिसत नाहीत. शाळा-महाविद्यालयांनी शुल्क वाढवले म्हणून आंदोलन करणारे पालक आणि विद्यार्थी संघटना कोचिंग क्लास शुल्क वाढीवर नाराजी देखील व्यक्त करताना दिसत नाहीत. आज कोचिंग क्लासेस कनिष्ठ महाविद्यालयांची तैनाती फौज झालेली आहे. दुर्दैवाने शिक्षण खाते, शिक्षण संस्था, सरकार, सगळे राजकीय पक्ष यांना या स्थितीची संपूर्ण जाणीव आहे. सुधारणा करण्यासाठी पुढाकार मात्र कोणीही घेताना दिसत नाही.

या आंदोलनाच्या काळात विद्यार्थी म्हणून आंदोलन स्थळी असलेल्या काही मुलामुलींचे व्हिडीओ समाजमाध्यमातून फिरताना दिसत आहेत. जे या व्हिडीओंमधे दिसतात, ते मुळात विद्यार्थी आहेत का, हा प्रश्न आहे. पण यावर सगळा मीडिया मौन धारण करून बसला आहे. काही युट्यूबर्स यावर बोलले. ते सगळे उजव्या विचारसरणीचे आहेत. मात्र, आंदोलनात सहभागी असलेल्या राजकीय पक्षांना, फडतूस विचारवंतांना, विद्यार्थी संघटनाना, डाव्या विचारसरणीच्या युट्यूबर्सना, आंदोलनातील ओंगळ बिभत्स प्रदर्शनाला उत्स्फूर्त म्हणून कौतुक करणाऱ्या संपादकांना या आंदोलनातील बिभत्स प्रकार दिसलेच नाहीत का? दिसले असले आणि नसले तरी त्यांचे याकडे दुर्लक्ष करणे हे त्यांच्याही घसरलेल्या मूल्य व्यवस्थेचे लक्षण नाही का?

लोकशाहीमध्ये आंदोलनाचा अधिकार सगळ्यांना आहे. परंतु, आंदोलन करताना सातत्याने जागृत ठेवलेला निरक्षर विवेक ही आंदोलनकर्त्यांची खरी ताकद असते आणि त्या दरम्यान घडणाऱ्या सगळ्या घटनांची जबाबदारी आपली आहे, याची जाणीव नेतृत्वाने ठेवायची असते. पेपरफुटीची जबाबदारी शिक्षणमंत्र्यांची असेल, तर आंदोलनात घडणाऱ्या चांगल्या-वाईट घटनांची जबाबदारी आंदोलनाच्या नेतृत्वाचीच असते. आंदोलनाचा मार्ग योग्यच असला पाहिजे आणि त्यासाठी साधन सुचिता राखलीच गेली पाहिजे, याकडे नेतृत्वाने विशेष लक्ष देणे आवश्यक असते. चौरीचौरा हिंसाचाराने व्यथित होऊन गांधीजींनी आंदोलन मागे घेतले होते, याची इथे विशेषत्वाने आठवण होते. आपल्या खांद्यावरून बंदूक कोण चालवतय, याचे भान विद्यार्थी नेत्यांनी राखले नव्हते. आपले आंदोलन हायजॅक होत आहे, हे लक्षात घेऊन, या हायजॅकर्सवर आंदोलनाच्या नेतृत्वाने प्रतिबंध लादले नव्हते. आंदोलनाच्या ठिकाणी कोणत्या घोषणा दिल्या जाव्यात, आंदोलनात सहभागी असलेल्या आंदोलनकर्त्यांनी कशाप्रकारचे रिल्स सोशल मीडियावर टाकाव्या, याकडे नेतृत्वाने लक्ष देणे आवश्यक होते. नेतृत्व करणे म्हणजे मंचावर बसून फक्त लोकांना घोषणा द्यायला लावणे नसते; तर आंदोलन परिसरातील प्रत्येक हालचालीवर नजर असणे, अयोग्य भाषा, कृती, नियंत्रीत करणे म्हणजे नेतृत्व करणे, ही समज या आंदोलन नेतृत्वाला नव्हतीच. पण या आंदोलनाला भेट देणारे, सल्लामसलत करणारे विविध समाजसेवक राजकीय पक्षांचे नेते आणि उपोषण करते यांनाही नव्हती. अन्यथा त्यांनी त्यावर काही कृती निश्चितच केली असती.

त्यामुळे आजचा विद्यार्थी हा उद्याच्या भारताचा नागरिकच नव्हे, तर लोकशाहीचा भावी संरक्षक आहे, याची जाणीव विद्यार्थी नेते व केजरीवाल, योगेंद्र यादव यांच्यासारख्या लोकांनी ठेवायला हवी होती. हीच जाणीव विद्यार्थी उन्मादाला उत्स्फूर्तता म्हणाऱ्या संपादकांनी देखील ठेवली नाही, हे या देशाचे दुर्दैव होय.

यात सर्वाधिक दुर्लक्षित राहिलेला आणि मोठ्या प्रमाणावर जबाबदार असलेला घटक म्हणजे पालक होते. आपल्या मुलांची सार्वजनिक ठिकाणची वागणूक पालकांनी सुनिश्चित करायची असते. आज दुर्दैवाने पालकत्वाच्या जबाबदारीचा विचारच कोणी करायला तयार नाही. जगाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी आपल्या पाल्याचे, 'मन, मनगट आणि मेंदू' तयार करण्याची जबाबदारी नैसर्गिकरीत्या पालकांची असते. पण आपण स्वतःच ऐशोआरामाच्या चुकीच्या संकल्पना उराशी बाळगून आयुष्यभर एका विकृत पिढीला नकळत आकार देत आहे, याची साधी जाणीवही पालकांनी ठेवलेली नाही, असे दिसते. सोशल मीडियाचा प्रचंड प्रभाव असलेल्या आजच्या काळात हिंमत आणि धैर्य, शौर्य आणि क्रौर्य, बिभत्स आणि वीर अशा अनेक संकल्पना आपल्या कृतीने 'जेन झी' ला समजावून सांगण्याची जबाबदारी पालकांचीच आहे. एखादी चळवळ किंवा आंदोलन आणि राजकीय वा प्रशासनीक विषयाचे बिभत्स विकृतीकरण यातला भेद आपल्या जगण्यातूनच 'जेन झी'ला दाखवून देण्याची जबाबदारी या पालकांवर आहे. पण आजचा पालक आपणच जन्माला घातलेल्या मुलांना वेळ देऊन आकार देण्यास तयार नाही. या विदारक चित्राकडे सर्वच समाजाने कृतीशील दृष्टीने पाहाणे ही काळाची गरज आहे.

गेल्या महिन्या-दीड महिन्यात वातावरण बदलू लागले आहे. संसदेत पेपरफूटविरोधी विधेयक मंजूर झाले आहे. सुप्रीम कोर्टाने गुन्हेगारी पृष्ठभूमी असलेल्या आंदोलकांना दिलासा दिलेला नाही. त्यावर, आम्हाला सुप्रीम कोर्टाचा निर्णय मान्य नाही, अशी भूमिका या बिभत्स व विकृत नेतृत्वाने घेतली होती. मात्र, आज या अराजकतावादी आंदोलकर्त्यांचा जोम ओसरलेला दिसतो आहे. आमच्या देशातील लोकशाहीच्या विविध संस्थांची निर्मिती अत्यंत गांभीर्याने आणि विचारपूर्वक केली गेली आहे. मागील ७० वर्षांत प्रत्येक पिढीने या संस्थांच्या प्रतिष्ठेत भर घालताना त्यात सुधारणा केलेली आढळते. त्यामुळेच कष्टाने निर्माण केलेल्या आमच्या लोकशाही व्यवस्थेच्या विविध संस्थांची प्रतिष्ठा राखण्याची जबाबदारी हेच आज भारतीय समाजापुढील आव्हान आहे. पण देशातील विरोधी पक्ष आणि सीजेपीसारख्या कोणतेही विधिनिषेध नसलेल्या लोकांना याची जाण आहे का आणि नसल्यास कोण करून देईल, हाच खरा प्रश्न आहे.

## अपमानाचे राजकारण

(पान I वरून)

तथापि, हे विसरता कामा नये की कोणत्याही समाजाचे किंवा राष्ट्राचे चारित्र्य कायद्याने नव्हे, तर नैतिकतेने घडते. म्हणून जेव्हा शब्द आत्मसन्मानाला धक्का पोहोचवणारे शस्त्र बनतात आणि समाज रणांगण बनतो, तेव्हा त्याचा प्रतिकार कसा करायचा, हे समजून घेणे आवश्यक आहे.

प्रतीकात्मक संताप आणि राजकारण

या टप्प्यावर प्रतीकात्मक संतापाचे राजकारण समजून घेणे महत्त्वाचे आहे. या राजकारणाचा पहिला टप्पा खूप सोपा आहे. असा विषय निवडा ज्याच्याशी मोठ्या संख्येने लोकांचे भावनिक नाते आहे. जसे, एखादे राष्ट्रीय प्रतीक, धार्मिक श्रद्धा, एखादा महान पुरुष, ऐतिहासिक बलिदान किंवा सामूहिक स्मृती. मग, त्याबद्दल असे विधान केले जाते, जे तीव्र प्रतिक्रिया निर्माण करू शकेल.

यानंतर एक छोटा व्हिडीओ, एक ओळ किंवा काही शब्द सोशल मीडियावर पसरतात आणि संपूर्ण विधानाची जागा घेतात. काही तासांतच चर्चा प्रत्यक्षात काय बोलले गेले यावरून भरकटते. शब्द किंवा प्रतीकांमुळे झालेल्या आघाताच्या तीव्रतेची एक नवीन जाणीव निर्माण होते.

एका व्यक्तीला झालेली इजा ही संपूर्ण समाजाची इजा बनते. अशा परिस्थितीत काही राजकीय व्यक्ती वारंवार पुढे येतात. हे विसरू नका की, जे मलमऐवजी मीठ विकतात, तेच संतापाचे राजकारण करतात. मग येतो सर्वांत धोकादायक टप्पा. लोक प्रतिक्रिया देऊ लागतात. बरेच जण वस्तुस्थिती मांडतात. काही जण शांततेने निषेध करतात. काही जण कायदेशीर कारवाईची मागणी करतात. पण काही जण रागाच्या भरात असभ्य भाषा वापरू लागतात. काही जण धमक्या देण्यापर्यंत मजल मारतात. काही जण कायदा हातात घेण्याबद्दल बोलतात. इथेच संपूर्ण कथेला कलाटणी मिळू शकते.

समजा, एखाद्या व्यक्तीने असे विधान केले, ज्यामुळे लाखो लोकांच्या भावना दुखावल्या जातात. जर कोणी निषेध म्हणून हिंसेचा मार्ग अवलंबला, तर दुसऱ्या दिवशी मूळ विधान झाकोळले जाईल. भारतातील आणि जगातील मुख्य बातमी ही असू शकते की, एखाद्या कलाकारावर, नेत्यावर किंवा वक्त्यावर त्यांची मते व्यक्त केल्याबद्दल हल्ला झाला.

ज्या व्यक्तीच्या विधानामुळे वाद निर्माण झाला, तिला पीडित म्हणून पाहिले जाईल आणि ज्याने दुखावल्यामुळे कायदा मोडला, त्याला आरोपी म्हणून पाहिले जाईल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, ठिणगी दुसऱ्या कोणीतरी पेटवली, पण घराला आग आपण स्वतःच लावली. हीच गोष्ट समाजाने सर्वांत जास्त समजून घेणे आवश्यक आहे.

एखाद्या प्रक्षोभक विधानाची खरी ताकद केवळ त्या विधानातच नसते; त्याची ताकद आपल्या प्रतिक्रियेतही असते. जर कोणी आपल्या रागावर नियंत्रण ठेवले, तर तो राग काही काळासाठी आपल्या वर्तनाला दिशा देऊ लागतो. त्यामुळे, रागावणे आणि रागाच्या आहारी जाणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

हे राजकारण भारतासाठी आणखी धोकादायक आहे, कारण आपल्या समाजात आधीच अनेक दरी आहेत. जात आणि आरक्षण, उच्च जाती आणि वंचित, वेगवेगळे धर्म, उत्तर आणि दक्षिण, हिंदी आणि इतर भारतीय भाषा, जुनी पिढी आणि तरुण पिढी. अगदी एकाच जाती, धर्म किंवा समुदायातही राजकीय ओळखीच्या आधारावर कटुतेच्या रेषा आखल्या जात आहेत. अशा परिस्थितीत, उपद्रवी लोकांसाठी फक्त एका नव्या ठिणगीची गरज असते. मग सोशल मीडिया आपले काम करते. अपूर्ण माहिती, छोटे व्हिडीओ, अपमानकारक टिप्पण्या आणि संतप्त प्रत्युत्तरे. बघता बघता समाज दोन गटांमध्ये विभागलेला दिसतो. हळूहळू, मतभेद हे मतांचे नव्हे, तर ओळखीचे युद्ध बनते.

**समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची**

हा क्षण आणि ही घडामोड कोणत्याही समाजासाठी सर्वांत धोकादायक वळणबिंदू आहे. नागरी संघर्ष नेहमीच रणगाडे आणि बंदुकांनी सुरू होत नाही. आधी समाजाची भाषा बदलते. मग, मतभेदाचे रूपांतर शत्रुत्वात होते. मग, समोरची व्यक्ती माणूस म्हणून कमी आणि शत्रू म्हणून जास्त दिसू लागते. त्यानंतर हिंसेची कारणे आणि समर्थन शोधले जाते. देश कितीही शक्तिशाली असला तरी, जर अंतर्गत सामाजिक विश्वास तुटला, तर राष्ट्रीय शक्ती कमकुवत होते. सैन्य सीमेचे रक्षण करू शकते. सरकार दहशतवादाविरोधात मोहीम राबवू शकते. पोलिस गुन्हेगारांना पकडू शकतात. पण कोणतीही लष्करी कारवाई लाखो नागरिकांच्या मनात वाढलेला परस्पर अविश्वास संपवू शकत नाही. शब्दांनी पेटवलेली आग समाजानेच विझवली पाहिजे. ही लढाई केवळ देशापुरती मर्यादित नाही. आज भारत जगात एक आर्थिक, सामरिक, तांत्रिक आणि राजनैतिक शक्ती म्हणून उदयास येत आहे. अशा वेळी जर धार्मिक तणाव, वांशिक संघर्ष, अत्याचार, धमक्या, हिंसाचार आणि सामाजिक विघटनाची दृश्ये जगापर्यंत पोहोचत राहिली, तर भारताच्या यशासोबतच एका विभागलेल्या समाजाचे चित्रही समोर येते. मग भारतविरोधी शक्तींना वेगळे कथानक रचण्याची गरजही भासत नाही. आम्ही स्वतःच त्यासाठी सामग्री पुरवतो.

जेव्हा तीच रचना आणि पद्धती वारंवार दिसून येतात, तेव्हा एखाद्या रणनीतीचे किंवा पूर्वनियोजित प्रयत्नाचे आरोप रुजू लागतात. त्याच संवेदनशील चिन्हांना सातत्याने लक्ष्य केले जाते, माहिती प्रसारित करण्याची एक संघटित पद्धत असते आणि एका विशिष्ट गटासाठी त्यात स्पष्ट राजकीय फायदा दिसतो. केवळ कटाचा आरोप केल्याने हे नाट्य संपत नाही. एखाद्या विधानाचा हेतू काहीही असो, जर त्याचा परिणाम समाजात द्वेष, अविश्वास, कटुता आणि हिंसाचार वाढवणे हा असेल, तर तो परिणाम गांभीर्याने घेतला पाहिजे.

भारताला अशा नागरी सत्तेची गरज आहे, जी अपमानाला तथ्यांनी उत्तर देईल. खोट्या इतिहासाला खर्या इतिहासाने उत्तर देईल. गुन्ह्याला कायद्याने उत्तर देईल. खोटेपणाला पुराव्यांनी उत्तर देईल आणि चिथावणीला अशा संयमाने उत्तर देईल, जो आत्मविश्वासाचे लक्षण आहे, दुर्बलतेचे नाही. अनेकदा, देशाचे सर्वांत मोठे नुकसान ठिणगी पेटवणाऱ्या व्यक्तीमुळे होत नाही. खरे नुकसान तेव्हा होते, जेव्हा आपण सर्वजण आपल्याच रागाच्या भरात त्या ठिणगीच्या मागे धावतो.

आग लावणाऱ्याचा खरा विजय तेव्हा होतो, जेव्हा स्वतः जळणारे लोक ती आग भडकवू लागतात. उदयोन्मुख भारताची सर्वांत मोठी ताकद केवळ त्याची अर्थव्यवस्था, सैन्य, तंत्रज्ञान किंवा सरकार नसेल. त्याची सर्वांत मोठी ताकद असा समाज असेल, जो चिथावणी ओळखू शकेल, मतभेद सहन करू शकेल, अपमानाला लोकशाही, घटनात्मक प्रतिसाद देऊ शकेल आणि आपल्या अंतर्गत मतभेदांना राजकारणाचे शस्त्र बनू देणार नाही. ही सामाजिक समज जोपासणे अत्यावश्यक आहे. हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की, मोठ्या मोठ्या वणव्याची सुरुवातीची ठिणगीसुद्धा योग्य वेळी पाण्याच्या एका थेंबाने विझवता येते.

**(पांचजन्यवरून साभार)**

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अजिंठा-फर्दापूरच्या विकासासाठी मुंबईत बैठक; शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवस्मारक, सेवालाल महाराज स्मारकासह विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१३ सप्टेंबर

जगप्रसिद्ध अजिंठा लेणी परिसरातील स्थानिक विक्रेत्यांचे प्रश्न, नवीन विकासकामे तसेच फर्दापूर येथील विविध विकासकामांच्या संदर्भात पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे बैठक पार पडली. या बैठकीस आमदार अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती.अजिंठा लेणी येथे पर्यटकांसाठी अत्याधुनिक व सर्व सुविधांनी परिपूर्ण नवीन शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे, सुरू असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या कामाला गती देण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणे, फर्दापूर येथे संत सेवालाल महाराज स्मारकाच्या प्रस्तावास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देणे, तसेच अजिंठा लेणी व फर्दापूर गावासाठी वाढीव पाणीपुरवठ्याच्या संदर्भात स्वतंत्र बैठक आयोजित करणे, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.तसेच फर्दापूर येथील महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (MTDC) जागेतून महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यास मंजुरी व आवश्यक परवानगी देण्याची मागणीही करण्यात आली. या सर्व विषयांवर मंत्री शंभूराज देसाई यांच्याशी सविस्तर चर्चा करून निवेदन देण्यात आले.

यावेळी मंत्री देसाई यांनी विविध मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्याचे निर्देश दिले. अजिंठा लेणी परिसराचा पर्यटनदृष्ट्या सर्वांगीण विकास, स्थानिकांना रोजगाराच्या संधी, विद्यार्थ्यांसाठी सुविधा आणि पर्यटकांना दर्जेदार सोयी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार अब्दुल सत्तार यांनी सांगितले. बैठकीस अजिंठा लेणी दुकानदार संघटनेचे अध्यक्ष विलास वराडे, फर्दापूरचे उपसरपंच फेरोज पठाण, जाकेर शेख, ईश्वर गायकवाड यांच्यासह पर्यटन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## 'एक विद्यार्थी–एक वृक्ष' उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश



तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.१३ सप्टेंबर - पर्यावरण संवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच निर्माण व्हावी, यासाठी श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर, शिवनगर येथील विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारात लागवडीसाठी विविध प्रकारची वृक्षरोपे आणून 'एक विद्यार्थी–एक वृक्ष' या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

शाळेच्या परिसरात हिरवाई वाढविण्यासोबतच विद्यार्थ्यांना वृक्षांचे महत्त्व समजावे, वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाची सवय लागावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या घरून तसेच उपलब्धतेनुसार विविध वृक्षरोपे शाळेत आणली.

वाढते प्रदूषण, वृक्षतोड आणि बदलते हवामान यामुळे पर्यावरण संवर्धनाची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर केवळ वृक्षलागवड न करता लावलेल्या रोपांची योग्य निगा राखणेही आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आणलेल्या वृक्षरोपांच्या माध्यमातून शाळेच्या परिसरात भविष्यात हिरवाई निर्माण होण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जबाबदारीची भावना निर्माण होण्यास हातभार लागणार आहे.

विद्यार्थ्यांच्या सहभागातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि शाळा व्यवस्थापनाने कौतुक केले. 'एक विद्यार्थी–एक वृक्ष' या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी दिलेला पर्यावरण संवर्धनाचा संदेश परिसरातील नागरिकांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.

## आरोग्य विम्याबाबत महाराष्ट्रात जनजागृती; 50 हून अधिक शहरांत तीन लाख नागरिकांशी संवाद

तभा वृत्तसेवा

**जळगाव :** वैद्यकीय आणीबाणीच्या काळात उपचारांचा खर्च कुटुंबांवर मोठा आर्थिक भार टाकतो. या पार्श्वभूमीवर आरोग्य विम्याचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनीने महाराष्ट्रात ३० दिवसांचा आरोग्य विमा जनजागृती रोड शो राबविला. विशेष सज्ज केलेल्या जनजागृती व्हॅनने पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि पुणे विभागातील ५० हून अधिक शहरांत प्रवास केला. या माध्यमातून तीन लाखांपेक्षा जास्त नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्यात आला.

रोड शोदरम्यान वेळेत विमा घेणे, पुरेशी विमा रक्कम, कॅशलेस उपचार, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि अनपेक्षित वैद्यकीय खर्चासाठी आर्थिक नियोजन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

स्टार हेल्थचे बिझनेस हेड विजय अरोरा यांनी सांगितले की, आरोग्य विम्याबाबत नागरिकांमध्ये समज, विश्वास आणि आत्मविश्वास निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. 'टॉक टू स्टार' सहाय्यसेवा आणि घरगुती आरोग्यसेवेचीही माहिती नागरिकांना देण्यात आली.

# वेरूळमध्ये 17 सप्टेंबरला विश्वकर्मीय समाजाचा महामेळावा

### रोजगार, उद्योग-व्यवसाय मार्गदर्शनासह शासकीय योजनांची माहिती; प्रदर्शनासाठी स्टॉलची संधी

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेच्या वतीने प्रभू विश्वकर्मा प्रकट दिनानिमित्त गुरुवार, १७ सप्टेंबर रोजी श्री क्षेत्र वेरूळ, ता. खुलताबाद येथे सुतार, लोहार, सोनार, तांबट, पाथरवट यांच्यासह विश्वकर्मीय समाज बांधवांचा महामेळावा आणि भव्य रोजगार, उद्योग व व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विश्वकर्मीय समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नागोराव पांचाळ आणि कार्याध्यक्ष अरुण भालेकर यांनी केले आहे.



मेळाव्याच्या आयोजनासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या असून, संस्थापक अध्यक्ष प्रा. नागोराव पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेशाध्यक्ष सचिन सुतार, राज्य कार्याध्यक्ष अरुण भालेकर, राज्य उपाध्यक्ष राजेश नागपुरे व गोपाल राऊत, सरचिटणीस संजय सुतार, राज्य सचिव विलास पवार, धनराज वेलणकर, तानाजी शेटे, केशव सपकाळ, जिल्हा शहराध्यक्ष अमोल डोळस, शहर कार्याध्यक्ष किशोर सिरसाठ, ग्रामीण जिल्हाध्यक्ष सोमनाथ राऊत, परमेश्वर पांचाळ, बालाजी पांचाळ, प्रवक्ते भाऊसाहेब राऊत, राज्य संघटक राजकुमार राऊत, प्रसिद्धीप्रमुख भगवान राऊत यांच्यासह राज्य, विभाग व जिल्हा पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

स्टॉल बुकिंगसाठी गोपाल राऊत (९७६४७२२७४२), आंबटसर (९८२३२३०४७८) आणि केशव सपकाळ (८३२९३०२३२८) यांच्याशी संपर्क साधावा.

वेरूळ येथील विश्वकर्मा मंदिर, कन्नड रोड येथे दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मिरवणूक, उद्घाटन, रोजगार मेळावा, उद्योग-व्यवसाय मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती, लघुउद्योजकांचे प्रदर्शन, स्टॉल व विक्री, पुरस्कार वितरण आणि समारोप असे कार्यक्रम होणार आहेत.

खादी व ग्रामोद्योग, जिल्हा उद्योग केंद्र, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विभाग (एमएसएमई), जिल्हा कौशल्य विकास विभाग तसेच आर्थिक विकास महामंडळाचे अधिकारी उपस्थित राहून विविध योजनांची माहिती देणार आहेत. पंतप्रधान विश्वकर्मा योजना, बांधकाम कामगार योजना तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) आणि पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (पीएमईजीपी) यांच्या माध्यमातून उद्योग उभारणीबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

# शेतातील विजेच्या तारांचा जीवघेणा सापळा; विलास पवारांचा बळी

### खेकडे पकडण्यासाठी गेलेल्या 35 वर्षीय तरुणाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.१३ सप्टेंबर - पिकांचे रानटी जनावरांपासून संरक्षण करण्यासाठी शेताभोवती लावलेल्या तारांमध्ये कथितरीत्या विद्युतप्रवाह सोडण्यात आल्याने खेकडे पकडण्यासाठी गेलेल्या विलास सुखदेव पवार (वय ३५, रा. सातकुंड, ह.मु. पांडवनगरी जवळ, वीटभट्टी, कन्नड) यांचा विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना दि. १२ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे ८ वाजेच्या सुमारास अंधानेर शिवारातील भवानी टेकडीच्या मागील भागात घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, शेतातील तारांमध्ये वीजप्रवाह सोडणारा शेतकरी कोण? त्याच्यावर गुन्हा दाखल होणार का? असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.



विलास पवार हे त्यांचे नातेवाईकांसोबत खेकडे पकडण्यासाठी अंधानेर शिवारातील भवानी टेकडीच्या मागे गेले होते. तिघे जण एका बाजूने गेले, तर विलास हे शेताच्या बांधावरून दुसऱ्या बाजूने जात होते. त्यावेळी शेतकऱ्याने शेताभोवती लावलेल्या तारांचा विलास यांना स्पर्श झाला. तारांमध्ये विद्युतप्रवाह असल्याने त्यांना जोरदार विजेचा धक्का बसला. त्यांनी मोठ्याने आरडाओरड केली. सहकारी जवळ येईपर्यंत त्यांची प्राणज्योत मालवली होती.

सहकाऱ्यांनी विलास यांना रात्री सुमारे १० वाजता कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी रुकसार खान यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. सकाळी शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. विलास पवार यांच्या पश्चात पत्नी आणि चार अपत्ये असा परिवार आहे. कुटुंबाचा आधार असलेल्या विलास यांचा अचानक मृत्यू झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. चारही अपत्यांच्या डोक्यावरचे वडिलांचे छत्र हरपले आहे. पिकांच्या सुरक्षेसाठी उभारलेली व्यवस्था एका कुटुंबाचा आधार हिरावून घेणारी ठरल्याने नातेवाईकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# बसमध्ये मंगळसूत्र चोरी करणाऱ्या एका मुलीला रंगेहाथ पकडले

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.१३:** गंगापूर शहरातील आठवडी बाजाराच्या दिवशी बसमध्ये चढताना महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका मुलीला गंगापूर पोलिसांनी रंगेहाथ ताब्यात घेतले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे चोरीचा प्रयत्न फसला असून, या कारवाईमुळे बसस्थानक व आठवडी बाजार परिसरातील चोरट्यांवर पोलिसांचा वचक निर्माण झाला आहे.

शनिवारी गंगापूर शहरात आठवडी बाजार भरला होता. त्यामुळे शहरातील बसस्थानक तसेच बसमध्ये प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती. याच गर्दीचा फायदा घेत एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, गंगापूर पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार



उघडकीस आला. पोलिसांनी संबंधित एका मुलीला रंगेहाथ ताब्यात घेतले.

या कारवाईमुळे गर्दीच्या ठिकाणी चोरी करणाऱ्यांना चाप बसण्यास मदत झाली आहे. आठवडी बाजार, बसस्थानक व बसमध्ये प्रवास करताना नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.या कारवाईत पोलीस नाईक गणेश जाधव, होमगार्ड छाया पंडित व रिंकू धानोरे यांनी परिश्रम घेतले. पुढील तपास गंगापूर पोलीस करीत आहेत.

> **"आठवडी बाजाराच्या दिवशी बसस्थानक व बसमध्ये प्रवाशांची मोठी गर्दी असते. या गर्दीचा फायदा घेऊन चोरी करणाऱ्यांवर गंगापूर पोलिसांची करडी नजर आहे. पोलिसांच्या सतर्कतेमुळे मंगळसूत्र चोरीचा प्रयत्न हाणून पाडण्यात आला आहे. नागरिकांनी गर्दीच्या ठिकाणी आपल्या दागिन्यांची व मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी. संशयास्पद हालचाली आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी."**
>
> **सलीम चाऊस, पोलीस निरीक्षक गंगापूर**

# जाळीचा देव ते सावळदबारा व कालिका देवी मंदिरा च्या कामासाठी वन मंत्रींच्या दालनात बैठक, प्रस्ताव तात्काळ मार्गी लावण्याचे आदेश

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१३ सप्टेंबर :** अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी यांच्या मागणी नुसार सोयगाव तालुक्यातील जाळीचादेव ते सावळदबारा व टिटवी ते कालिकादेवी मंदिर रस्ता व तसेच कलिका देवी मंदिरासाठी वन विभागाचा निसर्ग पर्यटन योजनेअंतर्गत दहा कोटी रुपयांचा निधी संदर्भात आज राज्याचे वनमंत्री गणेशजी नाईक यांच्या दालनात त्यांच्या अध्यक्षते खाली बैठक संपन्न झाली. यावेळी अल्पसंख्यांक मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी मुख्य वनरक्षक नागपूर गजेंद्र रामगावकर, उपसचिव निकिता पांडे, वन संरक्षण प्रमोदचंद्र लाखडा, छत्रपती संभाजी नगर उपवन संरक्षण सुवर्णा माने, सभापती पंचायत समिती सोयगाव उत्तम



चव्हाण नगरसेवक मुनावर पटेल यांच्यासह वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीमध्ये वनमंत्री गणेश जी नाईक यांनी वन विभागाचे अधिकारी यांना सूचना देत जाळीचा देव ते सावळदबारा-टिटवी ते कालिकादेवी रस्ता हा करणे अत्यंत महत्त्वाचा आहे त्यामुळे वनविभागाने रस्त्यासाठी जागा देणे बाबतचा प्रस्ताव तत्काळ शासनास सादर करण्याचे आदेश मंत्री गणेशजी नाईक यांनी दिले. तसेच कालिकादेवी मंदिर हे वन विभागात असल्यामुळे त्वरित इको टुरिजम अंतर्गत १० कोटी चा विकास कामाचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे आदेश मा.मंत्री यांनी सूचना दिल्या व हे तिन्ही विषय मार्गे लावून देण्याचे आश्वासन दिले. या तिन्ही विषयाला मंजुरी मिळाली तर सावळदबारा परिसरातील 12 गावांना याचा मोठा फायदा होणार असून जाळीचादेव ते सावळदबारा रस्ता झाल्यास या भागातील उद्योग व व्यवसाय, रोजगार मध्ये मोठ्या प्रमाणात फायदा होऊन दळणवळण सोयीस्कर होणार आहे तसेच कालिका देवी मंदिर ला रोज हजारो भाविक येतात त्या ठिकाणी पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्याने भाविकांना त्रास सहन करावे लागतात त्यामुळे १० कोठी निधी उपलब्ध करून दिल्यास मोठा फायदा होईल

यावेळी जयप्रकाश चव्हाण, गणेश लोखंडे, मनोज बुढाळ, अज्ञानसिंग राठोड, प्रमोद पाटील ज्ञानेश्वर राठोड, संभाजी पवार, संजय चव्हाण, प्रकाश अन्वेकर, डॉअरुण पोफळे, शत्रुघ्न दोडे ज्ञानेश्वर अक्कर, राजेश चंडोल,

एक कॉलम मध्ये......

जाळीचादेव ते सावळदबारा व कालिकादेवी ते टिटवी रस्ता व कालिका देवी च्या विकास कामासाठी 10 कोटी रुपये देण्याचे व शासन कुण ब वर्ग देण्या साठी विविध नाहरकत देणे चे आदेश मंत्री गणेशजी नाईक यांनी दिल्यामुळे या भागाचा विकास होईल.

# अल निनोच्या संकटात शेतकरी होरपळतोय; शेतीसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची गरज - प्रशांत गोंदकर

शिर्डी (प्रतिनिधी ) भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मात्र, बदलते हवामान, अल निनोचा संभाव्य प्रभाव, अनियमित पर्जन्यमान, वाढते तापमान, भूजलपातळीतील घट आणि पाण्याची टंचाई यामुळे शेतकरी मोठ्या संकटाला सामोरा जात आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र आणि प्रभावी यंत्रणा उभारावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

महाराष्ट्रात नागरिकांच्या सुरक्षेसाठी शहरी व ग्रामीण भागात महाराष्ट्र सुरक्षा बलाची (MSF) स्वतंत्र यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत आहे. त्याच धर्तीवर शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे तातडीने लक्ष देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण केल्यास त्याचा मोठा फायदा शेतकरी वर्गाला होऊ शकतो, अशी भूमिका श्री. प्रशांत भानुदास गोंदकर पाटील यांनी मांडली आहे. राज्याचे मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील तसेच माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबतही विखे पाटील कुटुंबीयांनी पुढाकार घ्यावा अशी भावना सामाजिक कार्यकर्ते प्रशांत गोंदकर यांनी व्यक्त केली आहे.



शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत बोलताना गोंदकर म्हणाले शेतीच्या कामांसाठी मजूर उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना अधिक पैसे मोजून काम करून घ्यावे लागत आहे. हवामानातील अनिश्चिततेमुळे कधीही पाऊस, थंडी किंवा उष्णतेचा सामना करावा लागत असल्याने पिकांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत आहे. शेती हा उत्तम व्यवसाय आहे, ही भावना नव्या पिढीत निर्माण होणे गरजेचे आहे अन्यथा तरुण शेतीपासून दूर जाण्याचा धोका नाकारता येत नाही. शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात आधुनिक शेती, कृषी उद्योजकता आणि शासनाच्या कृषीविषयक योजनांची माहिती देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगत. शासनाच्या कृषिविषयक योजना कागदावर न राहता त्या प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविल्या पाहिजे.

विजेच्या लोडशेडिंगमुळे कृषी पंप व ट्रांसफार्मर जळण्याच्या घटना घडतात. परिणामी विद्युत पंप बंद राहून पिकांचे मोठे नुकसान आहे . बिबट्या, तरस, लांडगा, रानडुक्कर आणि कोल्हे यांच्यामुळे शेतकरी व पिकांना धोका निर्माण झाला आहे. पिकांचे नुकसान रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे.. सौरऊर्जा पंप आणि इतर सौरऊर्जा योजनांचा अधिकाधिक विस्तार करून शेतकऱ्यांना स्वावलंबी करण्याची गरज आह. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य व हमीभाव मिळणे अत्यंत आवश्यक आहे. उत्पादन खर्च आणि बाजारभाव यातील तफावत दूर करण्यासाठी ठोस धोरण आखणे गरजेचे असून शेतकरी कुटुंबांच्या सामाजिक प्रश्नांकडे लक्ष - शेतकरी कुटुंबातील मुलामुलींच्या विवाहाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अनेक तरुण विवाहाच्या प्रतीक्षेत आहेत. तसेच विवाह जुळवून देण्याच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीच्या घटनांवर शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

शेतकरी सक्षम झाला तरच ग्रामीण अर्थव्यवस्था यशस्वी होईल आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम झाली तरच देशाची प्रगती अधिक वेगाने होईल," या दृष्टिकोनातून शासनाने शेतकरी प्रश्नांकडे गांभीर्याने पाहावे अशा विविध प्रश्नांवर त्यांनी माध्यमांशी बोलताना शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या अजून शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी शासनाने विविध प्रकारच्या उपयोजना करावा अशी देखील त्यांनी मागणी केली आहे.

## प्रभावती पतसंस्थेच्या अध्यक्षपदी ज्ञानेश्वर शिंदे यांची बिनविरोध निवड



तभा वृत्तसेवा

**बिडकीन, दि. १३ सप्टेंबर :** पैठण तालुक्यातील चितेगाव येथील प्रभावती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., चितेगावच्या पंचवार्षिक निवडणुकीनंतर अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणूक दि. ९ सप्टेंबर रोजी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. पैठण सहाय्यक निबंधक कार्यालयाच्या निवडणूक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या निवडणुकीत अध्यक्षपदी ज्ञानेश्वर उत्तम शिंदे, तर उपाध्यक्षपदी रामभाऊ दगडू गिधाने यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवड झाल्यानंतर निवडणूक अधिकारी बलराम नवथार यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्षांना नियुक्तीपत्र प्रदान केले. तसेच पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रभावती पतसंस्थेचे सर्व संचालक व कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे व उपाध्यक्ष रामभाऊ गिधाने यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

## गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरा : सौ. पल्लवी सिरसाठ

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.१३:** शहर व तालुक्यातील नागरिकांसाठी गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालय हे अत्यंत महत्त्वाचे शासकीय आरोग्य केंद्र आहे. या रुग्णालयावर गंगापूर तालुक्यासह परिसरातील मोठ्या संख्येने नागरिक उपचारासाठी अवलंबून आहेत.सध्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये मंजूर पदांच्या तुलनेत वैद्यकीय अधिकाऱ्यांची संख्या अपुरी असून, काही वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असून, रुग्णांची तपासणी, उपचार, आपत्कालीन सेवा तसेच इतर वैद्यकीय सेवा सुरळीतपणे देताना अडचणी निर्माण होत आहेत.

विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना वेळेवर आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता कायम राहिल्यास रुग्णांना इतर ठिकाणी उपचारासाठी पाठवावे लागण्याची शक्यता असून, त्याचा सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

त्यामुळे गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयातील मंजूर व रिक्त असलेली वैद्यकीय अधिकाऱ्यांची सर्व पदे तात्काळ भरण्यात यावीत, तसेच आवश्यकतेनुसार अतिरिक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करून रुग्णालयातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यात यावी या मागणीची तातडीने दखल घेऊन संबंधित स्तरावर आवश्यक कार्यवाही करून वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे लवकरात लवकर भरण्यात यावीत. या मागणीचे निवेदन नगरसेविका सौ. पल्लवी आबासाहेब सिरसाठ डॉ. आबासाहेब सिरसाठ यांनी केली आहे.

## सोयगाव येथे माहिती अधिकार कार्यकर्त्यांची कार्यशाळा

**सोयगाव,दि.१३( प्रतिनिधी) :** नागरिकांना शासकीय प्रशासनामध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी माहितीचा अधिकार कायदा हे प्रभावी माध्यम असून, त्याचा योग्य आणि कायदेशीर पद्धतीने वापर करण्याबाबत माहिती अधिकार कार्यकर्त्यांची कार्यशाळा सोयगाव येथे उत्साहात पार पडली.या कार्यशाळेत माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत अर्ज कसा करावा, कोणत्या कार्यालयाकडे माहिती मागावी, माहिती न मिळाल्यास प्रथम व द्वितीय अपीलाची प्रक्रिया कशी करावी, तसेच माहिती अधिकाराचा वापर करताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेत उपस्थित माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी विविध शासकीय विभागांकडून माहिती मिळविताना येणाऱ्या अडचणी, अपूर्ण माहिती आणि विलंब यासंदर्भात चर्चा केली. नागरिकांच्या प्रश्नांसाठी आणि शासकीय कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी माहिती अधिकार कायद्याचा प्रभावी वापर करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.28 सप्टेंबर रोजी माहिती अधिकार दिन साजरा करण्यात येणार आहे

कार्यक्रमा चे अध्यक्ष शेख रशीद तर माहिती अधिकार बाबत मार्गदर्शन शेख गुलाब मामू होते या कार्यशाळेमुळे माहिती अधिकार कायद्याबाबत जनजागृती होऊन कार्यकर्त्यांना अधिक प्रभावीपणे काम करण्यासाठी मार्गदर्शन मिळाले.या कार्यक्रमाला संदीप इंगळे,दिलीप शिंदे,ईश्वर इंगळे,विजय पगारे,वाल्मीक चव्हाण,अशोक ढगे, शेख सुलेमान,ज्ञानेश्वर गाडेकर,विजय भारवाड आदी सह सोयगाव परिसरातील माहिती अधिकार कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने कार्यशाळेत सहभागी झाले.

## सुशिलाबाई कार्ले यांचे निधन



राहाता (वार्ताहर) येथील सुशिलाबाई दगु कार्ले वय ८६ यांचे नुकतेच वृद्धकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना ,नातवंडे असा परिवार आहे. राहाता शहरातील प्रगतीशील शेतकरी व राहाता ग्रुप सोसायटीचे माजी चेअरमन राजेंद्र कार्ले व विनोद कार्ले, यांच्या त्या मातोश्री तर अहिल्यानगर जलसंपदा विभागाचे कार्यकारी अधिकारी प्रभाकर निर्मळ यांच्या त्या सासुबाई होत.


### जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा. क्र.2026/मशाका/जमाबंदी-१/ जन्म मृत्यू नोंद
सिआर-470
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
दिनांक-03/09/2026

अर्जदारः अमोल दरबार चव्हाण रा. आंबा तांडा ता. कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर

विरूद्ध

गैरअर्जदार :- ग्रामीण रुग्णालय कन्नड ता कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषयः- जन्म/मृत्यू अधिनियम १९६१ चे कलम 13 (3) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषय अर्जदार यांनी त्यांच्या विधीज्ञ / ॲड. मार्फत / स्वतः अर्जदार सादर करून अर्जदार यांच्या याचा मुलगीचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगी वेदश्री अमोल चव्हाण चा जन्म दिनांक 20-09-2024 रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा मुलगी जन्म दिनांक 20-09-2024 रोजी कन्नड ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहीर प्रवचन द्वारे तमाम जनतेच सुचित करण्यात येते की अर्जदार यांचा मुलगी वेदश्री अमोल चव्हाण यांचा जन्म दिनांक 20-09-2024 रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर / आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून 30 दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 07-10-2026 रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपल्या आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणाचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 20-09-2024 रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक......./09/2026 रोजी सदर जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्यानीशी दिली आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

### जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा. क्र.2026/मशाका/जमाबंदी-१/ जन्म मृत्यू नोंद
सिआर-306
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
दिनांक-03/09/2026

अर्जदारः अविनाश शंकर चव्हाण रा. पिंपळगाव ता. चाळीसगाव जिल्हा. जळगाव.

विरूद्ध

गैरअर्जदार :- ग्रामीण रुग्णालय कन्नड ता कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषयः- जन्म/मृत्यू अधिनियम १९६१ चे कलम 13 (3) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषय अर्जदार यांनी त्यांच्या विधीज्ञ / ॲड. मार्फत / स्वतः अर्जदार सादर करून अर्जदार यांच्या याचा मुलगीचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगी लावण्या अविनाश चव्हाण चा जन्म दिनांक 08-01-2025 रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा मुलगी जन्म दिनांक 08-01-2025 रोजी कन्नड ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहीर प्रवचन द्वारे तमाम जनतेच सुचित करण्यात येते की अर्जदार यांचा मुलगी लावण्या अविनाश चव्हाण यांचा जन्म दिनांक 08-01-2025 रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर / आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून 30 दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 07-10-2026 रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपल्या आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणाचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 08-01-2025 रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर / आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक......./09/2026 रोजी सदर जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्यानीशी दिली आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## अग्रलेख

# ब्रिक्स : औचित्य आणि गरज

ब्रिक्सच्या ऐतिहासिक अशा द्विदिवसीय शिखर परिषदेला शनिवार, १२ सप्टेंबरपासून राजधानी दिल्लीतील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या भारत मंडपममध्ये प्रारंभ होत आहे. या परिषदेकडे ब्रिक्स देशांचेच नाही तर जगाचे लक्ष लागले आहे. चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग, रशियाचे राष्ट्रपती ब्लादिमिर पुतिन यांच्यासह जवळपास डझनभर देशांचे राष्ट्रप्रमुख वा सरकारप्रमुख या परिषदेत सहभागी होणार आहेत. ब्रिक्सचे यजमानपद यंदा भारताकडे असल्यामुळे या परिषदेची अध्यक्षता पंतप्रधान नरेंद्र मोदी करणार आहेत, ही समस्त भारतीयांच्या दृष्टीने आनंदाची आणि अभिमानाची बाब म्हटली पाहिजे. अशा आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करण्याची संधी मिळणे म्हणजे जगात भारताचे महत्त्व आणि दबदबा वाढत असल्याचे द्योतक म्हटले पाहिजे.

चीन आणि रशिया या जगातील दोन महासत्तांच्या सहभागाने ब्रिक्सला महत्त्व आले आहे, हे कोणाला नाकारता येणार नाही. त्यामुळे परिषदेनंतर ब्रिक्सचे संयुक्त घोषणापत्र काय म्हणते, याकडे सगळ्यांचे लक्ष लागणे स्वाभाविक म्हणावे लागेल. २० सप्टेंबर २००६ ला न्यू यॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या एका बैठकीत ब्रिकची स्थापना करण्यात आली होती. २०११ मध्ये दक्षिण आफ्रिकेचा यात समावेश झाला, त्यामुळे आतापर्यंत ब्रिक असलेल्या या संघटनेचे नाव 'ब्रिक्स' असे झाले. जानेवारी २०२४ मध्ये ब्रिक्सचा विस्तार करीत त्यात इजिप्त, इराण, सौदी अरब, इथिओपिया, इंडोनेशिया आणि संयुक्त अरब अमिरात या पाच देशांचा समावेश करण्यात आला. ब्रिक्सचा प्रवास आता ११ देशांपर्यंत पोहोचला आहे. याशिवाय क्यूबा, युगांडा, थायलंड, बेलारूस, बोलिव्हिया, मलेशिया, नायजेरिया, व्हिएतनाम, कझाकिस्तान आणि उज्बेकिस्तान या आणखी १० भागीदार देशांना ब्रिक्समध्ये सामावून घेण्यात आले आहे. लवचीकपणा, नवाचार, सहकार्य आणि स्थिरतेसाठी विकास ही ब्रिक्स शिखर परिषदेची संकल्पना आहे. आज जगातील जवळपास अर्ध्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व ब्रिक्स करीत आहे. यावरून या परिषदेची जगातील व्याप्ती लक्षात येते. वैश्विक जीडीपीत ब्रिक्स देशांचा वाटा ४० टक्के आहे तर जागतिक व्यापारात ब्रिक्सचा हिस्सा २६ टक्के आहे. ब्रिक्स आता ग्लोबल साऊथचा आवाज बनत आहे. संयुक्त राष्ट्र तसेच विश्व बँक आणि आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीत काळानुरूप बदल करण्याची मागणी ब्रिक्स देशांकडून केली जात आहे. ब्रिक्सने आपल्या सदस्य देशांसाठी न्यू डेव्हलपमेंट बँक सुरू केली आहे.

गेल्या काही दिवसात जगातील भूराजकीय परिस्थिती वेगाने बदलत चालली आहे. या पार्श्वभूमीवर ब्रिक्ससारख्या संघटनेचे महत्त्व आणि आवश्यकता आणखी वाढते. ब्रिक्सचे महत्त्व वाढत असले, तरी त्याला जी-७ देशांची जागा घ्यायला आणखी बराच वेळ लागणार आहे. ब्रिक्स शिखर परिषदेचे यजमानपद यंदा भारताकडे आहे. या परिषदेचे आयोजन भारतात होण्याची ही चौथी वेळ. त्यामुळे या परिषदेच्या यशस्वीतेसाठी भारत गेल्या अनेक महिन्यांपासून काम करीत आहे. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून अशा जागतिक स्वरूपाच्या शिखर परिषदांचे आयोजन भारतात सुरू झाले आहे; त्यात जी-२० चा समावेश होता. भारत हा विश्वगुरू बनत असल्याचे म्हटले जाते, त्याचे हे प्रतीक मानायला हरकत नाही. रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू होऊन चार वर्षे झाली आहेत, पण हे युद्ध कधी संपेल हे कोणालाच सांगता येत नाही. दुसरीकडे ब्रिक्सचा सदस्य देश असलेल्या इराणवर अमेरिका आणि इस्रायल यांनी हल्ला केला आहे. मात्र, या दोन्ही मुद्यांवर ब्रिक्सला निश्चित अशी कोणती भूमिका घेता आली नाही. ब्रिक्सची रचना आणि त्याचे स्वरूपही याला कारणीभूत म्हटले पाहिजे. ब्रिक्समधील काही देशात लोकशाही आहे, काही देशात राजेशाही तर काही देशात हुकूमशाही आहे. त्यामुळे कोणत्याही मुद्यावर निश्चित अशी भूमिका घेणे ब्रिक्सला जड जाते. ब्रिक्समधील सदस्य देशांत वाद नाही, असे नाही. चीन आणि भारत या दोन देशांतील सीमावाद नेहमीच चर्चेचा तसेच दोन देशातील तणावाचा विषय राहिला आहे. सौदी अरब आणि संयुक्त अरब अमिरात या ब्रिक्सच्या दोन सदस्य देशातही गंभीर स्वरूपाचे मतभेद आहेत. ब्रिक्सला आपले महत्त्व वाढवायचे असेल तर आधी आपल्या सदस्य देशांमधील मतभेद आणि संघर्ष मिटवावे लागतील. ब्रिक्सच्या कोणत्याही एका सदस्य देशांवर दुसऱ्या देशाचे आक्रमण होत असेल तर एकजुटीने त्या देशाच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका घ्यावी लागेल. सदस्य देशांमधील परस्पर विश्वास, सहकार्य आणि एकतेची भावना कमी पडत आहे.

वेगाने बदलत असलेल्या जागतिक परिस्थितीत आज संयुक्त राष्ट्र सारख्या संघटना कालबाह्य आणि निरुपयोगी ठरत आहेत. त्यांचे अस्तित्वही कोणाला जाणवत नाही. जगात सुरू असलेल्या एकाही संघर्षावर त्या संघटनेला आतापर्यंत कोणतीही ठाम भूमिका घेता आली नाही. युद्ध थांबवत जगात मोठ्या संख्येत होत असलेली प्राणहानी थांबवता आली नाही.

ब्रिक्सचे यावर्षीचे अध्यक्षपद भारताकडे असल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या मुद्यावर ठाम अशी भूमिका घेत भारत हा ग्लोबल साऊथचा आवाज होत असल्याचे दाखवून दिले आहे. युद्ध हे कोणत्याच समस्येचे समाधान नाही, त्यामुळे युद्ध संपवण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न केले पाहिजे, असे आवाहन मोदी यांनी केले आहे. युद्ध संपवण्याला होणारा एक दिवसाचाही विलंब अधिक प्राणहानी घडवून आणतो आणि मोठ्या प्रमाणात नुकसान करतो, अशी भूमिका मोदी यांनी मांडली आहे. एकेकाळी जगात रशिया आणि अमेरिका अशा दोनच महाशक्ती होत्या. काळाच्या ओघात रशिया महाशक्ती राहिली नाही, पण अमेरिका महाशक्ती म्हणून कायम आहे, नव्हे जगातील एकमेव महासत्ता झाली आहे. रशिया महाशक्ती नसली, तरी जगातील रशियाची ताकद आणि महत्त्व कमी लेखता येणारे नाही. तर, चीन अतिशय वेगाने महाशक्ती म्हणून समोर येत आहे. रशिया हा नेहमीच भारताचा जुना आणि विश्वासू मित्र राहिला आहे. जेव्हा जेव्हा भारतावर संकट आले तेव्हा तेव्हा रशिया भारताच्या मदतीला धावून आला आहे, पण चीनने प्रत्येक वेळी भारताचा विश्वासघात केला आहे. एकदा तर चीनने भारतावर आक्रमणही केले होते. आज ब्रिक्समुळे चीनशी आपले संबंध पूर्वीसारखे तणावपूर्ण राहिले नसले, तरी चीन हा कधीच भारतासाठी विश्वासार्ह मित्र राहिला नाही आणि कोणत्या वेळी चीन काय करेल, हे सांगता येत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर परराष्ट्र धोरणाचे आपले संतुलन अतिशय चांगले राखले आहे. चीन, रशिया आणि अमेरिका या देशांची भारताला जेवढी गरज आहे, त्यापेक्षा जास्त गरज या तीन देशांना भारताची आहे, याकडे आपल्याला डोळेझाक करता येणार नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवर एखादा देश तुमचा मित्र होऊ शकत नसेल तर ते किमान शत्रू होणार नाही, एखाद्याशी मतभेद झाले तरी तो तुमचे दीर्घकालीन नुकसान करणार नाही, याची काळजी घ्यावी लागते. मोदी यांच्या सरकारने गेल्या १२ वर्षांत अशी काळजी घेतली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले महत्त्व अधोरेखित केले आहे. त्यामुळे जी-२० देशांची शिखर परिषद असो की ब्रिक्स देशांची, भारताशिवाय जगातील अनेक देशांसमोर पर्याय नसतो. ब्रिक्स शिखर परिषदेमुळे जगात एका नव्या कालखंडाची सुरुवात होईल, यात शंका नाही. ब्रिक्स शिखर परिषदेतून आंतरराष्ट्रीय पातळीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नेतृत्व आणखी झळाळून निघेल आणि भारताचे महत्त्व वाढवणारी ही शिखर परिषद मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास आहे. ■

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# उत्सवाच्या उन्मादाची गोष्ट...

सावरकरी विचारांचे लेखक, साहित्यिक पु. भा. भावे लिखित 'ठरीव ठशाची गोष्ट' या पुस्तकात 'जोसेफ' नावाची एक गोष्ट आहे. वाचनाची सवय असेल तर भावेंची भाषा आजच्या जेन-झीलाही कळू शकेल इतकी ओघवती आहे. ही कथा सर्वांनीच वाचली पाहिजे; मात्र हिंदुत्ववादी मंडळींनी आणि उत्सवप्रिय हिंदूंनी तर वाचलीच पाहिजे. भावे हे हिंदुत्ववादी, सावरकरवादी लेखक होते. हा हिंदुत्ववादी लेखक स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात काय बदल घडला, हे या कथेच्या माध्यमातून आपल्याला सांगतो. आज हिंदूंच्या उत्सवांमध्ये जो उन्माद दिसून येतो. दहीहंडीला बायका नाचवल्या जातात, लावणीच्या नावाखाली गलिच्छ नृत्य केले जातात, गणेशोत्सवात कर्णकर्कश डीजे लावला जातो आणि धिंगाणा घातला जातो, हे असं का होतं? याचं उत्तर आपल्याला या 'जोसेफ' नावाच्या कथेत मिळतं. जोसेफ या कथेतील पात्र कलेक्टर बंगल्यावर चाकरी करतो. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यामुळे त्याचे मूळ मालक जॅक्सन साहेब आपल्या मायदेशी निघून गेले. मात्र जोसेफ तिथेच राहिला. जॅक्सन साहेब हे कडक शिस्तीचे, पण प्रेमळ माणूस. जोसेफमध्ये जी शिस्त आहे, ती जॅक्सनसाहेबांमुळेच आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि जॅक्सन साहेबांच्या जागी कावळे साहेब बंगल्यावर राहायला आले. कावळे साहेब माणूस म्हणून वाईट नाहीत. पण जॅक्सन साहेबांसारखा कुणावर धाक दाखवू शकत नाहीत आणि शिस्तही लावू शकत नाहीत. जॅक्सन गेले आणि कावळे आले. म्हणजे रुपक अर्थाने गोरे गेले आणि भारतीय आले. बरं कावळे साहेब आल्यानंतर बंगल्याचं चित्रच पालटतं. कावळे साहेबांच्या सासऱ्यांना सात-आठ वर्षांचा मुलगा आहे. तो खेळ म्हणून घंटा वाजवतो. जॅक्सन साहेब असताना ही हिंमत कुणीच करत नसे. घंटा ही नोकरांना बोलावण्यासाठीच वाजे. आता विशेष म्हणजे घंटा वाजली, ती गरज नसताना मुलांनी वाजवली असली तरी जोसेफने सगळी कामे बाजूला ठेवून धावत आले पाहिजे, असा सासऱ्यांचा आग्रह आहे. पूर्वी बंगल्यावर सगळे हळू आवाजात बोलत. आता बंगल्यावर नुसता आरडाओरडा होतो. ही मुलं बागेची नासधूस करतात, गवत, फुले उपटतात. सोफ्यावर घाणेरडी पावले घेऊन चढतात. बरं, समस्या केवळ मुलांमध्ये आहे का? तर नाही. मुलं ही मोठ्या माणसांचं अनुकरण करत असतात. कावळे साहेबांचे सासू-सासरे दोघेही आगाऊ. त्यांचाही प्रचंड त्रास. पूर्वी शिस्तीत वागणारा कारकून आता तंबाखू खाऊन कुठेही थुंकतो. मेजावर तंगड्या पसरवून बसतो. दाढी वाढवून येतो. कुणीही बंगल्यावर येऊन ओरडतो. अशा ओरडणाऱ्या लोकांसाठी भावे गमतीने 'देशभक्त' असा शब्द वापरतात. भावे लिहितात, 'पूर्वी कलेक्टरच्या बंगल्याच्या आसपास फिरण्याची छाती नसलेले एक देशभक्त आजकाल वारंवार कावळे साहेबांकडे येत व मोठमोठ्याने बोलत.' या गोष्टी जॅक्सन साहेब असताना होत नसत. जॅक्सन साहेबांनी सुरू केलेल्या धरणाचे काम थांबले आहे. त्यांच्या प्रामाणिक कुत्र्याची हाडं दिसू लागली आहेत. दगडाचे पूल कोसळत आहेत. या सर्व गोष्टींचा त्या प्रामाणिक चाकराला जोसेफला त्रास होतोय. या त्रासाचं वर्णन करताना भावे जोसेफच्या 'काळजावर कुऱ्हाडीचा घाव घातला' असं करतात. यातून या बेशिस्त वागण्याचा जोसेफ कंटाळाच नव्हे तर प्रचंड वैताग आलाय, हे दिसून येतं. शेवटी तो इतका वैतागतो की 'कृपा करा, कसेही करा, पण मला आपल्या देशात घेऊन जा' असं पत्र जॅक्सन साहेबांना लिहितो.

ही कथा खरोखर वाचली पाहिजे. विशेष म्हणजे हिंदू संस्कृतीवर श्रद्धा असणाऱ्या व्यक्तीने ही कथा लिहिली आहे, कुण्या सेक्युलरिस्टाने नव्हे. आज आपण जो उन्माद पाहतो, त्याचे सार आणि त्याचा अर्थ या कथेत दडला आहे. आपण स्वातंत्र्याचा अर्थ 'गलिच्छ वागणूक' असा घेतला आहे, असे दिसते. अगदी साधी गोष्ट पाहा ना, तुम्ही मुंबईच्या लोकलमध्ये विंडो सिटवर बसलाय आणि अचानक एक माणूस येतो नि खिडकीतून बाहेर पचकन थुंकतो. हे थुंकण्याचं स्वातंत्र्य आपल्याला हवं होतं म्हणून आपले महापुरुष फासावर लटकले होते काय? आज हिंदूंचे सार्वजनिक उत्सव-सण काढून पाहा. विशेषतः दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्री, होळी (होळीदेखील आता सार्वजनिकच झालीय) या उत्सवांमध्ये श्रद्धा कुठे दिसतेय तुम्हाला? श्रद्धा असेल तर ती जेवणात मिठाचं प्रमाण असतं तेवढीच. बाकी दिसतो तो उन्माद, वाह्यातपणा, अश्लीलता... याचं कारण आपल्याला स्वातंत्र्याचा अर्थ कळाला नाही. १९३० नंतर हिंदू नागरिकांच्या मनात पुरता गोंधळ निर्माण करण्यात आला. ज्या छत्रपतींचा आदर्श घेऊन अनेक वर्षे स्वातंत्र्याचा लढा सुरू होता, त्या छत्रपतींचा आदर्श राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आला नाही. काँग्रेस ही त्या काळची मोठी संघटना. त्यामुळे सुरुवातीचा दोष तिच्याकडे जातोच. मात्र आजचा हा उन्माद सर्वपक्षीय आहे. व्होट बँकेसाठी अनेक मंडळं चालवली जातात. स्थानिक गुंड-मवाल्यांना राजकीय आश्रय दिला जातो. पूर्वी उत्सवांचं नेतृत्व टिळक-सावरकर-आंबेडकर अशा विभूतींकडे असल्यामुळे आपल्याला त्यात देशभक्ती आणि सामाजिक समरसता दिसून यायची; आज नेतृत्व गल्लीछाप लोकांकडे गेल्याने हा उन्माद दिसून येतो. नेतृत्व बदलले आणि उत्सवांतील चांगला उद्देशही हरवला. नुसताच उद्देश नाही तर उत्सवांचे सुंदर स्वरूपही बदलले. अर्थात आजही अनेक लोक श्रद्धेने आणि सुसंस्कृतपणे उत्सव साजरे करत असतील; पण त्यांची संख्या खूपच कमी आहे. आज इतकी मंडळे झाली आहेत, ज्यांची आवश्यकताच नाही. दडीहंडीला रस्त्यांवर हेल्मेट न घालता मुद्दाम कर्णकर्कश हॉर्न वाजवत जाणारी मुलं पाहिली, वेड लागायची पाळी येईल असा डीजेचा आवाज ऐकला, उत्सवांमध्ये बायका नाचताना पाहिल्या आणि थिल्लर गाणी गणपती बाप्पाच्या कानात वाजवताना पाहिली की, आपणही 'जोसेफ' झालो आहोत असे वाटते. जोसेफ त्याच्या मालकाला पत्र लिहून त्याच्या देशात घेऊन जाण्याची विनंती तरी करू शकतो. पण हा पर्याय आपल्याकडे नाही. हा उन्माद कसा थांबवायचा याचं उत्तरही आपल्याकडे नाही. आपण मनःस्ताप करून घेण्यापलीकडे अथवा या उन्मादाचे साक्षीदार होण्यापलीकडे काहीही म्हणजे काहीही करू शकत नाही, असं जेव्हा आपल्याला कळतं, तेव्हा सर्व थोर महापुरुषांना हात जोडून विचारावसं वाटतं की, 'अहो महापुरुषांनो, का दिलेत आम्हाला स्वातंत्र्य?' ■

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**निशिकान्त मायी**

# निसर्गराजा ऐक सांगतो...!

प्रत्येक क्षेत्रात आज मानवाने हनुमान उडी घेतली आहे. अनेक शिखरे पादाक्रांत केली आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आमूलाग्र बदल घडविला आहे. अगदी अवकाश संशोधनापासून आताच्या एआयपर्यंत आणि वैद्यकशास्त्रापासून डिजिटल युगापर्यंत सर्वच ठिकाणी झेप घेतली असली आहे. मानवाने एवढी दिव्य प्रगती केली असली, तरी निसर्गावर मात्र अद्यापही तो मात करू शकला नाही. पर्यावरणाचे संतुलन धोक्यात येण्यासाठी मोठ्या प्रमाणात होणारी जंगलतोड, वाढते प्रदूषण, पाण्याची कमतरता, जमिनीचा होणारा ऱ्हास, दिवसागणिक होणारा हवामानातील बदल हे सारे घटक कारणीभूत ठरले आहेत. पृथ्वीवरील मानवाचे अस्तित्व निसर्गाशिवाय अशक्य आहे. आपल्याला निसर्गाकडून शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, सुपीक जमीन, अन्नधान्य, औषधी वनस्पती, जंगलातील संसाधने आणि अनुकूल हवामान मिळत असते. मात्र, विकासाच्या नावाखाली आपण संसाधनांचा अमर्याद वापर करून जगासमोर मोठे संकट उभे करीत आहोत. पृथ्वीचे वाढते तापमान, बेभरवशाचा पाऊस, वाढता उष्मा, अतिवृष्टी, दुष्काळ आदींचे परिणाम जसे मानवावर होत आहेत, तसेच ते शेतीवरही मोठ्या प्रमाणात होत असून कृषिप्रधान देशात शेती उत्पादनच धोक्यात आले आहे. भाजीपासून भातापर्यंतचे भाव गगनाला भिडले आहेत. एकूणच महागाई हातघाईवर आलेली आहे.

खरं तर पर्यावरणीय संतुलनात महत्त्वाची भूमिका बजावणारे जंगल असंतुलित होत असल्याने पावसाचे चक्र दुभंगले आहे. अन्नसुरक्षा, रोजगार आणि अर्थव्यवस्था विस्कळीत झाली आहे. वृक्षतोडीवर जर नियंत्रण आणले तर स्थानिक प्रजातींचे संवर्धन आणि जंगलांचे पुनरुज्जीवन करणे सोयीचे होणार आहे. केवळ वृक्षारोपणाचे कार्यक्रम घेऊन काही होणार नाही; प्रत्यक्ष कृतीची आवश्यकता आहे. नागरिकांनी स्वतःहून वृक्षांची काळजी घेऊन वृक्षप्रजातींना प्रोत्साहन द्यायला हवे. सोबतच पाण्याचे संरक्षण हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. मर्यादित असलेला पाण्याचा साठा गोड्या पाण्यासाठी अमर्याद करणे काळाची गरज आहे. वाहून जाणारे पाणी जमिनीत मुरविणे, जलसंधारणाची कामे करणे, पारंपरिक जलस्रोत पुनरुज्जीवित करणे आणि पाण्याचा काटकसरीने वापर करणे हे मानवी हितासाठी हितावह ठरणारे आहे. पाणी हे जीवन आहे ही जाणीव प्रत्येक मनात रुजली पाहिजे. दिवसेंदिवस गंभीर होत असलेले प्रदूषणाचे संकटही आव्हान ठरत आहे. वाहनांची वाढती संख्या, बांधकामांमुळे निर्माण होणारी धूळ आणि कचऱ्याचे अयोग्य नियोजन यामुळे हवा प्रदूषित होत आहे. प्लॅस्टिक कचरा साचून राहत आहे. यासाठी शासनाने कठोर होऊन अंमलबजावणीला चालना द्यावी व नागरिकांनीही प्लॅस्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे आणि पुनर्वापराला प्रोत्साहन देणे निसर्ग वाचविण्यासाठी मदतगार ठरणार आहे. पर्यावरण संवर्धनासाठी प्राण्यांचा नैसर्गिक अधिवास जपणे आणि धोक्यात आलेली प्रजाती, वन्यजीवांचे संरक्षण करायलाच पाहिजे.

मानवाने डिजिटल युगात तसेच विज्ञानात प्रगती केली असली, तरी सर्व जबाबदारी केवळ सरकारवर सोडून भागणार नाही. नागरिकांनीही आपली भूमिका लक्षात घ्यायला हवी. वाहतुकीच्या नियमांसोबतच पर्यावरणाचे संरक्षण करणे तसेच निसर्ग वाचविण्यासाठी सामूहिक प्रयत्न समाजजीवनातून होणे ही नैसर्गिक गरज आपण लक्षात घ्यायला हवी. निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न होऊ नये. निसर्ग जोपासला जावा. शाळांमधून याबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती व्हायला हवी. विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातून पर्यावरण, निसर्ग जपण्याचे, प्रदूषणाची माहिती देण्याऐवजी प्रत्यक्ष कृतीतून त्याचे महत्त्व समजावून सांगितले पाहिजे. विद्यार्थ्यांनी जलसंधारण, वृक्षसंवर्धन, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, प्लॅस्टिकमुक्त परिसर आणि जैवविविधता आदी विषयांवर उपक्रम राबविण्यासाठी आपल्या शाळा व्यवस्थापनाला उद्युक्त करायला पाहिजे. कारण आजचा विद्यार्थी हा उद्याचा नागरिक आहे. निसर्ग जपणुकीविषयीची संवेदनशीलता त्यांच्याही अंगात भिनायला हवी. लक्षात घ्या, आज आपल्याकडे नैसर्गिक संपत्ती अमाप आहे. मात्र तिचा वापर बेलगाम केला, निसर्गाचे नुकसान केले तर भविष्यातील पिढ्यांना त्याची मोठी किंमत मोजावी लागेल. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात थोडाफार बदल केला तर निश्चितच सामूहिकरीत्या मोठा बदल आपण घडवू शकतो. ■

९८८११ ५२४३९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# स्वार्थाची गुलामी आणि राजकीय बेईमानी

महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर सध्या सिद्धांतांपेक्षा सोयीला, मूल्यांपेक्षा मतपेढीला आणि आचारांपेक्षा लांगूलचालनाला ज्या बेधडकपणे प्राधान्य दिले जात आहे, ते पाहून कोणत्याही सुजाण नागरिकाच्या मनात संतापाचा डोंब उसळणे अटळ आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे उबाठा सेनेचे युवा नेते आदित्य ठाकरे यांनी गरबा प्रवेशाच्या निमित्ताने केलेले ताजे वक्तव्य. आगामी नवरात्रोत्सवाच्या पृष्ठभूमीवर विश्व हिंदू परिषदेने गरबा आणि दांडियाच्या आयोजकांना एक आवाहन केले. उत्सवाचे धार्मिक पावित्र्य टिकावे, प्रांगणातील सुरक्षितता अबाधित आणि कोणत्याही अप्रिय घटना घडू नयेत, यासाठी गरबा मंडपात येणाऱ्या प्रत्येकाचे ओळखपत्र तपासले जावे, त्याच्या कपाळावर टिळा लावला जावा आणि गैरहिंदूंना, विशेषतः धार्मिक भावना नसलेल्या तत्त्वांना तिथे प्रवेश देण्याबाबत काळजी घेतली जावी, असा एक अत्यंत स्वाभाविक विचार व्हीएचपीने मांडला. हा काही राज्य सरकारचा कायदा नव्हता किंवा कोणताही अध्यादेश नव्हता; एका हिंदू संघटनेने श्रद्धाळू भगिनींच्या सुरक्षेसाठी आयोजकांना दिलेला तो एक मैत्रीपूर्ण सल्ला होता. परंतु, या आवाहनावर प्रतिक्रिया देताना आदित्य ठाकरेंनी ज्या प्रकारे टाहो फोडला, ते पाहून अवघा महाराष्ट्र अचंबित झाला आहे. गरबा असो वा गणेशोत्सव, मुंबईत राहणारा प्रत्येक जण हा 'मुंबईकर' असतो; तिथे जात, धर्म, प्रांत किंवा भाषा पाहिली नाही. त्यामुळे मुस्लिमांना गरब्यात बंदी घालणे चुकीचे आणि निषेधार्ह आहे, असा तथाकथित सर्वसमावेशकतेचा जावईशोध आदित्य ठाकरे आणि त्यांच्या वडिलांनी लावला.

आदित्य, उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पक्षाच्या राजकीय इतिहासाची पाने उलटून तर त्यांच्या तोंडी असणारा 'मुंबईकर' हा शब्द किती पोकळ आणि राजकीयदृष्ट्या सोयीचा आहे, हे क्षणात स्पष्ट होते. काही महिन्यांपूर्वी जेव्हा मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका डोळ्यासमोर होत्या, तेव्हा याच उबाठा पक्षाला कोणता मुद्दा आठवला होता? तेव्हा त्यांनी अत्यंत जाणीवपूर्वक हिंदी विरुद्ध मराठी असा बनावट, विषारी आणि हिंसक वाद पेटवला होता. राज्य शाळांमध्ये तिसरी भाषा म्हणून हिंदीचा पर्याय उपलब्ध करून देणारा एक जीआर जारी झाला, ज्या निर्णयाला मंजुरीदेखील हे स्वतः मुख्यमंत्री असताना त्यांनीच दिली होती. चिथावणीखोर विधाने करून मुंबईचे वातावरण गढूळ केले गेले. इतक्यावरच हे थांबले नाही, तर उबाठाच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून निष्पाप हिंदी भाषिक दुकानदारांना, रिक्षाचालकांना, फेरीवाल्यांना आणि हातावर पोट असणाऱ्या मजुरांना गाठून मारहाण केली. ज्याच्या तोंडून अस्खलित मराठी उमटत नव्हती, त्याची कॉलर पकडणे, त्याला धमकावणे, त्याची गचांडी धरून त्याला विचारणे हेच यांचे तथाकथित मराठी प्रेम होते. त्यावेळी उत्तर भारतातून, बिहारमधून, मध्य प्रदेशातून आलेल्या प्रामाणिक नागरिकांना विरोध करताना उद्धव आणि आदित्य ठाकरेंची ही 'मुंबईकर' भावना कुठे गवत चरायला गेली होती? आज जेव्हा गरब्यात मुस्लिमांच्या प्रवेशाचा मुद्दा येतो, तुम्हाला 'आपण सगळे एक आहोत, आपण सगळे मुंबईकर आहोत' या उथळ तत्त्वज्ञानाच्या मेख आठवतात का? जेव्हा मराठी आणि उत्तर भारतीय यांच्यात फूट पाडून मराठी मते लाटायची असतात, तेव्हा उत्तर भारतीयांचा द्वेष पसरवायचा; जेव्हा मुस्लिम मतपेढीला चुचकारायचे असते, तेव्हा 'सर्वधर्मसमभावाचा' आणि 'सर्वसमावेशक मुंबईकरत्वाचा' झेंडा फडकवायचा. हा सोयीचा बाजार आता उघडा तर पडलाच आहे. तरीदेखील आता यांचा समूळ बाजार उठवायची वेळ आली आहे.

विश्व हिंदू परिषदेने नवरात्रोत्सवात गरबा आयोजकांना जे आवाहन केले, त्यामागे एक अत्यंत गंभीर सामाजिक आणि सुरक्षेची पृष्ठभूमी आहे. नवरात्र हा काही निव्वळ मौजमजेचा, नाचण्या-गाण्याचा किंवा करमणुकीचा इव्हेंट नाही. नवरात्रोत्सव हा जगदंबेचा, दुर्गेचा, अंबामातेचा महान उपासना पर्व आहे. ती हिंदू धर्मातील स्त्रीशक्तीच्या पूजनाची, पावित्र्याची आणि भक्तीची श्रेष्ठ परंपरा आहे. गेल्या काही वर्षांत देशभरातील गरबा प्रांगणांमध्ये घडलेल्या घटनांचा तटस्थपणे अभ्यास केला, तर असे दिसून येते की, काही विशिष्ट विकृत मनोवृत्तीचे तरुण आपली खरी ओळख लपवून, बनावट नावे सांगून या पवित्र कार्यक्रमांमध्ये प्रवेश करतात. धार्मिक श्रद्धेशी किंवा मातेच्या पूजेशी त्यांना कसलेही देणेघेणे नसते. त्यांचा हेतू केवळ उपद्रव माजवणे, हिंदू महिलांची छेडछाड करणे आणि 'लव्ह जिहाद'सारख्या अपप्रवृत्तींना खतपाणी घालणे हाच राहिलेला आहे.

या पृष्ठभूमीवर जर एखाद्या हिंदू संघटनेने आयोजकांना विनंती केली की, तुमच्या कार्यक्रमात येणाऱ्या प्रत्येकाची ओळख तपासा, त्याच्या कपाळावर टिळा असू द्या, तर त्यात गैर ते काय? हा काही शासनाचा कायदा नाही, पण आयोजकांनी स्वतःच्या आणि सहभागी होणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसाठी घेतलेली ती एक रास्त खबरदारी आहे. पण, या आवाहनामुळे मिरच्या कोणाला झोंबल्या? ज्यांना स्वतःला निधर्मी म्हणवून घ्यायचे आहे, पण ज्यांची नजर केवळ मुस्लिम व्होटबँकेवर खिळलेली आहे, अशा राजकीय नेत्यांना!


आदित्य ठाकरे आणि व्हीएचपीच्या आवाहनाला विरोध करणाऱ्या तथाकथित निधर्मी नेत्यांना एक रोकडा आणि अत्यंत महत्त्वाचा प्रश्न विचारणे आवश्यक आहे. जर तुम्हाला वाटत असेल की, गरबा हा एक सांस्कृतिक उत्सव आहे आणि त्यात मुस्लिमांना प्रवेश मिळालाच पाहिजे, तर हा अधिकार केवळ मुस्लिम पुरुषांपुरताच का मर्यादित असावा? महिलांनी, मुलींनी, आई-बहिणींनीसुद्धा गरब्याच्या मैदानात उतरून दांडिया खेळायला हवा, अशी भूमिका आदित्य ठाकरे का घेत नाहीत? गरबा हा असा उत्सव आहे जिथे हिंदू घरातील पुरुष, महिला, तरुण, वृद्ध सगळे एकत्र येऊन, पारंपरिक पोशाख परिधान करून भक्तिभावाने नृत्य करतात. तिथे स्त्री आणि पुरुष असा कोणताही भेदभाव नसतो. पण, जेव्हा गरब्यातील प्रवेशाचा मुद्दा येतो, तेव्हा मैदानात फक्त आणि फक्त मुस्लिम तरुणच का दिसतात? त्यांच्या घरातील महिलांना आणि मुलींना बुरख्याच्या आणि हिजाबच्या साखळदंडात डांबून ठेवायचे, त्यांना संगीताला आणि नृत्याला परवानगी द्यायची नाही; आणि स्वतः मात्र हिंदूंच्या पोरी जिथे खेळतात, तिथे जाऊन नाचायचे! हा कसला समभाव? हा कसला संस्कृतीचा आदर? जर उबाठा आणि त्यांचे समर्थक खरोखरच समानतेचे पुरस्कर्ते असतील, तर त्यांनी मुस्लिम समाजातील या पुरुषसत्ताक कट्टरतेला आव्हान दिले पाहिजे. त्यांनी उघडपणे सांगितले पाहिजे की, जर मुस्लिमांनी गरब्यात यायचे असेल, तर त्यांनी त्यांच्या कुटुंबातील महिलांना, बहिणींना आणि मुलींना सोबत घेऊन यावे. त्यांनीही हिंदू महिलांसोबत मनमोकळेपणाने गरबा खेळावा. अशी भूमिका घेण्याची धमक उद्धव, आदित्य ठाकरे या बापलेकांमध्ये आहे का? अहो ठाकरे, 'मुस्लिम महिलांनाही गरब्यात आणा!' असे आवाहन करा ना... तुम्ही ते करणार नाही. कारण तसे बोललात, तर तुमच्या मागे उभे राहिलेले कट्टरपंथी मुल्ला-मौलवी भडकतील आणि तुमची मते निघून जातील. म्हणजे हिंदूंच्या धार्मिक कार्यक्रमात मुस्लिम पुरुषांच्या प्रवेशासाठी बोंबाबोंब करायची; मुस्लिम महिलांच्या स्वातंत्र्यावर मात्र मौन बाळगायचे! हा प्रकार स्वार्थाची गुलामी आणि राजकीय बेईमानी आहे. ■

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### डीजेबंदी हवीच, पण राजकारण नको

गणेशोत्सव जवळ आला की डीजे, ध्वनी प्रदूषण आणि बंदीचा मुद्दा पुन्हा चर्चेत येतो. उत्सवाचा आनंद साजरा



करण्याचा अधिकार मंडळांना आहे; त्याचवेळी नागरिकांच्या शांततेचा अधिकारही महत्त्वाचा आहे. प्रश्न डीजेचा कमी आणि नियमांच्या समान अंमलबजावणीचा जास्त आहे. गणेशोत्सव असो, दहीहंडी असो, लग्न असो किंवा राजकीय सभा ध्वनिप्रदूषणाचे नियम सर्वांसाठी समान असले पाहिजेत. नियम मोडणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे; मात्र कारवाई करताना राजकीय दबाव, पक्षीय भूमिका किंवा भेदभावाला जागा नसावी. डीजेबंदी कराच, पण त्यासाठी धर्माचा किंवा राजकारणाचा मुद्दा बनवू नका. मंडळांनीच उत्सवाचा जल्लोष करताना वृद्ध, लहान मुले, रुग्ण आणि विद्यार्थ्यांचा विचार करावा. प्रशासनाने स्पष्ट नियम, निश्चित वेळ आणि ध्वनी मर्यादा जाहीर करून त्यांची कठोर अंमलबजावणी करावी. राजकारणासाठी आवाज वाढवण्यापेक्षा नियमांसाठी आवाज उठवला, तरच गणेशोत्सव खऱ्या अर्थाने आदर्श ठरेल.

**सचिन नागरे**/किनगाव जट्टू, ९६०४३२१४३२

■■■

### प्रवासी गाडी पुन्हा सुरू करा

अकोला हे एक महत्त्वाचे रेल्वे जंक्शन आहे, तरीही अनेक लांब पल्ल्याच्या सुपरफास्ट गाड्या येथे थांबत नाहीत. अकोला रेल्वे स्थानकावर खालील गाड्यांना दोन मिनिटांचा थांबा देण्याची प्रवाशांची दीर्घकाळापासूनची मागणी आहे- १२९९३/१२९९४ गांधीधाम-पुरी सुपरफास्ट एक्सप्रेस, २२८६५/२२८६६ एलटीटी-पुरी सुपरफास्ट एक्सप्रेस, २२८२७/२२८२८ सुरत-पुरी सुपरफास्ट एक्सप्रेस या गाड्यांच्या थांब्यामुळे विदर्भातून ओडिशा, गुजरात आणि मुंबईला जाणाऱ्या हजारो प्रवाशांना थेट कनेक्टिव्हिटी मिळेल, ज्यामुळे वेळ आणि पैसा या दोन्हींची बचत होईल. कोविड-१९ महामारीमुळे बंद असलेली नागपूर-भुसावळ-नागपूर प्रवासी गाडी पुन्हा सुरू करावी. ही गाडी रोज प्रवास करणारे प्रवासी, विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी अत्यंत उपयुक्त होती. जर नागपूरहून रेल्वेसेवा शक्य नसेल, तर अजनी-भुसावळ-अजनी मेमू ट्रेन सुरू करावी, ज्याला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळेल. अशी आशा आहे की, रेल्वे विभाग जनहितासाठी या मागणीवर लवकरच सकारात्मक निर्णय घेईल.

**राजेश कारिया**/अकोला

■■■

### स्क्रीनच्या पलीकडचे जग

आजच्या तंत्रज्ञानाच्या आणि वेगाने बदलणाऱ्या युगात मानवी जीवन अतिशय सोपे व जलद झाले आहे. मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून संपूर्ण जग एका क्लिकवर उपलब्ध आहे. मात्र, या सोयीसुविधांच्या आणि डिजिटल क्रांतीच्या मागे एक भीषण वास्तव दडलेले आहे- आजची तरुण पिढी नकळतपणे या स्क्रीनच्या जगात अडकत चालली आहे आणि स्वतःपासून तसेच समाजापासून दुरावत आहे. सोशल मीडियावरील 'लाईक्स', 'कमेंट्स' आणि सतत येणाऱ्या नोटिफिकेशन्स'च्या माऱ्यामुळे तरुण मनांवर एक अनामिक ताण निर्माण होत आहे. स्क्रोलिंगच्या या न संपणाऱ्या चक्रात माणसाला स्वतःशी संवाद साधायलाही वेळ उरलेला नाही. आभासी जगातील इतरांचे झगमगाटी आयुष्य पाहून स्वतःची तुलना करणे आणि त्यातून मानसिक अस्वस्थता ओढवून घेणे, हे आजच्या तरुणाईसमोरील मोठे आव्हान बनले आहे. आपण तंत्रज्ञानाद्वारे जगाशी तर जोडले गेलो आहोत, पण प्रत्यक्ष आयुष्यातील माणसे, निसर्ग आणि स्वतःचे अंतर्मन यांच्यापासून दूर जात आहोत. तेव्हा मानसिक शांतता, स्पष्टता आणि आत्मपरीक्षणासाठी 'डिजिटल डिटॉक्स' ही आज काळाची गरज बनली आहे. आठवड्यातून किंवा महिन्यातून किमान एक दिवस सोशल मीडिया आणि मोबाईलपासून पूर्णपणे दूर राहण्याचा संकल्प करायला हवा. पुस्तकांचे वाचन, डायरी लेखन, ध्यान-धारणा किंवा निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवल्यास अंतर्मनाचा खरा आवाज ऐकू येईल. यामुळे खरा आनंद आणि समाधान स्क्रीनच्या आत नसून आपल्या आत आहे, याची जाणीव व्हायला लागेल. डिजिटल डिटॉक्सचा हेतू केवळ मोबाईल बंद ठेवण्यापुरता मर्यादित नसून, त्यातून मिळणाऱ्या वेळेचा वापर सामाजिक हितासाठी करणे हा अपेक्षित आहे. प्रत्यक्ष आयुष्यात माणसे जोडण्याचा प्रयत्न करावा. समाजकार्याकरिता समाजात उतरून लोकांच्या अडचणी समजून घ्या आणि एकमेकांना मदतीचा हात द्या, वृद्धाश्रमात सेवा देणे, गरजू मुलांना मोफत शिकवणे, वृक्षारोपण करणे किंवा परिसर स्वच्छ ठेवणे अशा उदात्त कार्यात, उपक्रमात स्वतःला गुंतवा. सोशल मीडियाचा उपयोग केवळ मनोरंजनासाठी न करता समाजप्रबोधन, पर्यावरण संवर्धन आणि सकारात्मक विचारांचा प्रसार करण्यासाठी करा. तंत्रज्ञान हे मानवाच्या सोयीसाठी बनवले गेले आहे; माणसाने तंत्रज्ञानाचा गुलाम होता कामा नये. ■

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

www.tarunbharat.net
तरुण भारत
मागोवा
सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६


गोल्ड लोन
व्याजदर 0.90% प्रति माह
• योजना सर्व शाखेत उपलब्ध 9822272947
दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तीसगढ व मध्यप्रदेश)
आपला परिवार, आपली संस्था!
मुख्य कार्यालय प्लॉट नं. ४२-अ, सीताराम भवन, राम नगर चौक, शिवाजी नगर, नागपूर-१० | फोन: 0712-2524337 / 2520303

## रोखठोक

### हितेश शंकर

# अपमानाचे राजकारण

भारताला अशा नागरी सत्तेची गरज आहे, जी अपमानाला तथ्यांनी उत्तर देईल. खोट्या इतिहासाला खऱ्या इतिहासाने उत्तर देईल. गुन्ह्याला कायद्याने उत्तर देईल. खोटेपणाला पुराव्यांनी उत्तर देईल आणि चिथावणीला अशा संयमाने उत्तर देईल, जो आत्मविश्वासाचे लक्षण आहे, दुर्बलतेचे नाही.

भारताच्या विविध पातळ्यांवर पसरत असलेल्या प्रतिकात्मक संतापाच्या राजकारणाचा अनुभव तुम्ही कधी घेतला आहे का? नसेल, तर आता जागे होण्याची वेळ आली आहे.

जेव्हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक जगभर भारतीय ऐक्य आणि बंधुत्वाचा संदेश पसरवत होते, तेव्हा काही लोकांना त्याचा तीव्र अपमान वाटला. भारत, हिंदुत्व आणि ऐक्य यांच्या या शक्तीने संतप्त झालेल्यांना दुसरे काहीही सुचले नाही आणि त्यांनी आमच्या तिरंग्याला लक्ष्य केले. हे सहन केले जाऊ शकते का? त्याचप्रमाणे जौहरच्या सती मातांना भ्याड म्हणण्याचे धाडस कोणी केले, हे सहन केले जाऊ शकते का, ज्यांच्या बलिदानाने आजही लाखो भारतीयांच्या डोळ्यांत अश्रू आणि मुठी आवळल्या जातात? घराणेशाहीच्या राजकारणाचे अराजक प्रतीक असलेल्या सावरकरांना वारंवार मूर्खपणाचे बोलण्याचे स्वातंत्र्य दिले जाऊ शकते का? हे सहन केले जाऊ शकत नाही. पण, काय करावे याचा विचार करण्यापूर्वी हे सर्व नेमके काय आहे, याचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. उत्स्फूर्त, आकस्मिक प्रतिक्रिया किंवा संतापाच्या माध्यमातून अराजक राजकारणाचा पट मांडण्याचा हा एक खेळ आहे!



**श्रद्धा आणि सन्मानाला धक्का पोहोचवणारे दुष्टचक्र**

कोणत्याही सुसंस्कृत समाजात मतभेद व्यक्त करणे तिरस्करणीय नसते आणि भारतही त्याला अपवाद नाही. कोणी सरकारवर टीका करू शकतो; कोणी इतिहासाचा नवीन अर्थ लावू शकतो; कोणी एखाद्या विचारधारेशी किंवा राजकीय दिशेशी तीव्रपणे असहमत होऊ शकतो. पण, लोकशाही नेमकी याच स्वातंत्र्यामुळे टिकून आहे. समस्या तेव्हा सुरू होते, जेव्हा लाखो भारतीयांची ओळख, श्रद्धा, सन्मान आणि राष्ट्रीय भावना यांच्याशी जोडलेली प्रतीके, व्यक्तिमत्त्वे आणि आठवणी वारंवार वादाच्या केंद्रस्थानी आणल्या जातात.

तिरंगा हे याचे सर्वांत स्पष्ट उदाहरण आहे. तो केवळ तीन रंगांचा एक कपडा नाही. त्यात स्वातंत्र्यलढ्याची स्मृती आणि त्याग सामावलेला आहे. तो सर्व कल्याणकारी संविधानाची घोषणा आणि भारताच्या एकतेची ओळख आहे. त्यामुळे, जेव्हा तिरंग्याच्या अपमानाचे कोणतेही दृश्य समोर येते, तेव्हा त्याची प्रतिक्रिया कोणत्याही एका राजकीय पक्षापुरती मर्यादित राहत नाही. सामान्य नागरिकही दुखावतात. येथे एक गोष्ट अगदी स्पष्ट आहे. एखाद्या पक्षाला, संघटनेला किंवा व्यक्तीला विरोध करणे ही एक गोष्ट आहे आणि भारताच्या राष्ट्रध्वजाचा अपमान करणे ही पूर्णपणे वेगळी बाब आहे.

पण आजच्या राजकारणात या सीमा अनेकदा हेतुपुरस्सर पुसट केल्या जातात. हीच गोष्ट ऐतिहासिक व्यक्तींनाही लागू होते. वीर सावरकरांविषयीचे मतभेद खूप जुने आहेत. इतिहासकारांनी त्यांच्या विचारांवर आणि राजकीय भूमिकेवर चर्चा केली आहे आणि पुढेही करत राहतील. अगदी त्याचप्रमाणे इतर अनेक व्यक्तींनी काय केले आणि ते काय करू शकले असते, याबद्दल त्यांचे वेगवेगळे अर्थ लावले जातात. ही छाननी मुळीच चुकीची नाही आणि या भूमीवर कोणीही छाननीच्या पलीकडे नाही. आपल्या परंपरा आणि संस्कृतीने कोणत्याही देव किंवा देवीला यातून वगळलेले नाही. चर्चेसाठी प्रसिद्ध असलेल्या या भूमीत, विविध मतांचा नेहमीच आदर केला गेला आहे. होय, हे खरे आहे की, हा वैचारिक संघर्ष अंतर वाढवण्याच्या उद्देशाने नव्हता, तर सत्य आणि तथ्यांना धरून एकमत साधण्याच्या उद्देशाने होता. पण ऐतिहासिक छाननी आणि अपमानाची भाषा यात फरक आहे. जेव्हा आज केवळ एका राजकीय पक्षाला दुखावण्याच्या हेतूने एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा इतिहास हा ज्ञानाचा विषय न राहता सद्य राजकारणाचे एक शस्त्र बनतो.

अशीच परिस्थिती छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महाराणा प्रताप, भगतसिंग किंवा इतर ऐतिहासिक व्यक्तींच्या बाबतीतही उद्भवू शकली असती. एका गटाला दुखावणारी एखादी गोष्ट अनेकदा संपूर्ण समाजाला दुखावते. एका अल्प-परिचित, वादग्रस्त अभिनेत्रीने शूर सतींच्या जौहरवर केलेली अलिकडील आक्षेपार्ह टिप्पणी हे गुंतागुंतीचे समीकरण स्पष्ट करते. सती गेलेल्या त्या शूर स्त्रियांच्या शौर्यात भित्रेपणा नव्हे, तर पावित्र्याने झळाळणारे शौर्य होते. त्या काळातील सामाजिक नियम समजून घेतल्याशिवाय जौहरवरील चर्चा पूर्ण होऊ शकत नाही. परकीय आक्रमण, पराभव, पकडले जाण्याची भीती, स्त्रियांवरील अमानुष हिंसाचार आणि सन्मानाचे रक्षण करण्याची गरज. लाखो लोकांसाठी त्या स्त्रियांची आठवण ही केवळ एक ऐतिहासिक घटना नाही, तर त्याग आणि दुःखाची आठवण आहे आणि हा युक्तिवाद पुढे नेत तुम्ही किती दूर जाल, याची तुम्हाला कल्पना आहे का? मातृभूमीच्या रक्षणासाठी स्वतःचे बलिदान देणे हे शौर्य मानले जाईल की व्यक्तीच्या जगण्याच्या स्वातंत्र्याचे उल्लंघन? प्रामाणिकपणाच्या मार्गावर चालताना संघर्षाला सामोरे जाणे हा चारित्र्याचा सद्गुण मानावा की दुर्गुण? याच मार्गावर पुढे जाताना तुम्हाला अवैधता आणि अनैतिकता यांच्यातील संघर्षाचाही सामना करावा लागेल, जिथे यावर भर दिला जातो की, जर एखादी कृती कायद्याच्या विरोधात नसेल, तर ती स्वीकारार्ह असावी.


## आध्यात्म

# कृष्णभावनेने एकमेकांशी जोडू शकतो

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी अलिकडेच न्यू यॉर्कमधील ऐतिहासिक इस्कॉन मंदिराला भेट दिली. यावेळी त्यांनी भगवान श्रीकृष्णाची पूजा केली आणि भक्तांना संबोधित करताना म्हणाले की, आज जग अनेक संघर्षातून जात आहे. अशा वेळी मानवांना एकमेकांशी जोडण्यासाठी आणि जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी केवळ श्रीकृष्णाचे चैतन्यच आधार बनू शकते.

संपूर्ण जग कृष्णमय असून, आपल्याला कृष्णभावना जागृत करायची आहे. जगात विविध प्रकारचे संघर्ष आणि द्वैत दिसून येतात, परंतु त्यांच्यात एक चैतन्य आहे, जे सर्वांना जोडते. या ऐक्याचा श्रीकृष्णाच्या चैतन्याशी संबंध जोडून ते म्हणाले की, जेव्हा मनुष्याला त्याचे ईश्वराशी असलेले नाते आणि समस्त मानवजातीची एकता समजेल, तेव्हाच समाजात खरी शांतता नांदू शकेल.

त्यांनी आपला मुद्दा एका उदाहरणाद्वारे स्पष्ट केला. कोणत्याही संस्थेत मालक, अधिकारी आणि अनेक कर्मचारी असतात. प्रत्येकाच्या वेगवेगळ्या जबाबदाऱ्या असू शकतात, परंतु जर प्रत्येकाला माहिती असेल की, ते एकाच ध्येयासाठी काम करीत आहेत, तर त्यांचे काम जलद आणि चांगले होईल. त्याचप्रमाणे जगात मानवांची कार्यपद्धती भिन्न असू शकते, त्यांची परिस्थिती भिन्न असू शकते, परंतु जर त्यांना हे लक्षात आले की, प्रत्येकजण एकाच व्यापक हेतूने जोडलेला आहे, तर एकता प्रस्थापित होऊ शकते.





भागवतांच्या संबोधनाचा मूळ संदेश असा होता की, विविधता हे विभक्तीचे कारण नाही; तर व्यापक एकतेचा भाग आहे. मनुष्याने स्वतःमधील ती जाणीव जागृत करणे आवश्यक आहे, जी त्याला देव आणि इतर मानवांशी जोडते. श्रीकृष्णाचे चैतन्य समजून घेतल्याशिवाय जगात शाश्वत शांतीची कल्पना करणे कठीण आहे.

**प्रभुपादांच्या तपश्चर्येला अभिवादन**

डॉ. भागवत ज्या ठिकाणी पोहोचले, त्या ठिकाणाला इस्कॉनच्या इतिहासात विशेष महत्त्व आहे. न्यू यॉर्कमधील २६ सेकंड एव्हेन्यू येथे हे तेच ऐतिहासिक ठिकाण आहे, जिथे १९६६ मध्ये ए.सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांनी इस्कॉनची स्थापना केली. एका छोट्या केंद्रातून सुरू झालेला हा प्रवास आज जगातील अनेक देशांमध्ये पोहोचला आहे. सरसंघचालकांनी या ऐतिहासिक ठिकाणी पुष्प अर्पण करून प्रभुपादांना आदरांजली वाहिली. श्रीकृष्ण, भगवद्गीता आणि भारतीय आध्यात्मिक विचारांची भक्ती जगभर पोहोचवण्यासाठी इस्कॉनच्या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले.

> **मंदिरातूनही सेवेचा संदेश**
>
> सेवा हा देखील मोहनजी भागवतांच्या भेटीचा एक महत्त्वाचा पैलू होता. गरजू आणि बेघर लोकांसाठी राबविण्यात येत असलेल्या अन्न वाटप कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेतला. यानिमित्ताने न्यू यॉर्कमध्ये मोफत शाकाहारी भोजन वाटपाचा एक लाख थाळीचा टप्पाही पूर्ण झाला. इस्कॉन जगातील विविध भागांमध्ये मोफत अन्न वितरण कार्यक्रम राबवत आहे. भारतासह अनेक देशांमध्ये या कार्यक्रमांद्वारे गरजू लोकांपर्यंत अन्न पोहोचवले जाते. मोहनजी भागवतांच्या प्रवासातही आध्यात्मिक जाणिवेसह सेवेच्या या पैलूला महत्त्व प्राप्त झाले.

इस्कॉनच्या मते, आपल्या सहा दशकांच्या प्रवासात संस्थेने सुमारे एक हजार मंदिरे, सुमारे शंभर शाकाहारी भोजनालये स्थापन केली आहेत आणि जगातील विविध देशांमध्ये वैदिक साहित्याचा व्यापक प्रसार करण्याचे काम केले आहे. भगवद्गीतेसह वैदिक साहित्याच्या सुमारे ६० कोटी प्रती ८० हून अधिक भाषांमध्ये वितरित केल्या गेल्या आहेत.

**सहा दशकांचा प्रवास**

इस्कॉनच्या स्थापनेला ६० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मोहनजी भागवत यांची न्यू यॉर्कमधील ऐतिहासिक मंदिराची भेटही जोडली गेली. प्रभुपादांनी १९६६ साली न्यू यॉर्कमधून सुरू केलेली मोहीम आज कृष्णभक्ती आणि भारतीय आध्यात्मिक परंपरा जगाच्या अनेक भागांमध्ये पसरवण्याचे माध्यम बनले आहे.

डॉ. भागवत यांनी या जागतिक प्रवासाचे कौतुक केले आणि इस्कॉनच्या कार्यकर्त्यांना ईश्वरभावना आणि कृष्णभावनेचा संदेश जगापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांचा संदेश स्पष्ट होता की, जगात शांतता केवळ बाह्य व्यवस्थेने येणार नाही. यासाठी मनुष्याला स्वतःतील ती जाणीव जागृत करावी लागेल, जी त्याला ईश्वराशी आणि संपूर्ण मानवजातीशी जोडते. न्यू यॉर्कमधील त्याच ऐतिहासिक स्थानावरून जिथे प्रभुपादांनी सहा दशकांपूर्वी कृष्णभक्तीचा जागतिक प्रवास सुरू केला होता, तिथेच मोहनजी भागवत यांनी आजच्या संघर्षग्रस्त जगाला कृष्णभावना, एकता आणि सेवेचा संदेश दिला.

(पांचजन्यवरून साभार)

80 ते 85% हृदयातील ब्लॉकेज असूनही EECP उपचारामुळे मिळाला दिलासा; आता पुन्हा सामान्य जीवन जगत आहे

नागपूर : हृदयविकाराच्या रुग्णांसाठी ईईसीपी उपचार मोठ्या प्रमाणात परिणामकारक ठरत आहे. बायपास होऊनही समस्येने त्रस्त रुग्ण, ज्यांचा बायपास होऊ शकत नाही आणि जास्त वयाच्या रुग्णांनाही ईईसीपी उपचारातून आराम मिळत आहे. त्रिमूर्ती नगर येथील डॉ. प्रदीप पाटील यांच्या श्री स्वामी समर्थ हार्ट केअर सेंटर अँड मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये अशा अनेक रुग्णांना समस्यांवर मात करण्यास यश मिळाले आहे. एंजिओग्राफी नंतर डॉक्टर सामान्यतः एंजिओप्लास्टी किंवा बायपास शस्त्रक्रियेचा सल्ला देतात, पण या नंतरही शंभर टक्के आराम मिळेल याची हमी कुणीही देत नाही. दरम्यान ईईसीपी उपचारामध्ये बिना ऑपरेशन बायपस सुचविलेल्या रुग्णांनाही आराम मिळत आहे. याच कारणाने जेव्हा डॉक्टरांनी एंजिओप्लास्टी किंवा बायपास शस्त्रक्रियेचा सल्ला दिला, तेव्हा डॉ. प्रदीप पाटील यांच्याकडे जाऊन ईईसीपी उपचार घेण्याचा पर्याय निवडत आहेत. ह्या निर्णयामुळे त्यांना ऑपरेशन टाळण्यास मदत मिळते, तसेच आर्थिक दृष्ट्या देखील बचत होते. ईईसीपी उपचाराचा लाभ घेतलेले अनेक रुग्ण आता आपल्या नातेवाईक, मित्र आणि परिचीतांना देखील ईईसीपी उपचार घेण्याचा सल्ला देत आहेत.

श्वास घेण्यास होणारा त्रास आणि चालण्यातील अडचणींपासून ते निरोगी जीवनापर्यंतचा प्रवास

70 से 100% ब्लॉकेजेसचे
Latest VASOMEDITECH E.E.CP. TS3
मशीन द्वारा विना ऑपरेशन उपचार

Dr. Pradeep M. Patil
Non Surgical E.E.C.P./ACT/ Treatment Specialist Phoenix USA
Preventive Cardiologist
M.D. Dip in Preventive Cardiology
(Executive Member International Cardiology EECP Society) Vast 24 yrs of experience

Dr. Kaustubh D. Khetre
M.B.B.S., M.D.
(Community Medicine)
Certificate OF EECP
(International Cardiology EECP Society USA)

Dr. Rucha Patil Khetre
M.B.B.S., MD (ANAESTHESIA)
IDCCM
INTENSIVIST
Fellowship in Cardiac Rehabilitation
Certificate of E.E.C.P.
(International Cardiology E.E.C.P. Society USA)

वैशिष्ट्ये :
- विना ऑपरेशन कमी खर्चात उपचार
- वेदनारहीत उपचार दुष्परिणाम नाही.
- हॉस्पिटल मध्ये भर्ती होण्याची गरज नाही.

24 वर्षापासुन रुग्ण सेवेत कार्यरत
4 अत्याधुनिक EECP Ts3 USFDA मान्यताप्राप्त मशीन युक्त हॉस्पिटल | आमची इतर कुठेही शाखा नाही.
कृपया पेशंट आणि त्यांचे जुने रिपोर्ट सोबत आणावेत.
भेटण्याची वेळ : स. 9.00 ते दु. 1.00 आणि सायं. 6.00 ते 9.00 पर्यंत

सन 2017 पासून मी हृदयाशी संबंधित समस्यांशी झुंज देत होतो. तपासणीनंतर डॉक्टरांनी माझ्या हृदयाच्या रक्तवाहिन्यांमध्ये सुमारे 80 ते 85 टक्के ब्लॉकेज असल्याचे सांगितले. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार माझ्या हृदयात स्टेंट बसविण्यात आला. उपचारानंतर आता जीवन पूर्वपदावर येईल, अशी अपेक्षा होती; मात्र कालांतराने पुन्हा धाप लागणे, लवकर थकवा जाणवणे आणि चालताना त्रास होणे यांसारख्या समस्या सुरू झाल्या. थोडे अंतर चालल्यानंतरही मला धाप लागायची आणि दैनंदिन कामे करणेही कठीण वाटत होते. आरोग्याबाबत मनात सतत भीती आणि चिंता असायची. याच काळात मला EECP (Enhanced External Counter Pulsation) उपचाराबद्दल माहिती मिळाली. नोव्हेंबर 2025 मध्ये मी श्री स्वामी समर्थ हॉस्पिटलमधील डॉ. प्रदीप पाटील सर यांच्याशी संपर्क साधला. आवश्यक तपासण्या आणि वैद्यकीय मूल्यांकन केल्यानंतर त्यांनी मला EECP उपचार घेण्याचा सल्ला दिला. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मी 45 दिवसांचा EECP उपचार पूर्ण केला. उपचारादरम्यान हळूहळू माझ्या आरोग्यामध्ये सकारात्मक बदल जाणवू लागले. चालताना होणारा श्वास लागण्याचा त्रास कमी झाला, दैनंदिन कामे करणे सोपे वाटू लागले आणि पूर्वीच्या तुलनेत शरीरात ऊर्जा व आत्मविश्वास वाढला. 45 दिवसांचा उपचार पूर्ण झाल्यानंतर मला मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला. आज मी पूर्वीच्या तुलनेत अधिक चांगले आणि उत्साही वाटत असून पुन्हा सामान्य जीवनाकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न करत आहे. मी डॉ. प्रदीप पाटील सर आणि श्री स्वामी समर्थ हॉस्पिटलच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार मानतो. माझ्या अनुभवात EECP उपचार हा दिलासा आणि आत्मविश्वासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. माझे मत आहे की हृदयाशी संबंधित कोणतीही समस्या दुर्लक्षित करू नये. श्वास लागणे, छातीत अस्वस्थता जाणवणे किंवा लवकर थकवा येणे यांसारखी लक्षणे जाणवल्यास वेळीच डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक रुग्णाची परिस्थिती वेगळी असते. त्यामुळे कोणताही उपचार तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच घ्यावा. आज – मला पूर्वीपेक्षा खूप चांगले वाटत आहे. माझ्यासाठी हा उपचार केवळ 45 दिवसांचा कोर्स नव्हता, तर आशा, दिलासा आणि आत्मविश्वासासह जीवनाकडे पुन्हा सकारात्मकतेने पाहण्याचा एक नवा अनुभव ठरला. सी. एस. राव (76) रेशिमबाग, नागपूर

या रुग्णांसाठी उपयुक्त आहे ईईसीपी ट्रिटमेंट
- ज्यांना एंजियोप्लास्टी, बायपास सर्जरीचा सल्ला दिला आहे.
- ज्या रुग्णांना एंजियोप्लास्टी, बायपास केल्यानंतरही त्रास आहे.
- ज्यांची एंजियोप्लास्टी आणि बायपास होऊ शकत नाही.
- ज्या रुग्णांचे हृदय पंपींग कमी आहे.

श्री स्वामी समर्थ हार्ट केयर सेंटर
पत्ता : प्लॉट नं. 57/बी, गजानन महाराज मंदिर च्या मागे, त्रिमुर्ती नगर, नागपूर
मोबाईल क्र. 7083493268, 8390381479
वेबसाईट : www.eecpsssh.com, www.healurheart.com
कृपया सर्व पेशंट अपॉइंटमेंट घेऊनच यावे.
RB Ads

डॉ. हेडगेवार ग्रामीण अकृषक सहकारी पतसंस्था
मर्यादित नाचणगांव (मुख्यालय)
स्थापना 1998
आमच्या शाखा : नाचणगांव (मुख्यालय), वर्धा, हिंगणघाट, आर्वी, सेलू, नागपूर, यवतमाळ, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, अकोला आणि भंडारा
पुण्याला लवकरच सुरु
प्रस्तावित शाखा
बुलडाणा, वाशीम, गोंदिया या शाखांकरिता त्या जिल्ह्यातील कर्मचारी पाहिजे
संपर्क : 9764648383
मुदत ठेव व्याज दर १०.५%
बचत खाते व्याज दर ५%
आपल्या शहरातील शाखेला अवश्य भेट द्या.
संस्थापक अध्यक्ष : डॉ. जयंत ओक, मो. 9764648383

## 'शेतकरी मेळावा अपडेट

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक-शिक्षक संवाद आवश्यक - प्राचार्य

**परभणी,/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक आणि शिक्षकांमध्ये सातत्यपूर्ण संवाद आवश्यक आहे, असे प्रतिपादन नूतन विद्या समितीचे सहसचिव तथा मुख्याध्यापक-प्राचार्य अनंत पांडे यांनी केले.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक बाबी आणि पालक-शिक्षकांमधील समन्वय वाढविण्याच्या उद्देशाने नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा हायस्कूलच्या शिवाजीनगर शाखेत शनिवार १२ सप्टेंबर रोजी शिक्षक-पालक संवाद सभेचे आयोजन करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन विद्या समितीचे सचिव संतोष धारासुरकर होते. यावेळी पर्यवेक्षक सूर्यकांत पाटील, सहाय्यक पर्यवेक्षक सुनील रामपूरकर, पालक प्रतिनिधी हरिभाऊ गुहाडे व गोस्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. सभेला पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक पांडे यांनी विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता वाचन, क्रीडा, विज्ञान, कला, संस्कार आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या क्षेत्रातही प्रगती करावी, असे नमूद करीत घरातील अभ्यासाचे वातावरण, नियमित उपस्थिती, वेळेचे नियोजन, शिस्त, स्वच्छता आणि सकारात्मक विचार यांवर त्यांनी भर दिला. डिजिटल युगात विद्यार्थ्यांचा मोबाईलचा वाढता वापर चिंतेचा विषय असल्याचे सांगून अनावश्यक मोबाईल वापरापासून मुलांना दूर ठेवण्याचे आवाहन त्यांनी पालकांना केले. मोबाईलचा वापर शैक्षणिक गरजेपुरता मर्यादित ठेवून विद्यार्थ्यांना खेळ, वाचन, सर्जनशील उपक्रम आणि कौटुंबिक संवादासाठी प्रोत्साहन द्यावे, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालकांनी शाळेशी सातत्याने संपर्क ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले.

पालक प्रतिनिधी हरिभाऊ गुहाडे यांनी शाळेची शैक्षणिक प्रगती, शिस्तबद्ध वातावरण आणि विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. गोस्वामी यांनी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती परीक्षेतील यशाबद्दल समाधान व्यक्त करत शिक्षकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. सभेदरम्यान पालकांनी विविध प्रश्न व सूचना मांडल्या. शाळा प्रशासन व शिक्षकांनी त्यांना उत्तरे देत पालकांच्या सूचनांचा सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले.

अध्यक्षीय समारोपात धारासुरकर यांनी शाळा ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच संस्कार घडविणारी संस्था असल्याचे सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, कौशल्य, सर्जनशीलता, नेतृत्वगुण आणि नैतिक मूल्ये विकसित करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. पालकांनी समस्या व सूचना निःसंकोचपणे शाळेकडे मांडाव्यात. विद्यार्थी शैक्षणिकदृष्ट्या सक्षम, संस्कारक्षम आणि राष्ट्राभिमानी नागरिक घडविणे हेच शाळेचे ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपाळ रोडे यांनी केले. प्रास्ताविक विश्वास दिवाळकर यांनी, तर आभार सुनील रामपूरकर यांनी मानले.

### वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाला गती देण्याची पालकमंत्र्यांची मागणी : वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्याशी चर्चा

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी येथे सुरू असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाला अपेक्षित गती मिळावी, प्रलंबित बाबींचे तातडीने निराकरण करून प्रकल्प वेळेत पूर्ण करावा, यासाठी पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

या भेटीत वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामातील प्रलंबित बाबी, कामाची सद्यस्थिती आणि पुढील कार्यवाही याबाबत चर्चा झाली. प्रकल्प वेळेत पूर्ण झाल्यास परभणी जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा तसेच वैद्यकीय शिक्षणाची सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे कामाला आवश्यक गती देण्याबाबत यावेळी सकारात्मक चर्चा झाली.
वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रकल्प लवकर पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या बाबींचे तातडीने निराकरण करून कामाला गती देण्याची मागणी पालकमंत्री बोर्डीकर यांनी केली.

### अवैध वाळू वाहतुकीवर सप्टेंबर महिन्यात आतापर्यंत १३ कारवाया : ६७ लाख २७ हजारांचा मुद्देमाल जप्त; १६ जणांविरुद्ध गुन्हे दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरुद्ध परभणी पोलिसांनी विशेष मोहीम सुरू केली असून सप्टेंबर महिन्यात आतापर्यंत १३ कारवाया करण्यात आल्या आहेत. या कारवायांमध्ये ६७ लाख २७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून १६ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीविरुद्ध कारवाईची मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेने सात कारवाया करून ४१ लाख ९२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये हायवा व टिप्पर अशा आठ वाहनांचा समावेश आहे. जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या पथकांनीही सहा कारवाया केल्या. या कारवायांमध्ये २५ लाख ३५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल आणि सहा वाहने जप्त करण्यात आली आहेत. अशा प्रकारे जिल्ह्यात एकूण १३ कारवायांमध्ये ६७ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध वाळू चोरी व वाहतूकप्रकरणी एकूण १६ आरोपींविरुद्ध संबंधित पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात अवैध वाळूचा व्यवसाय करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. नागरिकांना अवैध वाळू उपसा किंवा वाहतुकीबाबत माहिती मिळाल्यास डायल ११२ वर संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

### पिंपळ्यात गॅसच्या टाकीचा स्फोट; संसारोपयोगी वस्तूंचे नुकसान : जीवीत हानी टळली

**मानवत,/प्रतिनिधी :** तालुक्यातील पिंपळा या गावी शुक्रवारी पहाटे एका घरातील गॅस सिलेंडरचा स्फोट झाला. त्यात संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. सुदैवाने त्या कोणतीही जीवीत हानी झाली नाही.

या गावातील यशवंत शिंदे यांचे घरी घराला कुलूप असतांना गॅस सिलेंडरचा अचानक मोठा स्फोट झाला व आगीने घरास वेढले. त्या स्फोटाच्या आवाजाने ग्रामस्थ भयभित झाले. काहींनी धाव घेतली व आग विझविण्याचा प्रयत्न केला. परंतु, आगीत घरातील संपूर्ण संसारोपयोगी साहित्य त्यात खाक झाले.

# बंजारा समाजाचे आंदोलन पेटले

## एसटी प्रवर्गात मागणी साठी बंजारा बांधव आक्रमक





**जिंतूर,/प्रतिनिधी:-** सध्या जिंतूर शहर विविध मागण्यासाठी आंदोलनाची केंद्र बनले असून या आंदोलनामुळे स्थानिक प्रशासन व पोलीस प्रशासन कमालीचे धास्तावल्याचे चित्र दिसून येत आहे.

जिंतूर शहरात आरक्षणासाठी मराठा समाजाचे आंदोलन, धनगर समाज तसेच बंजारा समाजाचे आंदोलन सुरू असुन आज बंजारा समाजाचे आंदोलन उग्र स्वरूपात झाल्याचे दिसून आले.

याविषयी सविस्तर माहिति असे की गत आठ दिवसापासून विनोद आडे या तरुणाने बंजारा समाजास एसटी प्रवर्गात आरक्षण द्यावे या प्रमुख मागणी साठी उपाषण करत आंदोलन छेडले आहे. या उपोषण आंदोलनाची उपोषण कर्त्ये विनोद आडे यांची शुगर व बीपी पातळी चढ उतार होत असल्याने व उपोषणाने त्याची तब्येत दिवसेंदिवस खालावत असल्याची भावना समाज बांधवात निर्माण होत होती. व याची कोणतीही स्थानिक प्रशासन दखल घेत नाही याबाबत समाज बांधवात तीव्र असंतोष खदखदत होता. १२ तारखेला रास्ता रोको आंदोलन आहे असा लेखी इशाराही दिलेला होता. दिलेल्या निवेदनात बंजारा समाजाच्या आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या तरुणाच्या कुटुंबांना एक कोटी रुपये आर्थिक मदत देण्यात यावी तसेच त्यांच्या कुटुंबातील एक पात्र व्यक्तीला शासकीय नोकरी द्यावी बंजारा समाजाला अनुसूची जमाती एसटी प्रवर्गात आरक्षण लागू करण्यात यावे अशा प्रसुख मागण्या करण्यात आलेल्या होत्या. जिंतूर तालुक्यात शहरी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात बंजारा समाज वसलेला आहे आजच्या आंदोलनात मोठ्या प्रमाणात बंजारा समाजासह महिलांचाही समावेश मोठ्या प्रमाणात दिसून आला.

चौकट

बंजारा समाजाने १२ तारखेच्या दिलेल्या शांततामय रस्ता रोको आंदोलनाची दखल स्थानिक पोलीस प्रशासन व महसूल प्रशासन यांनी गंभीरतेने घेतले नसल्याचे चित्र आज दिसून आले. समाज बांधवांनी शहरातील चोहो बाजूनी ज्यात अण्णाभाऊ साठे चौक, बलसा फाटा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, आदि सर्व चहुबाजूने रस्ता रोको आंदोलन करून स्थानिक पोलीस प्रशासनाची दमछाक झाल्याचे दिसून आले. ऊपोषणकर्ते आंदोलनाची जागा निश्चित करण्यासाठी स्थानिक तहसीलदार कच्छवे मॅडम व बंजारा बांधव शिष्टमंडळाची बाचाबाची झाल्याचे समजते. कारण पोलीस प्रशासन आंदोलन करण्यासाठी एक जागा निश्चित करत होते तर महसूल महसूल प्रशासन एक जागा निश्चित करत होते या सर्व घडामोडीत आंदोलन करते व स्थानिक प्रशासनात समन्वतेचा आभाव दिसून आला.. यातील दुरी वाढत गेली.. व आज तीव्र रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या रास्ता रोको आंदोलनामुळे एसटी प्रवासी सेवा अन्य वाहतूक सेवा विस्कळीत झाली. व्यापारी वर्गात मोठ्या प्रमाणात धांदल उडाल्याचे चित्र दिसून आले कारण काही ठिकाणी दुकानावर दगडफेक झाल्याचे प्रकारे घडल्याचे समजते.

## गंगाखेडात भाजी मार्केटच्या वादातून व्यापाऱ्याचा मृत्यू

**शिवीगाळ, धमकी व मारहाणीचा आरोप; गंगाखेडमध्ये व्यापाऱ्यांचा दोन दिवस कडकडीत बंद**

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** भाजी मार्केट स्थलांतराच्या कारणावरून झालेल्या वादात व्यापाऱ्याला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देत मारहाण केल्याची घटना गंगाखेड शहरातील जुन्या भाजी मार्केट परिसरात शुक्रवारी (दि. ११) सकाळी घडली. त्यानंतर छातीत दुखत असल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या व्यापाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी गंगाखेड पोलिस ठाण्यात चार ते पाच महिला-पुरुषांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयत व्यापारी सुनील भरत घरजाळे (वय ३७) यांचे जुन्या भाजी मार्केट परिसरात मोबाईल शॉपी अँड इलेक्ट्रॉनिक्सचे दुकान होते. याप्रकरणी गोविंद बालाजी नागरगोजे यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, भाजी मार्केट स्थलांतराच्या मुद्द्यावरून काही दिवसांपासून वाद सुरू होता. ११ सप्टेंबर रोजी सकाळी साडेनऊ ते दहा वाजण्याच्या सुमारास चार ते पाच भाजी विक्रेते महिला व पुरुषांनी घरजाळे यांच्याशी वाद घालत शिवीगाळ केली तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. यानंतर सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास पुन्हा वाद झाला. यावेळी संबंधितांनी घरजाळे यांच्या दुकानासमोर येऊन शिवीगाळ व मारहाण केल्याचा आरोप आहे. त्यानंतर घरजाळे यांच्या छातीत दुखू लागल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. पुढील उपचारासाठी परभणी येथे जाण्याचा सल्ला देण्यात आला. मात्र, प्रकृती खालावल्याने डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. दरम्यान, व्यापारी महासंघाने यापूर्वी अनधिकृत भाजी मार्केट हटविण्याबाबत नगरपालिका प्रशासनाकडे निवेदने दिली होती. मात्र, या प्रश्नावर ठोस कार्यवाही झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. व्यापाऱ्याच्या मृत्यूमुळे भाजी मार्केट स्थलांतराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, या घटनेमुळे व्यापारी वर्गात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. गंगाखेड पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(१), ३५२, ३५१(३) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक धन्यदेव प्रल्हाद सानप यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून, व्यापाऱ्याच्या मृत्यूचे नेमके कारण आणि घटनेतील संबंधितांची भूमिका तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

व्यापाऱ्यांचा दोन दिवस कडकडीत बंद...

व्यापारी सुनील घरजाळे यांच्या मृत्यूच्या निषेधार्थ गंगाखेड शहरातील व्यापाऱ्यांनी शुक्रवार व शनिवार असे सलग दोन दिवस बाजारपेठ बंद ठेवून निषेध नोंदविला. विविध व्यापारी संघटनांनी बंदला प्रतिसाद दिल्याने बाजारपेठेत शुकशुकाट दिसून आला. घटनेतील दोषींवर कठोर कारवाई करावी, भाजी मार्केट स्थलांतराचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा आणि व्यापाऱ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी व्यापाऱ्यांनी केली.

## एशियन डेव्हलमेंट बँक या योजने अंतर्गत जिंतूर मतदार संघातील ३४० कोटी रुपयांच्या कामास मंजूरी



**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर येलदरी सेनगाव रस्त्याची सुधारणा करणे ( किमी ५५/६०० ते ७०/६००) या कामास तब्बल ३४० कोटी रुपये मंजूर करण्यात आलेले असून सदरील रस्ता हा सीमेंट काँक्रिट चा होणार असून यात ३४ किमी लांबी समाविष्ट करण्यात आली आहे.

यामध्ये जिंतूर ते येलदरी या रस्त्याची दयनीय अवस्था लक्षात घेता आणि हाच महामार्ग पुढे मराठवाडा आणि विदर्भाशी जोडणारा महत्वाचा महामार्ग असल्याने प्राधान्याने हा रस्ता पूर्ण करण्यात येणार असून पुढील येलदरी ते सेनगाव रस्त्याचे काम यापूर्वीच पूर्ण झाले असल्याने या कामा ऐवजी उर्वरित १९ किमी लांबीचा सुधारीत रस्ता रामा २४८ सावंगी म्हाळसा सावली इटोली पोखरणी तांडा चिंचोली दराडे वस्सा आसेगाव दुधगाव प्रजिमा ७ प्रस्तावित करून महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री आदरणीय मा.नामदार मेघना साकोरे बोर्डीकर यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री मा.ना. श्री.शिवेंद्रराजे भोसले यांची मंत्रालय मुंबई येथे प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना या सुधारित कामाचे निवेदन दिले आणि या संदर्भात मा.मंत्री महोदय यांनी या बाबत तत्काळ कामाचा सर्व्हे करण्यात येणार असून (Detils Project Report) तयार करून अंदाजपत्रक सादर करण्यात येणार असल्याचे आश्वस्त करून संबंधित विभागास लवकर कार्यवाही करण्या बाबत सूचना देण्यात आल्या आहेत. या कामाच्या या कामाचा मागणीसाठी पंचायत समिती सदस्य रंजना बालाजी सांगळे यांनी परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांच्याकडे केली असता त्यांच्या मागणीला अखेर यश आले आहे.

### सरपंच श्रीमती कुसुमबाई प्रभाकरराव घुगे केहाळ यांचे निधन



**जिंतूर,/प्रतिनिधी-** श्री संदीप प्रभाकरराव घुगे संचालक वी.का.से. मर्या. केहाळ तथा मा. जिल्हा उपाध्यक्ष भाजपा युवा मोर्चा परभणी यांच्या मातोश्री श्रीमती कुसुम प्रभाकरराव घुगे मा. सरपंच केहाळ यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार कार्यक्रम आज संध्याकाळी ५.०० वाजता त्यांच्या मुळ गावी केहाळ येथे करण्यात आले. त्यांच्या पश्चात ३ मुली व १ मुलगा, नातवंड असा परिवार आहे.

## संत भगवानबाबा आश्रमशाळेत विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरण स्नेही गणेश मूर्ती



**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील संत भगवानबाबा माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेमध्ये शाडूच्या व काळया माती पासून पर्यावरण स्नेही गणेश मूर्ती तयार करण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची आवड निर्माण व्हावी यासाठी सदरील स्पर्धा आयोजित केली होती.या उपक्रमामध्ये आश्रमशाळेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. पर्यावरण स्नेही गणेश मूर्ती साकारताना विद्यार्थी तल्लीन झाले होते. काही विद्यार्थ्यांनी सुरेख व सुंदर अशा गणेश मूर्ती तयार केल्या.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंददायी वातावरण तयार झाले होते. अशा पद्धतीचे सहशालेय उपक्रम राबविल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यात आनंद होतो व विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास होतो असे मत इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय परभणी चे सहाय्यक संचालक श्री रामेश्वरजी मुंडे साहेब यांनी व्यक्त केले. तसेच श्री रामेश्वरजी मुंडे साहेब व श्री अजमेर शेख साहेब,समाज कल्याण अधिकारी (गट ब) यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे व आश्रमशाळेचे अभिनंदन केले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी आश्रमशाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी पुढाकार घेतला.

# शासनाच्या नियमांचे पालन करून गणेशोत्सव उत्साहात साजरा करा- पोलीस अधीक्षक पंकज कुमावत




**जिंतूर,/प्रतिनिधी-** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परभणी जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली मानवत येथील माहेश्वरी मंगल कार्यालयात शनिवारी (दि. १२) शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. गणेशोत्सव शांततापूर्ण, सुरक्षित आणि सामाजिक सलोखा जपत साजरा करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

बैठकीस तहसीलदार पांडुरंग माचेवाड, मुख्याधिकारी कोमल सावरे, गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे, पोलीस उपविभागीय अधिकारी दीपक वाघमारे, प्रभारी पोलीस निरीक्षक दर्शन शिंदे तसेच पोलीस उपनिरीक्षक वशिष्ठ बिक्कड यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकात तहसीलदार पांडुरंग माचेवाड यांनी गणेशोत्सव ही सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा असल्याचे सांगत सर्व गणेश मंडळांनी शासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन केले. उत्सव काळात ध्वनीप्रदूषण टाळणे, गणेशमूर्तीची सुरक्षित स्थापना करणे, सार्वजनिक सुव्यवस्था राखणे आणि पर्यावरणपूरक उपक्रमांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी बोलताना प्रभारी पोलीस निरीक्षक दर्शन शिंदे यांनी मानवत शहरातील सामाजिक सलोख्याचा विशेष उल्लेख केला. गणेशोत्सवादरम्यान विविध सामाजिक संस्था आणि प्रतिष्ठानांच्या माध्यमातून अन्नदानाचे उपक्रम राबविले जातात तसेच हिंदू-मुस्लिम बांधव एकमेकांना शुभेच्छा देत उत्सवात सहभागी होत असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीत सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या गणेश मंडळांचा राज्य शासनाच्या धोरणानुसार प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच दरवर्षीप्रमाणे यंदाही पेठ मोहल्ला परिसरात गणेशभक्तांसाठी पाणपोईची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे उपस्थित मुस्लिम बांधवांनी जाहीर केले. या बैठकीस गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, पोलीस पाटील, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, मुस्लिम धर्मगुरू आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस उपनिरीक्षक वशिष्ठ बिक्कड यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रभारी पोलीस निरीक्षक दर्शन शिंदे यांनी केले. बैठक यशस्वी करण्यासाठी गोपनीय विभागाचे पोलीस हवालदार विलास मोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सामाजिक सलोख्याचा संदेश गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव जपणारा उत्सव आहे.

मानवत शहरात दरवर्षी गणेशोत्सवादरम्यान विविध धर्मीय नागरिक एकत्र येऊन सामाजिक उपक्रम राबवितात. यंदाही शांतता, सुव्यवस्था आणि परस्पर सहकार्याच्या वातावरणात उत्सव साजरा करण्याचा निर्धार शांतता समितीच्या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## विश्लेषण

सोनाली मिश्रा

# हलाल वस्तूंनंतर आता हलाल साहित्य



हलाल कथा आणि हलाल प्रणय म्हणजे काय? इस्लामिक मूल्यांवर आधारित कथा आणि नाटके कशी लोकप्रिय होत आहेत आणि फ्रान्समध्ये फ्रेंच अभिजात साहित्यावर बहिष्कार टाकण्याची मोहीम का सुरू आहे, हे जाणून घ्या.

आपण हलाल वस्तू, हलाल विवाह इत्यादींबद्दल ऐकले आहे, पण तुम्हाला माहिती आहे का, की हलाल साहित्य अस्तित्वात आहे? हलाल नाटके, हलाल कथा इत्यादी आहेत. हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण ते अस्तित्वात आहे, आणि आता ते अधिकाधिक समोर येत आहे.

### हलाल साहित्य म्हणजे काय?

हलाल साहित्य म्हणजे काय, असा प्रश्न विचारणे अगदी स्वाभाविक आहे. ते धार्मिक साहित्य आहे का? की आणखी काही? इंटरनेटवर 'हलाल फिक्शन' हा एक खूप लोकप्रिय शब्द आहे. कदाचित आपण हा शब्द कधीच ऐकला नसेल. आपण हलाल अर्थशास्त्र, हलाल साखर, हलाल पीठ याबद्दल ऐकले असेल, पण हलाल फिक्शन? हा शब्द आपल्यासाठी नवीन असू शकतो! तथापि, तो नवीन असेलच असे नाही, कारण आपण बऱ्याच काळापासून हलाल फिक्शन पाहत आलो आहोत. हलाल फिक्शन म्हणजे इस्लामी मूल्ये, नीतिमत्ता आणि तत्त्वांच्या चौकटीत लिहिलेल्या कथा.

आणि भारतीय समाज हे सर्व केवळ आजच नाही, तर बर्याच काळापासून पाकिस्तानी मालिकांच्या माध्यमातून पाहत आहे. भारतात लोकप्रिय असलेल्या सर्व पाकिस्तानी मालिकांमध्ये, मुस्लिम कुटुंबांच्या समस्यांवरील उपाय शरियानुसार दाखवले जातात. त्यातील काल्पनिक, आदर्श पात्रे अशी असतात जी इस्लामी मूल्यांच्या विरोधात कधीच जात नाहीत. या मालिका पाहिल्याने कोणत्याही मुस्लिमाच्या धार्मिक भावना दुखावल्या जात नाहीत. आणि जिथे असे घडते, ते भाग त्वरित काढून टाकले जातात.

हलाल फिक्शनचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते इस्लाममध्ये निषिद्ध असलेल्या कोणत्याही गोष्टीला प्रोत्साहन देत नाही आणि प्रणय कथादेखील त्याच्या मर्यादेतच असतात. प्रणय कथा विनम्रता लक्षात घेऊन लिहिल्या जातात.

### हलाल रोमान्स म्हणजे काय?

त्या त्याचे वर्णन शरिया-अनुरूप साहित्य असे करतात. त्या स्पष्टपणे सांगतात की, मुस्लिम ब्रदरहुड चळवळ पाश्चात्य आणि युरोपीय समाजात आपली विचारधारा पसरवण्यासाठी हलाल रोमान्सचा वापर करीत आहे. म्हणजेच, जी गोष्ट लोक एक साधी प्रेमकथा म्हणून पाहतात किंवा त्यात रमून जातात, ती कोणत्यातरी विचारधारेच्या प्रभावाखाली लिहिली जात असते. त्याने आपल्या ब्लॉगमध्ये लिहिले आहे की, ज्याप्रमाणे युरोपमध्ये बाजारपेठांवर नियंत्रण ठेवण्यासाठी हलालीकरणाचा वापर केला गेला, त्याचप्रमाणे साहित्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी हलाल प्रेमाचा वापर केला जात आहे. तो म्हणतो की, २० वर्षांपूर्वी जेव्हा त्याने याविरोधात आवाज उठवला, तेव्हा त्याला माहीत होते की, अखेरीस हे प्रत्येक क्षेत्रात पसरेल.

डाव्या विचारसरणीच्या लोकांनी त्याचे संशोधन कसे थांबवण्याचा प्रयत्न केला, हे त्याने स्पष्ट केले, पण आज ते प्रत्यक्षात उतरत आहे. हलाल प्रेम कोणत्याही विशिष्ट धर्मापुरते किंवा पंथापुरते मर्यादित नाही; उलट, प्रेमाच्या नावाखाली ते आपल्या अटी व्यापक समाजात पसरवत आहे. त्यांनी लिहिले आहे की, मुस्लिमांनी आपल्या अटी इतरांवर लादणे आवश्यक आहे, कारण जर त्यांना त्यांच्या इस्लामसाठी अनुकूल वातावरण आणि स्थानिक परंपरा मिळाल्या नाहीत, तर ते त्यांच्या धर्मानुसार जगू शकणार नाहीत. म्हणूनच, तो प्रथम सभोवतालचे वातावरण, स्थानिक परंपरा इत्यादींना इस्लामनुसार जुळवून घेतो, कारण त्यांचा विश्वस आहे की, त्यानंतर लोक निश्चितपणे शरियाचे पालन करण्यास सुरुवात करतील.

### हलाल साहित्याचे इस्लामीकरण

हलाल साहित्याच्या संदर्भात त्या म्हणतात की, बाजारातील साहित्याचे इस्लामीकरण प्रथम एका नकारात्मक टप्प्याने सुरू झाले, ज्यात जे हराम मानले जात होते, ते काढून टाकण्यात आले आणि मुस्लिमांच्या भावनांचा आदर करण्यात आला. त्यानंतर, एक सकारात्मक निर्मितीचा टप्पा सुरू झाला, जिथे केवळ काही गोष्टी काढून टाकणे हा उद्देश नाही, तर हलालच्या रूपात एक पर्यायी सांस्कृतिक अवकाश सादर करणे हा आहे, ज्याची स्वतःची परिभाषा, कथा आणि पद्धती आहेत. त्यांचा युक्तिवाद आहे की, हे साहित्य, बालसाहित्य, दूरदर्शन आणि अगदी फॅशनमध्येही घडले आहे. त्यांचा असाही युक्तिवाद आहे की, जेव्हा बाजारपेठ एखादी गोष्ट स्वीकारते, तेव्हा व्यापारीही त्याचेच अनुकरण करतात. परंतु यामुळे हा प्रश्न निर्माण होतोः हलाल कथासाहित्य ठीक आहे, पण केवळ इस्लामी मूल्यांचा अभाव आहे म्हणून फ्रेंच अभिजात साहित्याला नाकारणे आवश्यक आहे का?

सोशल मीडियावर असेही वृत्त आहे की, मुस्लिम फ्रेंच इन्फ्लुएन्सर्स अभ्यासक्रमात शिकवले जाणारे फ्रेंच साहित्य वाचण्यासही नकार देत आहेत. त्यांचा युक्तिवाद आहे की, फ्रेंच अभिजात साहित्यात शारीरिक संबंधांवर उघडपणे चर्चा केली जाते आणि हे विनयशीलतेचे लक्षण मानले जात नाही, त्यामुळे असे साहित्य टाळले पाहिजे. असे करून ते साहित्याची विभागणी करीत नाहीत का? आपण हलाल साहित्यावर चर्चा करायला नको का? इतर भाषांतील साहित्य नाकारून हलाल साहित्य निर्माण करण्याच्या कटावर आपण चर्चा करायला नको का?

(पांचजन्यवरून साभार)

### हलाल साहित्यावर आता चर्चा का?

आता आणखी एक प्रश्न निर्माण होतोः हलाल साहित्यावर आता चर्चा का होत आहे? खरे तर, हलाल साहित्यावर आता चर्चा होत आहे; कारण फ्रान्समधील मुस्लिम प्रभावशाली व्यक्तींनी फ्रेंच अभिजात साहित्याविरुद्ध एक मोहीम सुरू केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, फ्रेंच अभिजात साहित्य शरिया कायद्याशी सुसंगत नाही आणि म्हणूनच त्यावर बहिष्कार टाकला पाहिजे.हा काही अलिकडचा मुद्दा नाही. अनेक वर्षांपासून सोशल मीडियावर हा चर्चेचा विषय आहे. सुमारे पाच वर्षांपूर्वी अलेस्टीकाल डॉट नेटवर याच विषयावर एक अहवाल प्रकाशित झाला होता. त्यात असे नमूद केले होते की, टिकटॉकवर बनवलेले छोटे व्हिडीओ लोकांना इस्लामकडे कसे आकर्षित करीत आहेत आणि असे व्हिडीओ लोकांना इस्लाममधील काय करावे आणि काय करू नये, हे समजण्यास कशी मदत करीत आहेत. आणि आता अशी चर्चा आहे की, हेच अज्ञात लोक फ्रेंच साहित्या-बद्दल छोटे व्हिडीओ पोस्ट करीत आहेत आणि ते इस्लामिक तत्त्वांचे उल्लंघन करते, असे कारण देत फ्रेंच साहित्यावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन करीत आहेत. फ्रेंच मानववंशशास्त्रज्ञ आणि संशोधक फ्लॉरेन्स बर्जू-ब्लॅकलेर्क यांनी त्यांच्या ब्लॉगमध्ये या विषयावर विस्तृतपणे लिहिले आहे.



३ सप्टेंबर रोजी संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी नवी दिल्लीत 'रक्षा' दस्तऐवजाचे प्रकाशन केले. २०२६-२०३६ साठी भारताच्या संरक्षण राजनैतिक धोरणाचे चार आधारस्तंभ- सामरिक भागीदारी, क्षमता बांधणी, संरक्षण निर्यात आणि सागरी सुरक्षा याबद्दल जाणून घ्या.

# भारताचा सामरिक राजनैतिक दृष्टिकोन

## चिंतन

लेफ्टनंट जनरल एम. के. दास

'रक्षा' नावाचा हा दस्तऐवज पुढील दशकातील सामरिक राजनैतिक धोरणासाठी भारताचा पहिला एकात्मिक प्रयत्न आहे. राजनाथसिंह म्हणाले, संरक्षण मुत्सद्देगिरी हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा एक मुख्य आधारस्तंभ असल्याने हा दस्तऐवज पुढील दशकासाठी एक स्पष्ट, कृतीयोग्य दृष्टीकोन प्रदान करतो. बदलत्या जागतिक परिस्थितीत भारत शांतता, स्थिरता आणि नियम-आधारित व्यवस्थेचा आधारस्तंभ राहील, हे तो सुनिश्चित करतो. (पुढील १० वर्षांसाठी) निश्चित कालमर्यादेसह असलेल्या धोरणात्मक आराखड्याचे महत्त्व भारताच्या व्यापक राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून समजून घेतले पाहिजे.

### संरक्षण मुत्सद्देगिरी

संरक्षण मुत्सद्देगिरीची अधिकृत व्याख्या अशी आहे की, संघर्षाचा अवलंब न करता द्विपक्षीय/बहुपक्षीय संबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी, पारदर्शकता वाढवण्यासाठी, विश्वास निर्माण करण्यासाठी आणि धोरणात्मक वातावरणाला अनुकूल आकार देण्यासाठी तिचा वापर केला जातो. संरक्षण मुत्सद्देगिरी म्हणजे शांतताकाळात संरक्षण संसाधनांची तैनाती ज्यात लष्करी देवाणघेवाण, संयुक्त सराव, प्रशिक्षण कार्यक्रम, बंदरांना भेटी, उच्चस्तरीय दौरे, संरक्षण प्रदर्शने, क्षमता बांधणी आणि मानवीय सहाय्य आणि आपत्ती निवारण कार्यांचा समावेश होतो. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, संरक्षण मुत्सद्देगिरी शांतताकाळात सशस्त्र दलांचा परराष्ट्र धोरणाचे साधन म्हणून वापर करते, जेणेकरून परस्पर विश्वास वाढवून युद्ध टाळता येईल आणि धोरणात्मक फायदा मिळवता येईल. भारताला संरक्षण राजनैतिकतेचा समृद्ध इतिहास आहे, जो परदेशातील ५२ संरक्षण शाखा आणि विविध भारतीय दूतावास/उच्चायुक्तालयांमध्ये संरक्षण सहचारी म्हणून तैनात असलेल्या १०० हून अधिक अधिकाऱ्यांमुळे अधिक मजबूत झाला आहे.

जरी भारत संरक्षण राजनैतिकतेमध्ये एक प्रस्थापित जागतिक खेळाडू असला तरी, काही कारणास्तव आपल्या धोरणात्मक उद्दिष्टांना मार्गदर्शन करणारा कोणताही औपचारिक दस्तऐवज अस्तित्वात नव्हता. म्हणूनच संरक्षण या दस्तऐवजाचा उद्देश २०२६-२०३६ या दशकात संरक्षण राजनैतिकतेला राष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र धोरण आणि संरक्षण-औद्योगिक हितसंबंधांचे एक संरचित, दीर्घकालीन साधन बनवणे हा आहे. डिफेन्स नावाचा हा दस्तऐवज चार स्तंभांवर आधारित आहे, ज्यापैकी प्रत्येकाचे स्पष्ट धोरणात्मक आणि आर्थिक परिणाम आहेत. हे चार स्तंभ आहेतः धोरणात्मक भागीदारी, क्षमता बांधणी, संरक्षण निर्यात आणि सागरी सुरक्षा. हा दस्तऐवज सध्याच्या प्रत्येक प्रकरणानुसार केल्या जाणाऱ्या संरक्षण सहभागातून एका सुसंगत, सिद्धांतासारख्या दृष्टिकोनाकडे होणाऱ्या बदलाचे संकेत देतो, जो सर्व क्षेत्रांमध्ये आणि विभागांमध्ये योग्यरीत्या लागू केला जाऊ शकतो. या दस्तऐवजाद्वारे भारताने संरक्षण राजनैतिकतेच्या माध्यमातून जागतिक स्तरावर आपली वाढती भूमिका स्पष्ट केली आहे.

### सामरिक भागीदारी

सामरिक भागीदारीचा पहिला आधारस्तंभ म्हणजे प्रमुख भागीदार आणि गटांसोबतचे द्विपक्षीय आणि बहुपक्षीय सुरक्षा सहकार्य. प्रत्येक प्रदेशातील अनेक देशांची भारतासोबत सामरिक भागीदारी आहे. बेल्जियमचे पंतप्रधान वेव्हर यांच्या अलिकडील भारत दौऱ्यातही सरकारी आणि औद्योगिक अशा दोन्ही स्तरांवर संरक्षण सहकार्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले होते. क्वाड किंवा आसियानसारख्या भारतासोबतच्या सामरिक भागीदारीमुळे संयुक्त नियोजन, आंतरकार्यक्षमता आणि संकटकालीन समन्वयासाठी निश्चितता येते, ज्यामुळे वादग्रस्त परिसर किंवा प्रदेशातील कोणताही गोंधळ कमी होतो. दुसरा आधारस्तंभ क्षमता बांधणीशी संबंधित आहे, ज्यात संयुक्त सराव, संस्थात्मक प्रशिक्षण आणि दीर्घकाळात लष्करी संबंधांचा विस्तार करणे समाविष्ट आहे. माझ्या लष्करी कारकीर्दीत मला अनेक परदेशी देशांसोबत अशा क्षमता बांधणीवर काम करण्याची संधी मिळाली.



'संरक्षण'चा तिसरा आधारस्तंभ म्हणजे संरक्षण निर्यात, ज्याचा उद्देश भारताला एक विश्वसनीय जागतिक संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून स्थापित करणे आहे. भारत आधीच १०० हून अधिक देशांना लष्करी सामग्रीची निर्यात करतो, परंतु तो अवाजवी किमतींवर विश्वास ठेवत नाही. त्यामुळे भारत संरक्षण निर्यातीबाबत नैतिक धोरणाचे पालन करतो. 'मेक इन इंडिया'ला एक राजनैतिक साधन म्हणून वापरण्यावर लक्ष केंद्रित करून, भारताने खरेदीदारांचे भारतीय पुरवठा साखळी आणि दुरुस्ती केंद्रांवरील सामरिक अवलंबित्व अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला आहे. चौथा स्तंभ सागरी सुरक्षा आहे, जो मानवीय सहाय्य आणि आपत्ती निवारण, चाचेगिरीविरोधी मोहीम, सागरी क्षेत्राची जागरूकता आणि खुल्या समुद्रातील नौकानयन यामध्ये भारताची भूमिका मजबूत करतो. नेपाळमधील अलिकडील पुराच्या वेळी पुन्हा एकदा सिद्ध झाल्याप्रमाणे, भारत शेजारील देशांमध्ये 'प्रथम प्रतिसाद देणारा' देश आहे. भारत हिंद महासागर क्षेत्रात 'निव्वळ सुरक्षा प्रदाता' म्हणूनही उदयास आला आहे.

पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात सर्वसमावेशक राष्ट्रीय सुरक्षेच्या संकल्पनेवर भारताचा वाढता विश्वास दर्शवणारा 'रक्षा'सारखा दूरदर्शी दस्तऐवज पाहणे खरोखरच आनंददायक आहे. हा दस्तऐवज निश्चित उद्दिष्टांसह संरक्षण राजनैतिकतेच्या पुराणमतवादी दृष्टिकोनातून अधिक सक्रिय दृष्टिकोनाकडे भारताने केलेला बदल देखील दर्शवतो. हा दस्तऐवज विशेषतः इंडो-पॅसिफिक प्रदेशातील चीनच्या स्थानावर लक्ष केंद्रित करतो.

(पांचजन्यवरून साभार)

## यश 'सिंदुर'चे

विष्णू शर्मा

# पाकिस्तानने शस्त्रसंधीसाठी याचना केली

संपूर्ण ऑपरेशन पार पाडणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यां-मार्फत ऑपरेशन सिंदूरमागील सत्य उघड झाले आहे. 'डीक्लासिफाईड : ऑपरेशन सिंदूर' हा माहितीपट ८८ तासांच्या ऑपरेशनदरम्यान निर्णय कसे घेण्यात आले आणि पाकिस्तानला प्रत्युत्तर देण्याची रणनीती काय होती, हे उघड करतो.

विरोधी पक्ष लष्कराचा आदर करण्याची आणि लष्करी अधिकाऱ्यांवर बोट न दाखवण्याची परंपरा विसरले आहेत. सर्जिकल स्ट्राईक असो वा एअर स्ट्राईक, अनेक प्रमुख नेत्यांनी त्यांच्याकडून पुरावा मागण्यात कोणतीही कसर सोडली नाही. एकीकडे त्यांनी सर्व श्रेय लष्कराला दिले तर दुसरीकडे, त्यांनी त्याच्या यशावर शंका घेतली. 'ऑपरेशन सिंदूर'च्या बाबतीतही नेमके हेच घडले. महिला लष्करी अधिकार्यांनाही सोडले नाही. परंतु या ऑपरेशनचे सर्वांत विशेष वैशिष्ट्य म्हणजे, भारतीय लष्करी इतिहासात तिन्ही दलांनी 'ऑपरेशन सिंदूर' हे एकच नाव दिलेले हे पहिले ऑपरेशन होते. अशा परिस्थितीत सत्ताधारी राजकारण्यांना दूर ठेवून लष्करी अधिकाऱ्यांनी स्वतः संपूर्ण ऑपरेशनचा प्रत्येक बारकावा सांगितला आहे.

डिस्कव्हरी प्लस ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झालेल्या 'डीक्लासिफाईडः ऑपरेशन सिंदूर' या माहितीपटाचे दिग्दर्शक माणिक बेरी असगावकर आणि प्रभू असगावकर आहेत. तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख आणि संरक्षण प्रमुख अनिल चौहान (सध्या निवृत्त), पाकिस्तानी दहशतवादी तळ आणि मोक्याची हवाई तळ उद्ध्वस्त करणारे लढाऊ वैमानिक किंवा विविध बटालियनचे कमांडर अशा या ऑपरेशनमध्ये थेट सहभागी असलेल्या प्रत्येक व्यक्तीची यशस्वीपणे मुलाखत घेतल्याबद्दल ते कौतुकास पात्र आहेत. सर्वांत लक्षवेधी व्यक्ती म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, जे आपल्या पहिल्याच निवेदनात भावना आणि संताप दोन्ही जागृत करतात, जेव्हा ते सांगतात की, दहशतवाद्यांनी त्या महिलेला सांगितले होते, जा आणि मोदींना सांग, जे काही करता येईल ते कर.

### ८८ तासांच्या ऑपरेशनची कहाणी

या मालिकेची सुरुवात लष्करी ऑपरेशन्सचे महासंचालक राजीव घई यांच्या परिचयाने होते. जेव्हा त्याला २२ एप्रिल २०२५ रोजी पहलगामच्या बैसरन खोऱ्यात झालेल्या दहशतवादी हल्ल्याची बातमी मिळते, तेव्हा ते थेट लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्याकडे जातात, जे निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांच्या मेळाव्याला संबोधित करीत असतात. ते सर्वांसमोर जनरल उपेंद्र द्विवेदी यांना हल्ल्याची माहिती देतात. कोणतेही नाट्यमय पुनर्नाट्य चित्रित केले गेले नाही, तर घटनास्थळावरील छायाचित्रे वापरली गेली. तथापि, लष्कराने प्रत्यक्ष कारवाईच्या असंख्य फाईल्स, फोटो आणि व्हिडीओ देखील पुरवले, ज्यामुळे ही मालिका थरारक दृश्यांनी भरलेली आहे. त्यानंतर एकानंतर एक अधिकारी सांगतात की, पंतप्रधान मोदी आणि अजित डोवाल यांना कशी माहिती देण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपला सौदी दौरा अर्धवट सोडून भारतात कसे परत आले आणि दिल्ली विमानतळावर बैठक कशी घेतली. हे इतक्या सहजपणे सादर केले आहे की, ते अजिबात राजकीय वाटत नाही, परंतु यातून देशाला हा संदेश जातो की, पंतप्रधानांनी हा मुद्दा इतका गांभीर्याने घेतला की त्यांनी पहिली सामरिक बैठक विमानतळा-वरच घेतली. अजित डोवाल यांच्याकडून पंतप्रधानांनी तिथे जे म्हटले ते ऐकून सर्व शंका-कुशंका दूर होतातः ते जमिनीवर असोत, आकाशात असोत, पाताळात असोत, कुठेही असोत... आम्ही त्यांचा पाठलाग करू... आम्ही त्यांना सोडणार नाही.

सरकार सतर्क होते. २०१६ च्या सर्जिकल स्ट्राईकनंतर अनेक विरोधी नेत्यांनी पुरावा म्हणून फोटो आणि व्हिडीओंची मागणी करून सरकारला चुकीचे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. २०१८ मध्ये ते व्हिडीओ आणि फोटो प्रसिद्ध करू शकले. पण यावेळी ७ मे च्या हल्ल्याच्या दिवशीच कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग या दोन महिला लष्करी अधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेऊन मुरीदके (जैश-ए-मोह-म्मदचे मुख्यालय) आणि बहावलपूर (लष्कर-ए-तोयबाचे मुख्यालय) यासह अनेक दहशतवादी तळांवरील हल्ल्यांचे फोटो आणि व्हिडीओ सादर केले. त्यामुळे कोणीही पुराव्याची मागणी करू शकले नाही. त्याऐवजी संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी जुलै २०२५ मध्ये संसदेत केलेल्या एकही सैनिक मारला गेला नाही' या विधानालाच मुद्दा बनवण्यात आले.

राजनाथसिंह यांचे विधान होते, भारतीय बाजूने हल्ला केला तेव्हा एखादी महिला वैमानिक मारली गेली का? त्यांनी हे स्पष्टपणे नाकारले. त्यांनी ऑपरेशन सिंदूर दरम्यान कोणत्याही वैमानिकाच्या बलिदानाचा इन्कार केला. दरम्यान, ऑपरेशन सिंदूर दरम्यान, सरकारने मे महिन्यात पाकिस्तानी गोळीबारात हुतात्मा झालेल्या सहा सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी त्यांची नावे जाहीर केली होती. असे असूनही के. सी. वेणुगोपाल यांनी संरक्षण मंत्र्यांच्या विधानाचा खोटा आरोप म्हणून वापर करीत त्यांच्याविरुद्ध हक्कभंगाचा प्रस्ताव मांडला.

त्याचप्रमाणे, जेव्हा पाकिस्तानने काही राफेल आणि एक सुखोई विमान पाडल्याचा दावा केला, तेव्हा विरोधी पक्षांनी तत्काळ त्याचा फायदा उचलला. तथापि, जेव्हा अलिकडेच ३६ राफेल विमानांसाठी इंधनाची निविदा काढण्यात आली, तेव्हा सर्व राफेल विमाने सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाले. मात्र, विरोधी पक्षांनी सिंगापूरमध्ये सीडीएस चौहान यांनी केलेल्या एका वक्तव्याचाही मुद्दा उपस्थित केला. त्या वक्तव्यात त्यांनी राफेल अपघात आणि वैमानिकाच्या मृत्यूच्या बातम्या नाकारल्या होत्या, पण कोणीही ते गांभीर्याने घेतले नाही.

### शस्त्रबंदी आणि भारताची रणनीती

ही संपूर्ण मालिका पहलगाम हल्ल्यानंतर झालेल्या ८८ तासांच्या मोहिमेवर केंद्रित आहे, ज्यात २२ एप्रिलपासून ७ मे च्या सुरुवातीपर्यंत उचललेल्या प्रत्येक पावलाचा तपशील आहे. तथापि, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शस्त्रबंदीच्या दाव्यानंतरही विरोधी पक्ष जे आरोप करीत आहेत, त्यावर ही मालिका निश्चितपणे काही प्रकाश टाकते. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी स्वतः सांगितले की, पहिल्या हल्ल्यानंतर अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांनी पंतप्रधान मोदींना फोनवर कळवले की, पाकिस्तान एका मोठ्या हल्ल्याची तयारी करीत आहे. पंतप्रधान मोदींनी उत्तर दिले की, ते तीनपट मोठा प्रत्युत्तरात्मक हल्ला करतील. डीजीएमओ राजीव घई यांनी स्पष्ट केले की, जेव्हा त्यांना कळले की, दिल्लीला लक्ष्य करून सिरसा येथे एक क्षेपणास्त्र (फताह सेकंड) पडले आहे, तेव्हा पंतप्रधान मोदींसोबतच्या बैठकीत तत्काळ एक मोठा निर्णय घेण्यात आलाः ११ मोक्याच्या हवाईपट्ट्यांना लक्ष्य करून ब्रह्मोस क्षेपणास्त्राची चाचणी घेणे. त्यानंतर असिम मुनीर यांनी अमेरिकेचे संरक्षण सचिव मार्को रुबियो यांना फोन केला. मार्को यांनी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांना फोन केला. जयशंकर यांनी स्पष्टपणे सांगितले की, तिसर्या पक्षाचा हस्तक्षेप अस्वीकार्य आहे. त्यांनी त्यांच्या डीजीएमओंना आमच्या डीजीएमओंना फोन करण्याचा आग्रह केला.

### खोट्या धमक्या

पहिल्या पाकिस्तानी दहशतवादी हल्ल्यानंतर ७ मे रोजी जेव्हा राजीव घई यांनी पाकिस्तानच्या डीजीएमओंना हल्ल्याची माहिती देण्यासाठी फोन केला, तेव्हा त्यांनी उत्तर दिले की, ते प्रत्युत्तर दिल्यानंतरच भारताशी फोनवर बोलतील. पण तीन दिव-सांनंतर जेव्हा भारताच्या ब्रह्मोस क्षेपणास्त्राने पाकिस्तानची सर्व हवाई तळ उद्ध्वस्त करून त्याला राखेत बदलले, तेव्हा १० मे रोजी पाकिस्तानने भारताकडे शस्त्रसंधीची मागणी केली. हे स्पष्ट आहे की, कोणताही अमेरिकन दबाव नव्हता; उलट, शस्त्रसंधी भारताच्या अटींवर होती.

या माहितीपटात व्हिडीओ, सॅटेलाईट प्रतिमा आणि हल्ल्यांच्या वेळी तळांजवळ असलेल्या व सोशल मीडियावर शेअर केलेल्या पाकिस्तानी नागरिकांचे व्हिडीओ समाविष्ट आहेत. केवळ हे व्हिडीओच नव्हे, तर दहशतवाद्यांच्या



अंत्यविधीला उपस्थित राहिलेल्या पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांचे फोटोही पाहायला मिळतील. भारताने आपल्या हवाईपट्ट्यांवर केलेल्या हल्ल्यानंतर पाकिस्ताननेही अनेक भारतीय हवाईपट्ट्यांवर हल्ला केल्याचे आणि भारताच्या अनेक एस-४०० क्षेपणास्त्रविरोधी प्रणाली नष्ट केल्याचे खोटे दावे केले होते, ज्याला कोणत्याही स्वतंत्र किंवा बाह्य संस्थेने दुजोरा दिलेला नाही. या मालिकेच्या पहिल्या सीझनचे आतापर्यंत केवळ दोन भाग प्रदर्शित झाले असून, लवकरच पहलगाम हत्याकांडाच्या सूत्रधारांची कहाणी आणि त्यानंतर त्यांचा शोध घेऊन त्यांना ठार मारणे, 'न्यूक्लियर हिल'वरील हल्ल्याची कहाणी यासारख्या अनेक रंजक घटना उघडकीस येतील, अशी अपेक्षा आहे.

### म्हणून नाव 'ऑपरेशन ट्यूलिप'

जरी या माहितीपट मालिकेत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार डोवाल आणि एका लष्करी विश्लेषकाची व केवळ लष्करी अधिकाऱ्यांचीच वक्तव्ये असली तरी, पंतप्रधान आणि संरक्षण मंत्र्यांची केवळ काही सार्वजनिक व्हिडीओ वक्तव्ये दाखवून ही मालिका अ-राजकीय ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. एका लष्करी अधिकाऱ्याने पंतप्रधान मोदींच्या वक्तव्याचा उल्लेख केला, जर त्यांच्या गोळ्या आल्या, तर आम्ही तोफगोळ्यांनी प्रत्युत्तर देऊ. लष्करप्रमुख स्पष्ट करतात की, पंत-प्रधानांनी त्यांना या मोहिमेसाठी नाव सुचवण्यास सांगितले होते. मी म्हणालो, ऑपरेशन ट्यूलिप, कारण ते खोऱ्यात घडले होते. त्यांनी विचारले, ऑपरेशन सिंधू कसं राहील? मी म्हणालो, हो, तेही चालेल. मग ते म्हणाले, सिंधू नाही, ऑपरेशन सिंदूर, कारण आमच्या मुलींनी त्यांचे कुंकू गमावले आहे. तथापि, ही मालिका तरुण पिढीसाठी महत्त्वाची आहे; कारण देशाचे रक्षण करण्यासाठी आपले सशस्त्र दल राजकीय नेतृत्वाच्या खांद्याला खांदा लावून कसे काम करतात, हे त्यांना कळायला हवे.

नऊ दहशतवादी तळ नष्ट करण्यासाठी सुरुवातीला लक्ष्ये कशी निश्चित केली गेली होती, हे त्यांना शिकायला मिळेल. लष्करावर सात ठिकाणांची जबाबदारी होती, तर हवाई दलावर जैश आणि लष्कर-ए-तोयबाच्या मुख्यालयांची जबाबदारी होती. मग, जेव्हा पाकिस्तानने जोरदार गोळीबार सुरू केला, तेव्हा भारताने त्याहूनही अधिक जोरदार गोळीबार करून त्यांना आपली रणनीती बदलण्यास भाग पाडले. त्यानंतर पाकिस्तानने तुर्की ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ला चढवला, जो भारतीय ड्रोन आणि एस-४०० दहशतवादविरोधी क्षेपणास्त्रांनी हाणून पाडला. पाकिस्तानच्या क्षेपणास्त्रांना प्रत्युत्तर म्हणून ११ मोक्याच्या हवाईपट्ट्या कशा उद्ध्वस्त करण्यात आल्या आणि पाकिस्तानला युद्धविराम पुकारण्यास कसे भाग पाडले, याचा प्रत्येक तपशील ते शिकतील. या मालिकेत हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग आणि नौदल प्रमुख डमिरल दिनेश के. त्रिपाठी यांनीही त्या काळातील अनेक धोरणात्मक अंतर्दृष्टी सांगितल्या आहेत. दोन आठवड्यांपूर्वी पाकिस्तानी लष्करप्रमुख असिम मुनीर यांनी एका कार्यक्रमात भारत आणि हिंदूंविरोधात कशी गरळ ओकली, यातून त्यांच्या दुष्ट हेतूचे संकेत कसे मिळाले, हेही तरुण शिकतील. संरक्षण दलांचे प्रमुख आणि राजकीय नेतृत्व 'सरप्राईज फॅक्टर' कायम ठेवण्यावर अधिक लक्ष केंद्रित करीत होते, जेणेकरून शत्रूला ते काय करणार आहेत याची कल्पनाही करता येऊ नये, हेही ते शिकतील. त्यामुळे, ऑपरेशनच्या रात्री एकाही लष्करी अधिकाऱ्याने वॉर रूममध्ये येण्यापूर्वी आपण कुठे जात आहोत किंवा का जात आहोत, याबद्दल आपल्या कुटुंबीयांना माहिती दिली नाही. कोणीही आपला ताफा सोबत घेतला नाही आणि अनेकांनी तर आपल्या गाड्या किंवा सुरक्षाही सोबत घेतली नाही. ७ मे रोजी झालेल्या हल्ल्यानंतर लष्कराच्या ट्विटर खात्यावरून देशाला आणि जगाला या हल्ल्याबद्दल माहिती देण्याची जबाबदारी ज्या तरुण लष्करी अधिकारी हर्षला देण्यात आली होती, त्याचे निवेदन दाखवणेही मनोरंजक होते. असे असूनही काही चेहऱ्यांची निवेदने दाखवण्यात आली, त्यांच्या पोस्ट्सही दाखवण्यात आल्या, पण त्यांचे चेहरे लपवण्यात आले, काही ठिकाणी 'अघोषित ठिकाण' असे लिहिले होते, काही महत्त्वाचे मुद्दे एका लहान वाक्यात सारांशित केले होते आणि या माहितीपटाच्या प्रदर्शनानंतर पाकिस्तानच्या 'न्यूक्लियर हिल' कैराना टेकड्यांसंदर्भात सीडीएस अनिल चौहान यांच्यावर झालेल्या हल्ल्याबाबत दिलेल्या निवेदनाचा या मालिकेत उल्लेखही नाही आणि या सर्वांचे एकमेव कारण केवळ पाकिस्तान किंवा चीनसारखे शत्रू देशच नाहीत, तर आपल्या देशाचा विरोधही आहे, जो अशा संवे-दनशील ऑपरेशनवरही बोट दाखवायला मागेपुढे पाहत नाही.

(पांचजन्यवरून साभार)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# रुग्णांच्या आरोग्याशी तडजोड सहन केली जाणार नाही : आमदार बोंढारकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १३ सप्टेंबर -**

विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयातील अतिदक्षता विभागात गेल्या दोन-तीन दिवसांपासून एसी बंद असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. याची माहिती मिळताच आमदार आनंदराव बोंढारकर यांनी तात्काळ रुग्णालयात पोहोचून प्रत्यक्ष पाहणी करून रुग्णालय प्रशासनास रुग्णाच्या आरोग्याची तडजोड सहन केली जाणार नाही असा दमदार इशारा दिला.

विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात गेल्या तीन-चार दिवसापासून अतिदक्षता विभागातील एअर कंडिशन (एसी) बंद पडल्याने रुग्णांची गैरसोय होऊन रुग्णांच्या जीवित अशी येथील




आरोग्य प्रशासन खेळत असल्याचे दिसून येते ही परिस्थिती पाहून दक्षिणचे आमदार बालाजी पाटील बोंढारकर यांनी तात्काळ येथील प्रशासनास खडसावले आहे यावेळी त्यांनी

रुग्णांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असा सक्त इशारा वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिला.एसी दुरुस्ती व स्वच्छतेचे तातडीने आदेश आयसीयू विभागात नवजात बालकांवर उपचार सुरू असताना तापमान नियंत्रण अत्यंत महत्त्वाचे असते. एसी बंद असल्याने उकाड्याचा त्रास होत असल्याच्या तक्रारी रुग्णांच्या नातेवाइकांनी केल्या होत्या. आमदारांनी नातेवाइकांशी संवाद साधून अडचणी जाणून घेतल्या आणि अधिकाऱ्यांना धारेवर धरत एसी तातडीने दुरुस्त करण्याचे आदेश दिले.

तसेच पाहणीदरम्यान स्वच्छतागृहांची अस्वच्छता आणि बेडशीटची दुरवस्था दिसून आली. रुग्णांना स्वच्छ व सुरक्षित वातावरण देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे सांगत, स्वच्छता व्यवस्था सुधारण्याच्या कडक सूचना त्यांनी दिल्या. रुग्णसेवेत हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, अशी ताकीदही त्यांनी दिली.

# जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्याकडून पिकांची पाहणी

**तभा वृतसेवा**
**सोनखेड, दि. १३ सप्टेंबर -**

कोरड्या दुष्काळाच्या छायेत असलेल्या शेतकऱ्याच्या शेतात जाऊन १३ सप्टेंबर रोजी सोनखेड शिवारात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सोयाबीन कापूस,हळद, पिकाची पाहणी केली.

नांदेड जिल्ह्यात मागील दोन महिन्यापासून पावसाचा पडलेला खंड त्यामुळे सबंध जिल्ह्यातील शेतकरी हा चांगलाच निसर्गाच्या लहरीपणामुळे अडचणीत सापडला असून सर्वत्र कोरडा दुष्काळ जाहीर करा अशी ओरड होत असताना १३ सप्टेंबर रोजी सोनखेड शिवारातील गट क्रमांक ६४२,६४३,६९४ मध्ये स्वतः शेतात जाऊन राहुल कर्डिले साहेब यांनी पिकाची पाहणी केली त्यामध्ये पाण्या अभावी सोयाबीनची वाढ खुंटली आहे कमी अल्प प्रमाणात लागलेल्या



शेंगाची जाग्यावर चपटी झाली आहे त्यामधील सोला पोकलेला नाही तसेच कापसाच्या पिकावर पाऊस नसल्या कारणाने पांढऱ्या माशांचा व लाल्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याचे लक्षात आले व एका झाडाला केवळ तीन ते चार बोंडेच असल्याचेही जिल्हाधिकारी यांनी पाहिले आणि हळद पिकाची देखील वाढ खुंटलेल्याचा परिणाम त्यांच्या कृषी अधिकाऱ्यांनी लक्षात आणून दिला या सर्व नैसर्गिक आपत्तीवर मागील वर्षाच्या धर्तीवर शासन स्तरावर प्रयत्न करून पिक विमा व दुष्काळी अनुदान हे अधिक प्रमाणात देण्याचा प्रयत्न करू असेही आश्वासन यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना जिल्हाधिकारी यांनी दिले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी शेतकऱ्यां सोबत बोलताना म्हणाले की खरोखरच दीर्घ काळ पावसाचा खंड पडून पिकांचे नुकसान झाले असून शासनाकडे याची पूर्ण माहिती देऊन जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ठोस आश्वासन शेतकऱ्यांना दिले

यावेळी उपस्थित उपजिल्हाधिकारी विलास नरवटे,तहसीलदार विठ्ठल परळीकर,तालुका कृषी अधिकारी प्रशांत कासराळे, कृषी सहाय्यक एस.पी. सोनवणे, उप कृषी अधिकारी एल.एम हांडे,एस.के.गच्चे,सहाय्यक कृषी अधिकारी नम्रता सूर्यवंशी,ग्राम महसूल अधिकारी उमाकांत भांगे,उपसरपंच सुनील मोरे शेतकरी प्रवीण मोरे,सुदाम राव मोरे,भागवत हांडे, कृष्णा ठाकूर, रमेश शिरसागर आदींची उपस्थिती होती.

## पर्यावरणपूरक 'गोमय गणेश'मूर्ती आमदार हेमंत पाटील यांना भेट

**नांदेड**-गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत श्रीकृष्ण गोशाळा, पोखर भोसी यांच्या वतीने पर्यावरणपूरक 'गोमय श्री गणेश' मूर्ती आमदार हेमंत पाटील यांना स्नेहपूर्वक भेट देण्यात आली. श्रीकृष्ण गोशाळेचे कार्याध्यक्ष संजय भंडारी, सचिव



प्रल्हाद घोरबांड, संचालक रामजीभाई भानुशाली, अशोकजी हेडा आणि आशिष कदम कोहलीकर यांनी ही पर्यावरणपूरक गणेशमूर्ती आमदार हेमंत पाटील यांच्याकडे सुपूर्द केली. गोमयापासून साकारण्यात आलेली ही गणेशमूर्ती पर्यावरणपूरक असून, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना एक उत्तम पर्याय आहे. गोसेवा, भारतीय संस्कृती आणि पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संगम या उपक्रमातून साधला जात आहे, असे आमदार हेमंत पाटील यांनी यावेळी सांगितले.आमदार हेमंत पाटील यांनी श्रीकृष्ण गोशाळेच्या या उपक्रमाचे कौतुक करून नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करावी आणि पर्यावरण संवर्धनात आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. गोमय गणेशमूर्तींच्या वापरामुळे पर्यावरणाचे रक्षण होण्यासोबतच गोशाळांना आर्थिक बळ मिळण्यास मदत होते. त्यामुळे हर घर में मंगल, हर मन में संवेदना या संदेशातून यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले.

## विद्या विकास विद्यालयात विद्यार्थी-पालक-शिक्षक संवाद मेळावा उत्साहात

**बाऱ्हाळी**-बाऱ्हाळी येथील विद्या विकास माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी व पालकांसाठी विशेष 'विद्यार्थी-पालक-शिक्षक संवाद मेळावा व सहविचार सभा' घेण्यात आली. बाऱ्हाळी ता. मुखेड येथील विद्या विकास माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दि. २४ ऑगस्ट रोजी इयत्ता पाचवी वर्गातील (तुकडी अ, ब, क ) विद्यार्थी - पालक व शिक्षक मिळावा व सहविचार संवाद सभा घेण्यात आली. यावेळी विद्यार्थी व पालक यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून एकमेकांच्या समस्यावर चर्चा करण्यात आली. त्या अनुषंगाने मुख्याध्यापक प्रा.शिरीष लव्हेकर यांच्या नियोजनाखाली शनिवारी (दि. १२ ) इयत्ता १० वी वर्गातील विद्यार्थी - पालक व शिक्षक यांच्यात कुली चर्चा होऊन एकमेकांच्या अडचणी दूर होण्याच्या दृष्टीकोनातून 'संवाद मेळावा व सहविचार सभा' घेण्यात आली. आगामी बोर्ड परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे मानसिक बळ वाढवणे, अभ्यासाचे अचूक नियोजन करणे आणि शाळा-पालकांमध्ये समन्वय साधणे हा या सभेचा मुख्य उद्देश होता. सदर मेळाव्याला संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई देशपांडे (अम्मा) यांची मुख्य उपस्थिती लाभली होती. त्यांनी आपल्या अनुभवी मार्गदर्शनाखाली पालकांशी थेट संवाद साधत मुलांच्या जडणघडणीत कौटुंबिक वातावरणाचे महत्त्व अधोरेखित केले. व्यासपीठावर विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा. शिरीष लव्हेकर, उपमुख्याध्यापक प्रशांत जोशी, पर्यवेक्षक बळवंत परमाळे, प्रदीप महाजन, राजकुमार धोत्रे, लियाकत शेख, संभाजी पाटील, बजरंग उमाटे, व्यंकट कानोटे, उद्धव बाचे, बालाजी डुबुकवाड, मुकेश कांबळे यांच्या सह शिक्षकवर्ग उपस्थित होते.

## एएसआय विश्वनाथ हंबर्डे यांची पीएसआय पदी पदोन्नती

**नांदेड** - सोनखेड पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले स्थानिक बिट चे एएसआय विश्वनाथ बालाजीराव हंबर्डे यांची पोलीस उपनिरीक्षक



(पीएसआय) पदी पदोन्नती झाल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला आहे.त्यांनी आपल्या एकंदरीत ३३ वर्षाच्या सेवेमध्ये लोहा,मुदखेड,भोकर,हदगाव सोनखेड या पाच ठिकाणी कर्तव्य बजावले व तसेच त्यांनी पोलीस खात्या अंतर्गत असलेली स्पर्धा परीक्षा एमपीएससी ही २०१३ मध्ये दिली आणि ते पात्रही झाले तीच त्यांच्या सेवा ज्येष्ठतेची व परीक्षा उत्तीर्णतेची पावती देत त्यांची गृह विभागाने पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती करत यांच्याकडे अधिकचे अधिकार बहाल केले आहेत त्यांच्या या यशाबद्दल पोलीस ठाणे सोनखेड आणि आप्तेष्टांच्या वतीने त्यांचा सत्कार करून भावी कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

## फरार आरोपीस अटक करण्याची नागरिकांची मागणी

**नवीन नांदेड** -नांदेड ग्रामीण ठाणे हद्दीत बनावट कागदपत्राच्या आधारे मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था आणि प्लॉट धारकांची फसवणूक करणारा आरोपी मोहम्मद साजिद इरफान मोहम्मद युसुफ खान राहणार उमर कॉलनी देगलूर नाका यांच्याविरुद्ध नांदेड ग्रामीण ठाण्यात विविध कलमानुसार गुन्हा नोंद करण्यात आला असून सदरील आरोपीस अटकपूर्व जामीन नांदेड कोर्टात न मिळाल्याने तो फरार झाल्याने त्यास शोधून अटक करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. बळीरामपूर येथील बनावट कागदपत्राद्वारे प्लॉट धारकांची व मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेची फसवणूक प्रकरणी सहा महिन्यापूर्वी नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदरील गुन्हेगारांची जामीन नांदेड कोर्टात नामंजूर झाल्याने तो आरोपी फरार आहे. याचा शोध घेण्यासाठी पोलीस अन्य ठिकाणी शोध कार्य चालू असून नांदेड ग्रामीण पोलिसांनी जाहीर केले आहे की वरील आरोपी कोणास आढळून आल्यास पोलिसांना कळवावे त्यास योग्य ते बक्षीस देण्यात असे जाहीर केले आहे. आणि त्या व्यक्तीचे नाव गोपनीय राहील असे सांगितले आहे. सदरील आरोपीवर नांदेड शहरात इतवारा पोलीस ठाणे व नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे अनेक गुन्हे नोंद आहेत. तेव्हा या आरोपीस पोलीस प्रशासनाने लवकरात लवकर अटक करून त्यांच्याकडून झालेली फसवणूक व त्यांना दिलेला बनावट प्लॉटचे कागदपत्र त्यानुसार त्यांची रक्कम परत मिळवून द्यावी व नागरिकांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी फसावणूकदार नागरिकांनी केली आहे.

# सेवागड- वसुर फाटा येथे गोर बंजारा तिज महोत्सव उत्साहात साजरा

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. १३ सप्टेंबर -**

सेवागड-वसूर फाटा येथे आयोजित करण्यात आलेल्या गोर बंजारा तिज महोत्सवात हजारो बंजारा बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत महोत्सवाचा आनंद घेतला. यावेळी बंजारा संस्कृती, परंपरा आणि एकतेचे दर्शन घडविणाऱ्या या महोत्सवात पारंपरिक वेशभूषेतील नृत्य, तिज मातेचे दर्शन तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी परिसर भक्तिमय व उत्साहपूर्ण झाला.

सेवागड वसुर ता. मुखेड येथे शनिवार दि. १२ सप्टेबर रोजी गोर बंजारा तिज महोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार



पडला. कार्यक्रम प्रसंगी मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. तुषार राठोड यांनी श्री संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी आमदार बाबुसिंग महाराज, माजी आमदार राजेश राठोड, शेषेराव चव्हाण,देविदास राठोड, शेखर देशमुख, बालाजी पाटील सकनुरकर, व्यंकटराव जाधव वसुरकर, संचालक भीमराव राठोड,हेमंत खंकरे, सुधीर चव्हाण, राम जाधव, आर. सी. चव्हाण, शिवाजी राठोड, सचिन पवार, किरण चव्हाण, सचिन चव्हाण, विकास चव्हाण, विलास चव्हाण, शिवाजी चव्हाण, रमेश पाटील, सरपंच विजय जाधव, वसंत राठोड, तुपाजी जाधव, रोहिदास जाधव, वैभव राठोड, सुनील राठोड, अशोक राठोड, यांच्यासह बंजारा समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तिज महोत्सवामुळे बंजारा संस्कृतीचे वैभव आणि सामाजिक एकतेचा संदेश यावेळी प्रकर्षाने जाणवला. पारंपरिक बंजारा वेशभूषेत सहभागी झालेल्या महिला व युवकांनी सादर केलेल्या नृत्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. महोत्सवासाठी परिसरातील हजारो बंजारा बांधवांची उपस्थिती असल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## जागोजागी कचऱ्याचे ढिगारे; नगरपंचायतीच्या दुर्लक्षामुळे नागरिक त्रस्त

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १३ सप्टेंबर -**

शहरातील सन उत्सवाच्या काळामध्ये विविध वार्डामध्ये कचऱ्याचे ढिगारे साचल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नगरपंचायतीच्या दुर्लक्षामुळे अनेक ठिकाणी नियमित कचरा उचलला जात नसल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे.



मुख्य रस्ते, बाजारपेठ परिसर तसेच काही निवासी भागांमध्ये कचरा साचून दुर्गंधी पसरत आहे. यामुळे डास व माशांची संख्या वाढली असून साथीच्या रोगांचा धोका निर्माण होईल. पावसाळ्याच्या दिवसांत ही समस्या अधिक गंभीर बनत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

नगरपंचायतीने स्वच्छतेसाठी विविध योजना राबविल्याचा दावा केला असला तरी प्रत्यक्षात अनेक भागांमध्ये स्वच्छतेचा अभाव दिसून येत आहे. कचरा संकलनासाठी येणारी वाहने नियमित नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या समस्येकडे नगरपंचायत प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन नियमित कचरा उचल, स्वच्छता मोहीम आणि आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# कंधारच्या भूमिपुत्राची गगनभरारी ; कुलगुरूपदाने वाढविला कंधारचा मान !



**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. १३ सप्टेंबर -**

कर्तृत्व, गुणवत्ता आणि आपल्या कार्याच्या बळावर कंधारच्या भूमीचे नाव राज्याच्या शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रात उज्ज्वल करणारे डॉ.व्यंकट गीते यांची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकच्या कुलगुरूपदी नियुक्ती झाल्याबद्दल दि.१२ सप्टेंबर रोजी नियोजन भवन नांदेड येथे मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण,माजी खासदार तथा लोहा कंधारचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर आणि खासदार डॉ.अजित गोपछडे यांच्या उपस्थितीत डॉ. व्यंकट गीते यांचा सन्मान करण्यात आला. कंधारच्या भूमिपुत्राने राज्यातील प्रतिष्ठेच्या विद्यापीठाच्या कुलगुरूपदापर्यंत झेप घेतल्याने कंधारकरांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

डॉ.गीते यांची कुलगुरूपदी निवड झाल्याने उल्लेखनीय यशाने त्यांच्या मित्रपरिवारात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांचा मनःपूर्वक सत्कार करून शुभेच्छा दिल्या.यावेळी डॉ. आनंद भगत, नवनाथ तोरणे, संजय आवाळे, प्रवीण मुखेडकर, बालाजी गायकवाड, ज्ञानेश्वर बिडवई, शिवकुमार बचेवार, वैजनाथ भोस्कर, प्रभाकर बोड्डावार, राजकुमार बिडवई, दिगंबर गडपलेवार , प्रशांत संगेवार आणि राजाराम पांडागळे यांच्यासह मित्रमंडळी उपस्थित होती.

'मित्राच्या यशाचा आनंद म्हणजे स्वतःच्या यशाचा अभिमान' या भावनेतून मित्रमंडळींनी डॉ. गीते यांच्या यशाचा आनंद साजरा केला. कुलगुरूपदाची जबाबदारी समर्थपणे पार पाडत त्यांच्या कर्तृत्वाने महाराष्ट्राच्या आरोग्य व शिक्षण क्षेत्राला नवी दिशा मिळावी आणि कंधारच्या भूमीचा नावलौकिक देशपातळीवर अधिक उंचावावा,अशा मनःपूर्वक शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या.

# लोह्यातील क्रीडा संकुलासाठी ३ कोटी, अभ्यासिकेसाठी ५० लाख : आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १३ सप्टेंबर -**

लोहा-कंधार मतदारसंघाचे नेते आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आपल्या भागातील विद्यार्थ्यांना दूरगामी उपयुक्त ठरणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे.

गणेशोत्सव मुहूर्तावर : आ. चिखलीकरांची तरुणाईला ३.कोटी ५० लक्ष रुपयांची गिफ्ट,जाहीर केली त्यातूनन लोह्यात क्रीडा संकुल आणि नगर पालिकेच्या वतीने अद्यावत अभ्यासिका साकारणार आहे .

आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी निवडणूक काळात युवकांना पोलीस, सैन्य, निमलष्करी दल, पीएसआय व अन्य भरतीसाठी मैदानी तयारी करणाऱ्या आवश्यक मैदान आणि अभ्यासासाठी अद्ययावत सुविधा व स्पर्धा परीक्षेची पुस्तके उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. गणेशोत्सवाच्या मुहूर्तावर पहिल्या टप्प्यात लोहा शहरातील क्रीडा संकुलासाठी ३ कोटी व नगर परिषदेच्या नवीन अभ्यासिकेसाठी ५० लाख रुपयांचा निधी देण्याचे शहरातील 'दही हंडी' कार्यक्रमात जाहिर केली. त्याचे तरुणाईने जल्लोषात स्वागत केले. झेन-जी'च्या संकल्पना व त्यांच्या अपेक्षांवर लक्ष केंद्रित करत आ. चिखलीकर हे मतदारसंघातील खेड्यापाड्यातील, वाडी-तांड्यावरील युवक-युवतींनी मोठ्या पदावर पोहोचावे, विविध परीक्षांमध्ये यश मिळवावे यासाठी सातत्याने प्रयत्न करत असतात.



लोहा व कंधार शहरातील क्रीडा संकुलात अद्ययावत सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी मागील काही महिन्यांपासून त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. कंधार येथील क्रीडा संकुलाचा प्रश्न मार्गी लागला असून, लोह्यात नगरसेवक अविनाश पाटील यांनी आयोजित केलेल्या दही हंडी कार्यक्रमात बोलताना त्यांनी थेट युवकांशी संवाद साधला. शहराजवळील बेरळी फाट्यालगत असलेल्या क्रीडा संकुलात अद्ययावत धावण्याचा ट्रॅकसह अन्य क्रीडा सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. मागील तीन महिन्यांपूर्वी पोलीस, सैन्य भरतीची तयारी करणाऱ्या मुला-मुलींच्या मागणीनंतर तेथे तात्पुरता धावण्याचा ट्रॅक तयार करून देण्यात आला होता, त्याचा मोठा फायदा विद्यार्थ्यांना झाला.

नगर पालिकेच्या वतीने नव्याने अद्ययावत अभ्यासिका उभारण्याचा संकल्प त्यांनी निवडणूक काळात जाहीर केला होता, त्याची पूर्तता करत अभ्यासिकेसाठी ५० लाख रुपये जाहीर केले. अशा प्रकारे गणेशोत्सवाच्या मुहूर्तावर त्यांनी साडेतीन कोटी रुपयांच्या विकासकामांची गिफ्ट जाहीर केली. अभ्यासिका व क्रीडा संकुलातील सुविधेचा फायदा पोलीस भरती, सैन्य व अन्य भरतीची तयारी करणाऱ्या शहर व परिसरातील खेड्यातील विद्यार्थ्यांना होणार असून, या निर्णयाचे तरुणांनी स्वागत केले आहे.

याप्रसंगी जिल्हा बँकेच्या संचालिका प्रणिताताई देवरे-चिखलीकर, युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, सचिन पाटील चिखलीकर, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, गटनेते भास्कर पवार, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नामदेव कटकमवार, दिनेश तेललावार, सतीश निखाडे, केतन खिल्लारे, तुकाराम दाढेल, राजेश बोडके, सचिन मुकदम, शहाजी पवार यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# साहित्य क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव; 'महाराष्ट्र पर्व साहित्यरत्न पुरस्कार जाहीर

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १३ सप्टेंबर -**

साहित्य ही समाजाच्या संवेदनांना शब्द देणारी आणि परिवर्तनाला दिशा देणारी ताकद आहे. अशाच साहित्यिक योगदानाचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र पर्व लाईव्ह न्यूज च्या वतीने चौथा वर्धापन दिन तसेच मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त 'महाराष्ट्र पर्व साहित्यरत्न पुरस्कार २०२६'जाहीर करण्यात आले आहेत. विविध साहित्यप्रकारांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या साहित्यिकांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.या पुरस्कारांमधून कविता, कादंबरी, गझल, कथा, लेखन, बालसाहित्य, संपादित साहित्य, प्रातिनिधिक कवितासंग्रह आणि गौरवग्रंथ अशा विविध साहित्यप्रवाहांचा गौरव करण्यात येणार आहे.

कवितासंग्रह विभागात 'माय' या साहित्यकृतीसाठी नागोराव डोंगरे (नांदेड), 'अभंग चांदणे' साठी कवयित्री सीमा भांदर्गे (अमरावती) आणि 'कोण मी अन् कोण



तू' साठी सोनबा दवणे (नांदेड) यांची निवड करण्यात आली आहे.कादंबरी विभागात 'वादळ' साठी अर्जुन वाघमारे (नांदेड) आणि 'घुसमट' साठी प्रा. मधुकर वडोदे (बुलढाणा) यांचा सन्मान करण्यात येणार आहे. गझलसंग्रह विभागात 'बळी' या गझलसंग्रहासाठी ड. मुकुंदराव जाधव (जळगाव) यांची निवड झाली आहे. कथासंग्रह विभागात 'छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्यकथा'साठी डॉ. नरसिंग कदम (लातूर), तर 'लॉकडाऊन मधलं प्रेम'साठी विजयकुमार कदम (मुंबई) यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

लेखसंग्रह विभागात 'शब्दसाज'*साठी रुपाली वागरे-वैद्य,नांदेड आणि 'आट्टील माणसं' साठी दिनेश फडतरे (पुणे) यांची निवड झाली आहे.बाल कवितासंग्रह विभागात 'येरे येरे ढगोबा' या साहित्यकृतीसाठी कवी मुरहारी कराड (लातूर) यांचा गौरव होणार आहे.संपादित पुस्तक विभागात 'अण्णा भाऊ साठे - चळवळ, तत्त्वज्ञान आणि वाङ्मयनिर्मिती' या पुस्तकाच्या संपादनासाठी डॉ. रामशेटी शेटकार यांची निवड करण्यात आली आहे.तसेच प्रातिनिधिक कवितासंग्रह मध्ये ' कविता संविधानाच्या ' यासाठी संपादक रमेश मुनेश्वर, मिलिंद जाधव यांची निवड करण्यात आली.गौरवग्रंथ विभागात 'एक वैचारिक अध्यापक डी. के. वाघमारे मांजरमकर' या गौरवग्रंथासाठी संपादक जीवन डी. वाघमारे मांजरमकर यांची निवड झाली आहे.

**साहित्याचा सन्मान म्हणजे शब्दांच्या सामर्थ्याचा सन्मान'**

साहित्यिकांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळावे, त्यांच्या योगदानाची दखल घेतली जावी आणि नवोदितांना प्रेरणा मिळावी,या उद्देशाने हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. विविध साहित्यप्रकारांमध्ये आपल्या लेखणीच्या माध्यमातून योगदान देणाऱ्या साहित्यिकांचा एकाच व्यासपीठावर गौरव होणार असल्याने या सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या पुरस्कारांचे आयोजक व मुख्य संपादक विजय नारायण वाठोरे (साहिल) व त्यांच्या टिमच्या सहकार्याने पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे.'महाराष्ट्र पर्व साहित्यरत्न पुरस्कार २०२६'च्या निमित्ताने साहित्यविश्वातील मान्यवरांचा होणारा हा गौरव साहित्यप्रेमींसाठी निश्चितच अभिमानाचा आणि प्रेरणादायी क्षण ठरणार आहे.